# महिला व बालकांचे हक्क आणि
# कल्याण समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**यवतमाळ नगरपरिषद, ठाणे महानगरपालिका, ठाणे जिल्हा परिषद तसेच पालघर जिल्हा परिषद यांच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती, यवतमाळ नगरपरिषद, ठाणे महानगरपालिका, ठाणे जिल्हा परिषद तसेच पालघर जिल्हा परिषद तर्फे त्यांच्यासाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांबाबतचा**

# आठवा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक जुलै, २०१८ रोजी सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
२०१८

# महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**यवतमाळ नगरपरिषद, ठाणे महानगरपालिका, ठाणे जिल्हा परिषद तसेच पालघर जिल्हा परिषद यांच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती, यवतमाळ नगरपरिषद, ठाणे महानगरपालिका, ठाणे जिल्हा परिषद तसेच पालघर जिल्हा परिषद तर्फे त्यांच्यासाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांबाबतचा**

# आठवा अहवाल

एचबी २०८०—१

## महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती
## सन २०१७-२०१८

**समिती प्रमुख :**

(१) डॉ.भारती लव्हेकर, वि.स.स.

**समिती सदस्य :**

(२) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.

(३) प्रा. मेधा कुलकर्णी, वि.स.स.

(४) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.

(५) श्रीमती स्नेहलता कोल्हे, वि.स.स.

(६) श्रीमती तृप्ती सावंत, वि.स.स.

(७) श्री. अशोक पाटील, वि.स.स.

(८) श्री. नारायण पाटील, वि.स.स.

(९) श्रीमती अमिता चव्हाण, वि.स.स.

(१०) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स.

(११) श्रीमती सुमन पाटील, वि.स.स.

(१२) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

(१३) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.

(१४) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

(१५) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

(४) श्रीमती प्रियांका कांदळगांवकर, कक्ष अधिकारी.

## महिलांचे हक्क व कल्याण समिती
## सन २०१६-२०१७

**समिती प्रमुख :**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.

**समिती सदस्य :**

(२) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.

(३) श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स.

(४) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.

(५) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.

(६) श्रीमती स्नेहलता कोल्हे, वि.स.स.

(७) श्री. प्रतापराव पाटील-चिखलीकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश घोलप, वि.स.स.

(९) कु. प्रणिती शिंदे, वि.स.स.

(१०) श्रीमती संध्यादेवी कुपेकर, वि.स.स.

(११) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स.

(१२) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

(१३) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.

(१४) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

(१५) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

(४) श्रीमती माधवी सुर्वे, कक्ष अधिकारी.

# अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | विषय (२) | | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|---|
| (१) | प्रस्तावना | . . . | (सहा) व (सात) |
| (२) | अहवाल | . . . | १ |
| (३) | यवतमाळ नगरपरिषद (प्रकरण १) | . . . | . . . |
| | १.१ यवतमाळ नगरपरिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत | | २ |
| | १.२ यवतमाळ नगरपरिषदेचे अंदाजपत्रक व महिलांच्या कल्याणकारी योजना | | १० |
| (४) | ठाणे, महानगरपालिका (प्रकरण २) | . . . | . . . |
| | २.१ ठाणे महानगरपालिकेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत | | १८ |
| | २.२ ठाणे महानगरपालिकेचे अंदाजपत्रक व महिलांच्या कल्याणकारी योजना | | २९ |
| (५) | ठाणे, जिल्हा परिषद (प्रकरण ३) | . . . | . . . |
| | ३.१ ठाणे जिल्हापरिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत | | ४२ |
| | ३.२ ठाणे, जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक व महिलांच्या कल्याणकारी योजना | | ५० |
| (६) | पालघर जिल्हा परिषद (प्रकरण ४) | . . . | . . . |
| | ४.१ पालघर, जिल्हापरिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत | | ६२ |
| | ४.२ पालघर जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक व महिलांच्या कल्याणकारी योजना | | ७३ |
| (७) | परिशिष्ट- “ अ ” विभागाची माहिती | . . . | ८१ |
| | परिशिष्ट- “ ब ” शासन निर्णय | . . . | ९१ |
| | परिशिष्ट- “ क ” - अधिसूचना | . . . | ११५ |
| | परिशिष्ट- “ ड ” - बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | . . . | १२३ |

**प्रस्तावना**

मी महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीची समिती प्रमुख, समितीने आपल्या वतीने अधिकार दिल्यावरुन समितीचा हा आठवा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

" यवतमाळ नगरपरिषद, ठाणे महानगरपालिका, ठाणे जिल्हा परिषद तसेच पालघर जिल्हा परिषद, यांच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती तसेच नगरपरिषदेतर्फे त्यांच्यासाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजना " यासंबंधी समितीने माहिती जाणून घेण्याचे ठरविले. त्यानुसार यवतमाळ नगरपरिषद, ठाणे महानगरपालिका, ठाणे जिल्हा परिषद तसेच पालघर जिल्हा परिषद, संदर्भातील माहिती मागविण्यात आली. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजी यवतमाळ नगरपरिषद व दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ ठाणे महानगरपालिका, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ ठाणे जिल्हा परिषद तसेच दिनांक २४ एप्रिल, २०१७ पालघर जिल्हा परिषद, येथे भेट दिली. नगर परिषद महानगरपालिका व जिल्हापरिषदेकडून प्राप्त झालेली माहिती व समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने सचिव, महिला व बालविकास विभाग, प्रधान सचिव, नगरविकास विभाग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग, सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सहकार व पणन विभाग, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव, आदिवासी विकास विभाग, सचिव, गृह विभाग, सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, संसदीय कार्य विभाग, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांची दिनांक १० एप्रिल, २०१८, ३ मे २०१८ व ७ जून, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी उपलब्ध झालेल्या माहितीचा सर्वंकष विचार करून समितीने त्यासंदर्भात आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

प्रश्नावलीनुसार यवतमाळ नगरपरिषद, ठाणे महानगरपालिका, ठाणे जिल्हा परिषद तसेच पालघर जिल्हा परिषद यांचेकडून प्राप्त झालेली माहिती व विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी तयार केलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने प्राप्त झालेली माहिती, तसेच परिशिष्ट " अ " माहिती, परिशिष्ट " ब " मध्ये शासन निर्णय तसेच परिशिष्ट " ड " मध्ये समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त दिलेले आहे.

समितीच्या दिनांक १२ जुलै, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत प्रारुप अहवालावर विचार करून तो संमत करण्यात आला.

साक्षीच्या वेळी सचिव, महिला व बालविकास विभाग, प्रधान सचिव, नगरविकास विभाग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग, सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सहकार व पणन विभाग, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव, आदिवासी विकास विभाग, सचिव, गृह विभाग, सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, संसदीय कार्य विभाग, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच यवतमाळ नगरपरिषद, ठाणे महानगरपालिका, ठाणे जिल्हा परिषद तसेच पालघर जिल्हा परिषद संबंधित अधिका-यांनी समितीसमोर उपस्थित राहून समितीला आवश्यक ती माहिती देऊन सहाय्य केल्याबाबत समिती त्यांची आभारी आहे.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक १२ जुलै, २०१८.

**श्रीमती भारती लव्हेकर,**
समिती प्रमुख,
महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती.

# अहवाल

## " यवतमाळ नगरपरिषद, ठाणे महानगरपालिका, ठाणे जिल्हापरिषद, पालघर जिल्हापरिषद "

महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीने " यवतमाळ नगरपरिषद व ठाणे महानगरपालिका, ठाणे जिल्हापरिषद तसेच पालघर जिल्हापरिषद यांच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती तसेच यवतमाळ नगरपरिषद व ठाणे महानगरपालिका, ठाणे जिल्हापरिषद तसेच पालघर जिल्हापरिषद तर्फे त्यांच्यासाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजना " यासंबंधी माहिती जाणून घेण्याचे ठरविले त्यानुसार यवतमाळ नगरपरिषद, ठाणे महानगरपालिका, ठाणे जिल्हापरिषद तसेच पालघर जिल्हापरिषद यांच्याकडून प्रश्नावली संदर्भात माहिती मागविण्यात आली. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १९ ऑगस्ट २०१५ रोजी यवतमाळ नगरपरिषद व दिनांक २७ ऑक्टोबर २०१५, ठाणे महानगरपालिका, ठाणे जिल्हा परिषद तसेच दिनांक २४ एप्रिल २०१७ पालघर जिल्हापरिषद येथे भेटी दिल्या, यवतमाळ नगरपरिषद, व ठाणे महानगरपालिका, ठाणे जिल्हापरिषद तसेच पालघर जिल्हापरिषद यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती व समितीने दिलेल्या भेटीच्यावेळी मुख्याधिकारी, यवतमाळ नगरपरिषद, तसेच आयुक्त ठाणे महानगरपालिका, मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे जिल्हापरिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी, पालघर जिल्हा परिषद यांनी उपस्थित राहून समितीस माहिती दिली.

समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने सचिव, महिला व बालविकास विभाग, प्रधान सचिव, नगर विकास विभाग, ग्रामविकास विभाग, सचिव, सामाजिक न्याय विभाग, सचिव, आदिवासी विकास विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव, सहकार व पणन विभाग यांची दिनांक १० एप्रिल २०१८, दिनांक ३ मे, २०१८ व दिनांक ७ जून २०१८ रोजी साक्ष घेतली. उक्त साक्षीत उपस्थित झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेला अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

## १. यवतमाळ नगरपरिषद

### १.१ यवतमाळ, नगरपरिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत :—

दिनांक १९ ऑगस्ट २०१५ रोजी महिलांचे हक्क व कल्याण समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी नगरपरिषद, यवतमाळ यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली होती.

शासकीय, निमशासकीय व शासनानुदानित संस्थेमधील सेवेतील भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणांची अंमलबजावणी नगरपरिषदेच्या सेवेमध्ये भरती करताना करण्यात येते काय ? असल्यास त्याबाबतचे निकष, भरतीची पद्धत इत्यादी बाबत सविस्तर माहिती देण्यात यावी ? नगरपालिकेतील वर्ग १ ते ४ मध्ये तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर पदसंख्या किती आहेत ? त्यापैकी सन २०१४-२०१५ अखेर किती पदे भरण्यात आली आहेत ? वर्ग १ ते ४ मधील किती व कोणती पदे महिलांकरिता आरक्षित ठेवण्यात आली ? त्यामध्ये संवर्गनिहाय महिला अधिकारी/कर्मचारी यांची संख्या किती आहे ? अशी विचारणा समितीने केली.

**उपरोक्त प्रकरणी यवतमाळ, नगरपरिषदेकडून खालील माहिती प्राप्त झाली आहे :—**

यवतमाळ नगरपरिषदेची स्थापना झाल्यापासून आजमीतीस परिषदेत असलेले कर्मचारी व अधिकारी व त्यापैकी महिला अधिकारी व कर्मचारी यांची संख्या एकूण कर्मचारी ३१५, अधिकारी वर्ग-क ५, महिला अधिकारी वर्ग-क ४, महिला अधिकारी वर्ग-ड ७८ असा कर्मचारी वर्ग आहे. शासकीय, निमशासकीय व शासनानुदानीत संस्थेमधील सेवेतील भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणांची अंमलबजावणी नगरपरिषदेच्या सेवेमध्ये भरती करताना त्याबाबतचे निकष, भरतीची पद्धत इत्यादीबाबत सविस्तर माहिती शासकीय नियमानुसार देण्यात येते. नगरपरिषदेतील वर्ग १ ते ४ तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर पदसंख्या सन २०१४-२०१५ अखेर भरण्यात आलेली पदे तांत्रिक-८, पम्प ऑपरेटर-१, टेलिफोन ऑपरेटर-१, वाहन चालक-४ सन २०१४-२०१५ मध्ये पदे भरण्यात आलेली नाहीत. मंजूर पदापैकी वर्ग १ ते ४ मधील पदे महिलांकरिता आरक्षित ठेवण्यात आलेली नाहीत. महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदे भरण्यासाठी नियमावली महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ नुसार कार्यपद्धती अवलंविण्यात येते. महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदापैकी सन २०१४-२०१५ अखेर मा. अपर आयुक्त,

समितीने महिलांच्या वर्ग ३ संवर्गात एकूण मंजूर पदे किती आहेत, त्यात किती महिला कर्मचारी कार्यरत आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी एकूण ३१५ पदे मंजूर आहेत. महिला अधिकारी वर्ग ३ मध्ये ५ पैकी ४ पदे भरती आहेत. एक महिला अभियंत्याने नोकरीचा राजीनामा दिला आहे. क्लार्कमध्ये महिला कार्यरत नाहीत. वर्ग ४ मध्ये ७८ महिलांची पदे भरली आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने वरिष्ठ लिपिक संवर्गाची एकूण किती पदे मंजूर आहेत व त्यापैकी किती पदे रिक्त आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी वरिष्ठ लिपिक संवर्गाची एकूण १० पदे मंजूर आहेत. त्यापैकी अनुशेषाची २ पदे भरण्यात आली असून ८ पदे रिक्त आहेत. रिक्त असलेल्या ८ पदांचा मागील अनेक वर्षापासूनचा अनुशेष आहे. यापैकी १ पद विमुक्त जाती (अ) आणि ७ पदे खुल्या प्रवर्गातून भरण्यात येणार आहेत. ही पदे भरण्याबाबत प्रस्ताव तयार केला असून तो २-४ दिवसात जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात येईल. तसेच, कनिष्ठ लिपिक संवर्गाची ८ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ५ पदे भरलेली आहेत, तसेच, लिपिक-टंकलेखक संवर्गाची सरळ सेवेची २४ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १५ पदे भरलेली असून ९ पदे रिक्त आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने नगरपरिषदेमध्ये महिला अधिकारी व कर्मचा-यांची भरती व सेवाविषयक बाबी हाताळण्यासाठी विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी महिलांची समिती गठीत करण्यात आली आहे. महिला कर्मचा-यांना एक रुम उपलब्ध करून दिलेली आहे. महिला कर्मचा-यांसाठी वेगळा कक्ष नाही. असे समितीस सांगितले.

समितीने महिला नगरसेविकांना प्रशिक्षण का दिले जात नाही ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी महिला नगरसेविकांना शिर्डी येथे प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले होते. तेथे ऑल इंडिया इन्स्टीट्यूटचे प्रशिक्षण होते. महिला नगरसेविकांना प्रशिक्षण देण्यासाठी विरोध नाही. नगरसेविकांसाठी प्रशिक्षणाचा कार्यक्रम आयोजित करतो आणि त्यांच्या काही अडचणी असतील तर त्या जाणून घेतो. असे समितीस सांगितले.समितीने यवमाळ नगरपरिषदेत विशाखा समिती तसेच महिलांसाठी तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी ही समिती आता स्थापन करण्यात आली आहे. पूर्वी समिती स्थापन करण्यात आली नव्हती. असे समितीस सांगितले.

अमरावती येथे २ वर्षापासून कलम ३१८ अन्वये याचिका दाखल केली होती त्यामुळे अनुकंपा तत्वावरील पदे भरता आली नाही. सदर याचिका माहे मे, २०१५ मध्ये काढून घेतल्याने या संबंधीची कार्यवाही सुरू आहे. प्रत्येक भरती वर्षामध्ये महिलांसाठी आरक्षित असलेली पदे गत ३ वर्षातील त्यांची संवर्गनिहाय सन २०१२-१३ २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये गत ३ वर्षातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही मा. जिल्हाधिकारी यांचे अंतर्गत संवर्गातील पदे भरली जातात. नगरपरिषदेतील विविध पदावर महिला उमेदवारांच्या नियुक्त्या करण्याबाबत नगरपरिषदेने सेवाप्रवेश महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ प्रमाणे लागू केली आहे. महिला उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी गत ३ वर्षात (सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५) वर्षनिहाय कोणत्याही तारखांना कोणत्याही वर्तमानपत्रात पदे भरण्यासाठी जाहिराती देण्यात आल्या नाही. महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आली नाही. परंतु, पदाच्या संख्येच्या प्रमाणात भविष्यात ३०% पदे भरली जातील याबाबत दक्षता घेण्यात येईल. महिला उमेदवारांसाठी राखीव असलेल्या रिक्त पदाबाबत व पदे भरल्याबाबतचा अहवाल गत ३ वर्षात सचिव, महिला व बाल विकास विभाग तसेच सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांनाही पाठविण्यात आलेला नाही.

**यवतमाळ नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांची साक्ष :—**

यवतमाळ नगरपरिषदेला दिनांक १९ ऑगस्ट २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्याधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने महिलांकरिता मंजूर पदांपैकी वर्ग १ ते वर्ग ४ ची पदे आरक्षित ठेवण्यात आली नसल्याचे नमूद केले आहे. तसेच नोकरीत महिलांसाठी ३०% आरक्षण देण्याबाबत दि. २५ मे २००१ रोजीचा शासन निर्णयानुसार भरती का करण्यात आली नाही, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? महिला उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी गत ३ वर्षात (सन २०१२-१३, २०१३-२०१४ व २०१४-२०१५) वर्षनिहाय वर्तमानपत्रात जाहिराती का देण्यात आल्या नाहीत ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी यवतमाळ नगरपरिषदेमार्फत ३०% आरक्षणानुसार महिलांची भरती करणे बंधनकारक आहे. परंतु, ७-८ वर्षापासून नगरपरिषदेत भरती करण्यात आली नाही. जशी पदे रिक्त होतील, त्यानुसार पदे भरली जातील. मागील वर्षी महिलांमधून ५ अभियंत्याची पदे भरण्यात आली होती. त्यापैकी एक महिला अभियंता नोकरी सोडून गेली.

तसेच सन २००१ नंतर नगरपरिषदेत भरती करण्यात आली होती. नवीन आकृतीबंधाप्रमाणे आरोग्य विभागात महिलांची पदे जास्त भरण्यात आली होती. असे समितीस सांगितले.

महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती व सेवाविषयक बाबी हाताळण्यासाठी नगरपरिषदेने विशेष स्वतंत्र कक्ष स्थापन केला आहे काय ? नगरपरिषदेने वर्षनिहाय महिला अधिकारी व कर्मचारी यांचेकडून त्यांचेवर होत असलेल्या अन्यायाच्या संदर्भातील पुढे काय कार्यवाही करण्यात आली आहे ? महिला अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी नगरपरिषदेकडून कोणकोणत्या योजना महिलाकंरीता राबविल्या जातात ? अशी विचारणा केली.

महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती व सेवाविषय बाबी हाताळण्यासाठी नगरपरिषदेमध्ये विशेष कक्ष स्वतंत्ररित्या स्थापन करण्यात आला आहे. सन २०१२-१३, २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या ३ वर्षनिहाय महिला अधिकारी व कर्मचारी यांचेकडून त्यांचेवर होत असलेल्या अन्यायाच्या संदर्भातील कार्यालयात अशी तक्रार नाही. तथापि, आवश्यक समिती गठीत केली आहे. महिला अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी नगरपरिषदेकडून महिलांकरीता विविध कल्याणकारी योजना/उपक्रम राबविले जात असून महिलांसाठी राष्ट्रीय दारिद्रय निर्मुलन अभियान अंतर्गत कार्यक्रम समाविष्ट आहे. असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, यवतमाळ नगरपरिषद यांनी खालीलप्रमाणे लेखी माहिती दिली :—**

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या दिनांक २५ मे, २००१ च्या शासन निर्णयान्वये शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थामधील सेवांमध्ये महिला करीता ३०% जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत.

| गट | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे | महिलांसाठी राखीव पदे | कार्यरत पदे | महिलांची रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | संवर्ग पदे | | | |
| अ | ९ | - | ८ | - | - | - |
| ब | १ | - | - | - | - | - |
| क | २९ | १४ | १५ | - | ५ | - |

**नगरपरिषद**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| क | ६३ | २४ | ३९ | पदनिहाय १ आरोग्य निरीक्षक | - | - |
| ड | २२१ | २०८ | १३ | | - | - |

वर्ग अ/ब ही पदे आयुक्त संचालक नगरपरिषद यांच्यामार्फत वर्ग-क ची पदे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत व नगरपरिषद संवर्गातील वर्ग क/ड ची पदे जिल्हास्तरीय समिती मार्फत भरली जातात सन २००१ नंतर पदभरती करण्यात आलेली नाही. सन २००९ मध्ये जिल्हास्तरीय समिती मार्फत सरळसेवेअंतर्गत आरोग्य निरीक्षकांची आकृतीबंधानुसार मंजूर ५ पदे भरण्यात आली होती. त्यामध्ये १ पद अनु.जाती १ अनु.जमाती आणि ३ पदे खुल्या प्रवर्गामध्ये भरण्यात आली त्यामध्ये एक पद महिला करीता राखीव ठेवण्यांत आले त्यानुसार कु. शिल्पा मलकवाडे यांना आरोग्य निरीक्षक या पदावर नियुक्ती आदेश देण्यात आले होते कु. मलकवाडे यांना कार्याआदेश क्र.यनप/साप्रंवि/१०९३/२०१३, दि. ११/३/२०१३ नुसार कार्यमुक्त करण्यांत आले. त्या नंतर या कार्यालयामध्ये पदभरती करण्यात आलेली नाही.

| गट | सुनावणीच्या वेळेची मंजूर पदे | सुनावणीच्या वेळी कार्यरत महिलांची संख्या | आताची मंजूर पदे | आता कार्यरत महिलांची संख्या |
|---|---|---|---|---|
| | | **राज्य संवर्ग** | | |
| अ | ८ | ० | ८ | ० |
| ब | १ | ० | ० | ० |
| क | २३ | ४ | ३१ | ५ |
| | | **नगरपरिषद संवर्ग** | | |
| क | ६३ | ० | ६३ | ० |
| ड | २२५ | ८४ | २२५ | ८४ |

**लिपिकांच्या पदांचा तपशील (सरळसेवा)**

| मंजूर पदे | महिलांसाठी राखीव पदे | महिला कार्यरत पदे | महिला रिक्त पदे | |
|---|---|---|---|---|
| २४ | ७ | - | - | - |

सन २०१२-१३ मध्ये बिंदुनामावली मा.सहा आयुक्त, मागासवर्ग कक्ष अमरावती यांचे आदेश क्रमांक आरबी/बीसीसी/६९/२०१३, दि.१३/०२/२०१३ नुसार मंजूर करण्यात आली त्यानुसार पदभरतीची कार्यवाही करण्याचे दृष्टीने यवतमाळ नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा दिनांक ८/८/२०१५, क्र.३१ व ठराव क्र.३५ नुसार मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार पदोन्नती व पदभरतीची प्रस्ताव स्थायी निर्देश क्र.२०,२३ (अ) नुसार गठीत केलेल्या स्त्री सदस्य समितीकडे मंजूरी करीता पाठविण्यात आला. त्यानुसार या कार्यालयामध्ये आदेश क.नपय/साप्रवि/आस्था/१६२०/२०१५ नुसार दिनांक १ जानेवारी,२०१६ रोजी वरिष्ठ लिपिक यांना पदोन्नतीचे आदेश देण्यात आले. दिनांक १ जानेवारी, २०१६ नंतर बिंदु नामावलीचा कालावधी संपल्यामुळे नव्याने बिदुनामावली मंजूरीची कार्यवाही करण्यात येवून मा.सह.आयुक्त, मागासवर्ग कक्ष, अमरावती यांचेकडे या कार्यालयाचे पत्र क्र.नपय/साप्रवि/आस्था/४८८५/२२१६, दिनांक २९/३/२०१७ नुसार प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यानुसार मा. सहा. आयुक्त, मागासवर्ग कक्ष अमरावती पदोन्नतीचे बिंदुनामावलीला त्यांचे आदेश क्र.बी.सी.सी./अ.का १/प्र.क्र.२१५/२०१७, दि.१५/५/२०१७ नुसार मंजूरी दिलेली आहे. तसेच कार्यालयीन पत्र क्र.बीसीसी/त्रुटीपत्रक/२०१७, दि.१६/५/२०१७ नुसार तृटीपत्र या कार्यालयास सादर केले. सदर त्रुटीची पूर्तता या कार्यालयाचे पत्र क्र.यनप/साप्रवि/७४३/२०१७ दि.५/६/२०१७ नुसार करण्यात आलेली आहे. त्यानुसार मा.जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे पदोन्नती व पद भरती करण्याबाबतचा प्रस्ताव कार्यालयीन पत्र क्रमांक नपय/साप्रवि/क्यु २०१७, दि.२३ मे, २०१७ नुसार सादर केलेला आहे. त्यानुसार पदभरती व पदोन्नतीची कार्यवाही करण्यात येईल. सन २०१६ मध्ये दि.२९/०३/२०१६ मध्ये नव्याने बिंदुनामावलीचा प्रस्ताव सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. त्यास १५ दिवसात मंजूरी प्राप्त करून घेण्यात येईल. त्यांच्याकडून मंजूरी मिळाल्यानंतर महिलांसाठीची राखीव पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**लिपिकांच्या पदांचा तपशील (पदोन्नती)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०८ | - | - | - | - |

३०% सरळसेवा भरतीसाठी अनुज्ञेय आहे. पदोन्नतीसाठी नाही.

नगरपालिकेच्या आस्थापनेवर स्वतंत्र महिला व बाल विकास अधिका-यांचे मंजूर पद नाही.

| मंजूर पदे | महिलांसाठी राखीव पदे | महिला कार्यरत पदे | महिला रिक्त पदे | |
|---|---|---|---|---|
| ० | ० | ० | ० | ० |

**वरिष्ठ लिपिक पदांचा तपशील (सरळसेवा)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०.०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ३०% सरळसेवा भरतीसाठी अनुज्ञेय आहे. पदोन्नतीसाठी नाही. | | | | |

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

यवतमाळ नगरपरिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने यवतमाळ नगरपरिषदेमध्ये महिला अधिकारी व कर्मचा-यांची पदे ३०% आरक्षणानुसार भरण्यात आली आहेत काय, तसेच महिलांचा अनुशेष आहे पण रिक्त नाहीत याचा अर्थ काय ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी वर्ग ४ मधून वर्ग ३ मध्ये दोन महिलांना लिपिक म्हणून पदोन्नती दिलेली आहे. अनुशेष आहे पण पदे रिक्त नसल्यामुळे ती भरता येत नाहीत. दिनांक २५ मे, २००१ च्या शासन निर्णयानुसार महिलांना ३० टक्के आरक्षण लागू झाले. सन २००१ नंतर पद भरती करण्यात आली नाही. सन २००९ मध्ये फक्त ५ आरोग्य सेविकांची पदे भरण्यात आली. त्यामध्ये ३० टक्के महिलांना आरक्षण दिले त्यानुसार १ पद भरले आहे. त्यानंतर भरती केलेली नाही. अशी माहिती समितीस दिली.

समितीने रिक्त पदांची जाहिरात कोणत्या वर्तमानपत्रात दिली ? किमान तीन वर्तमानपत्रात जाहिरात देणे अपेक्षित आहे. स्थानिक आणि राज्य पातळीवरील वर्तमानपत्रात जाहिरात देणे अपेक्षित आहे. अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी दैनिक “लोकमत ” मध्ये जाहिरात दिली होती. वर्ग ३ ची भरती जिल्हा निवड समितीमार्फत होते. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निवड समिती आहे. त्या समितीमार्फत ही भरती करण्यात आली होती. असे समितीस सांगितले.

समितीने आपण दिलेले कारण समितीला संयुक्तिक वाटत नाही. महिला व बाल विकास विभागास स्वंतत्र महिला अधिकारी कार्यरत आहे काय असा प्रश्न आपणास विचारण्यात आला आहे. त्याचे उत्तर नगरपालिकेच्या आस्थापनेवर स्वतंत्र महिला व बाल विकास अधिका-यांचे पद मंजूर नाही असे दिलेले आहे. आपण महिलांचा काय विकास करणार आहात रिक्त पदांची सद्यःस्थिती काय आहे व किती पदे रिक्त आहेत त्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे काय ? अशी समितीने विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिका-यांनी सन २०१५ नंतर भरतीच झालेली नाही. जेव्हा भरती होईल तेव्हा महिला आरक्षण लागू होईल. यवतमाळ नगरपरिषदेत ऑक्ट्रॉय विभागात अतिरिक्त कर्मचारी होते. त्यामुळे सन २००९ पासून भरती करण्यात आलेली नाही.

समितीने किती पदे रिक्त आहेत यासंबंधातील प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी आता राज्य संवर्ग निर्माण झालेला आहे. त्यामुळे मोठी पद भरती होणार आहे. सदर भरती ही जिल्हा पातळीवर होणार आहे. असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

समितीने यवतमाळ नगरपरिषदेला दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी शासकीय निमशासकीय व शासनानुदानित संस्थेमधील सेवेतील भरतीसाठी महिलांकरीता ३०% जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणांची अंमलबजावणी नगरपरिषदेच्या सेवेमध्ये भरती करताना करण्यात येते काय ? असल्यास त्याबाबतचे निकष, भरतीची पद्धत इत्यादी बाबत सविस्तर माहिती देण्यात यावी ? नगरपालिकेतील वर्ग १ ते ४ मध्ये तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर पदसंख्या किती आहेत ? त्यापैकी सन २०१४-२०१५ अखेर किती पदे भरण्यात आली आहेत ? वर्ग १ ते ४ मधील किती व कोणती पदे महिलांकरीता आरक्षित ठेवण्यात आली ? त्यामध्ये संवर्गनिहाय महिला अधिकारी/कर्मचारी यांची संख्या किती आहे ?

यावेळी यवतमाळ नगरपरिषदेतील मुख्याधिकारी यांनी समितीस यवतमाळ, नगरपरिषदेची स्थापना झाल्यापासून आजमीतीस परिषदेत असलेले कर्मचारी व अधिकारी व त्यापैकी महिला अधिकारी व कर्मचारी यांची संख्या एकूण कर्मचारी ३१५, अधिकारी वर्ग- क ०५, महिला अधिकारी वर्ग- क ०४, महिला अधिकारी वर्ग- ड ७८ असा कर्मचारी वर्ग आहे. शासकीय निमशासकीय व शासनानुदानीत संस्थेमधील सेवेतील भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणांची अंमलबाजावणी नगरपरिषदेच्या सेवेमध्ये भरती करताना त्याबाबतचे निकष, भरतीची पद्धत इत्यादीबाबत सविस्तर माहिती शासकिय नियमानुसार देण्यात येते. प्रत्येक भरती वर्षामध्ये महिलांसाठी आरक्षित असलेली पदे गत ३ वर्षातील त्यांची संवर्गनिहाय सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये गत ३ वर्षातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही मा.जिल्हाधिकारी यांचे अंतर्गत संवर्गातील पदे भरली जातात. नगरपरिषदेतील विविध पदावर महिला उमेदवारांच्या नियुक्त्या करण्याबाबत नगरपरिषदेने सेवाप्रवेश महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ प्रमाणे लागू केली आहे. महिला उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी गत ३ वर्षात (सन २०१२-१३

२०१३-१४ व २०१४-१५) वर्ष निहाय कोणत्याही तारखांना कोणत्याही वर्तमानपत्रात पदे भरण्यासाठी जाहिराती देण्यात आल्या नाही. महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आली नाही. परंतु पदाच्या संख्येच्या प्रमाणात भविष्यात ३०% पदे भरली जातील याबाबत दक्षता घेण्यात येईल. महिला उमेदवारांसाठी राखीव असलेल्या रिक्त पदाबाबत व पदे भरल्याबाबतचा अहवाल गत ३ वर्षात सचिव महिला व बाल विकास विभाग तसेच सचिव, सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय यांना ही पाठविण्यात आलेला नाही.

याबबत समितीने दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेऊन रिक्त पदांबाबत विचारले असता विभागीय सचिवांनी यवतमाळ नगरपरिषदेमध्ये महिलांची भरती करणे ३०% आरक्षणानुसार भरती करणे बंधनकारक आहे. मात्र अनुशेष असतानाही पदे रिक्त नसल्यामुळे ती भरता येत नाही. तसेच दिनांक २५ मे, २००१ च्या शासन निर्णयानुसार महिलांना ३०% आरक्षण लागू झाले असले तरी सन २००१ नंतर जिल्हापरिषदेत पदांची भरती करण्यात आलेली नाहीत. तसेच वर्ग ४ ची ही भरती जिल्हा निवड समितीमार्फत जिल्हा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात येत असल्यामुळे ही भरती या समितीमार्फत करण्यात आली होती. **महिलांच्या कल्याणार्थ राबविण्यात येणा-या आरक्षण धोरण अमंलबजावणी यवतमाळ नगरपरिषदेत असलेल्या रिक्त पदांची संख्या विचारात घेता नाराजी व्यक्त करते. या रिक्त पदांची भरती करण्यासाठी नगर परिषदेने शासनाकडे प्रस्ताव पाठविला नसेल तर लवकरात लवकर प्रस्ताव पाठवावा आणि महिलांकरीता रिक्त असलेली पदे महिला संवर्गातूनच तात्काळ भरण्यात यावी व महिलांकरीता आरक्षित असलेल्या ३०% जागांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी अशी शिफारस समिती करीत आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ३ महिन्यात समितीला सादर करावा.**

**१.२ यवतमाळ नगरपरिषदेचे गत ३ वर्षातील वर्षनिहाय अंदाजपत्रक :—**

नगरपरिषदेचे गत ३ वर्षातील वर्षनिहाय सन २०१२ ते २०१५ मधील वार्षिक अंदाजपत्रक किती रकमेचे आहे ? शासन धोरणानुसार अंदाजपत्रकाच्या ५% निधी महिला व बालकल्याण विभागासाठी राखून ठेवण्यात येतो त्या अनुंषगाने आपल्या नगरपरिषदेत गत ३ वर्षात सन २०१२ ते २०१५ सदरहु ५% निधी कसा खर्च करण्यात आला आहे ? यवतमाळ नगरपरिषदेमार्फत महिलांचे सबलीकरण करण्याकरीता तसेच आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरीता देण्यात येत असलेल्या सोई सवलती इत्यादी योजनाबाबत माहिती देण्यात यावी ? उक्त योजनांवर सन २०१२-१३, २०१३-२०१४, २०१४-१५ या ३ वर्षात व वर्षनिहाय या योजनांनिहाय एकूण किती खर्च झाला ? अशी विचारणा करण्यात आली.—उपरोक्त प्रकरणी यवतमाळ नगरपरिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :-

**(अ) नगरपालिकेचे गत ३ वर्षातील वर्षनिहाय अंदाजपत्रक :—**

(१) सन २०१२-१३ - रु २५,००,०००/–

(२) सन २०१३-१४ - रु.३५, ००,०००/–

(३) सन २०१४-१५ - रु.३५,००,०००/–

यवतमाळ नगपरिषद गत ३ वर्षात ५ % निधी खालीलप्रमाणे खर्च करण्यात आला.

(१) सन २०१२-१३ - रु.१९,९४,३५८/–

(२) सन २०१३-१४ - रु.३,५२,५६५/–

(३) सन २०१४-१५ - रु.१५,६४,८७९/–

खर्च विवरण सोबतच्या परिशिष्ट " अ " मध्ये जोडलेले आहे.

नगरपरिषदेमार्फत महिलांचे सबलीकरण करण्याकरीता तसेच आर्थिकदृष्टया मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरीता शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.१५६०५नवि/२० दि. ३० डिसेंबर, २००६ चे परिपत्रकानुसार महिला व मुलीसाठी विविध व्यवसायाचे लघु उद्योगाचे प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहेत.

नगरपरिषदेचा वर्षनिहाय गत ३ वर्षात व योजनानिहाय खर्च खालील प्रमाणे आहे.

(१) सन २०१२-१३ - निरंक

(२) सन २०१३-१४ - निरंक

(३) सन २०१४-१५ - रु.३,२५,०००/-

यानंतर समितीने अशी ही विचारणा केली की, नगरपरिषदेमार्फत राबविण्यात येणा-या महिलांच्या कल्याणकारी योजना व सोई सवलती इत्यादी.बाबतची माहिती गरजु महिलांपर्यंत पोहचविण्याचे व त्यानी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी स्वतंत्र अशी यंत्रणा आहे काय ? महिलांसाठी असलेल्या योजनाचे मुल्यमापन करण्यात आले आहे काय ? असल्यास त्याचे निकर्ष काय आहेत ? महिलांसाठींच्या कल्याणकारी योजनांसाठी केंद्र व राज्य शासनाकडुन वेगळे अनुदान मिळते काय ? असल्यास, निधी कोणकोणत्या बाबींवर खर्च करण्यात येतो ? महिला बचत गटानी तयार केलेल्या वस्तूचे प्रदर्शन भरविले जाते काय ? महिला बचत गट व महिला संस्थाना नगरपरिषदेतर्फे अर्थसहाय्य देण्यात येते काय ? त्यावर नगरपरिषदेच्या अधिका-यांकडून खालील प्रमाणे माहिती समितीला देण्यात आली.

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना व राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत कार्यरत असलेल्या महिला बचत गटांच्या मार्फत नगरपरिषदेमार्फत राबविण्यात येणा-या या महिलांच्या कल्याणकारी योजना व सोई सवलती इ. बाबतची माहिती गरजु महिलापर्यंत पोहचविण्याचे व त्यांनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यात येते. नगरपालिकेच्या महिलांसाठी असलेल्या योजनाचे मुल्यमापन, त्याचे निकर्ष, महिलांच्या कल्याणाकरीता राबविण्यात येणा-या योजना व त्यांना देण्यात येणा-या सोईसवलती इत्यादीबाबत शासनाकडून वेगळे अनुदान, सन २०१२-१३-२०१३-२०१४-२०१४-२०१५ या तीन वर्षात वर्षनिहाय वेळोवेळी आढावा घेण्यात येतो व संबंधित वर्षनिहाय खर्च सोबत जोडलेल्या परिशिष्ट “ अ ” मध्ये नमूद करण्यात आला आहे नगरपरिषदेमार्फत महिलांचे सबलीकरण करण्याकरिता तसेच आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरीता शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.१५६०५/नवि/२० दि.३० डिसेंबर, २००६ चे परिपत्रकानुसार महिला व मुलीसाठी विविध व्यवसायाचे लघु उद्योगाचे प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहेत. नगरपरिषद एकूण उत्पन्नाच्या रक्कम महिलासाठी कल्याणकारी योजना राबविण्यात येणारा निधीच्या उपलब्धतेप्रमाणे तरतुद जाते. महिला बचत गटानी तयार केलेल्या वस्तु विक्रीचे सद्य:स्थितीत कोणतेही धोरण नाही. महिला संस्थाना नगरपषिदेतर्फे अर्थसहाय्य देण्यात येत नाही परंतु केंद्र शासन पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना अंतर्गत महिला बचत गटाना फिरता निधी व महिला उद्योजक गटाना अर्थ सहाय्य व कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे.

त्यावर समितीने नगरपरिषद क्षेत्रात मालकीचे मंडई/बाजार यांची संख्या किती आहे ? त्यापैकी एकूण किती गाळे आहेत ? महिलांसाठी गाळे राखून ठेवण्यात येतात काय ? कोणकोणत्या ठिकाणेच गाळे महिलांना वितरीत करण्यात आले आहेत ? नगरपरिषदेमध्ये विविध समित्या आहेत त्यामध्ये महिलांचे प्रमाण किती आहे ? महिला नगरसेविकांसाठी व महिला कर्मचारीसाठी वेगळा कक्ष राखुन ठेवण्यात आला आहे काय ? महिलासाठी तक्रार कक्ष सुरू करण्यात आली आहे काय ? अतापर्यंत किती तक्रारी आल्या ? महिलांच्या आरोग्याबाबत कोणत्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात ? नगरपरिषदेच्या अखत्यारित किती रुग्णालये आहेत ? रुग्णालयात एकूण किती अधिकारी/कर्मचा-यांपैकी ३०% महिला आस्थापनेवर नियुक्ती करण्यात आली आहे काय ? नगरपरिषदेच्या क्षेत्रात पोलिओचे रुग्ण आहेत काय ? असल्यास किती पोलिओ रुग्ण आढळले त्यांना सदंर्भ सेवा देण्यात आली आहे काय ? अशी विचारणा केली असता खालीलप्रमाणे माहिती समितीला देण्यात आली.

नगरपरिषद क्षेत्रात नगरपरिषदेच्या मालकीचे मंडई/बाजार यांची संख्या २२ आहे. यामध्ये एकूण दुकाने ६६९ (कापड दुकान, स्टेशनरी, किराणा दुकान, चप्पल, इलेक्ट्रिक, मोबाईल, होज

यरी, हार्डवेअर, चहापती, मिठाईचे दुकान) आहेत. गाळे वाटपाचे निकष, लीलावाप्रमाणे सदर मार्केट मधील गाळे महिलांना देण्यास तरतुद नाही परंतु नगरपरिषद दुकाने आरक्षित ठेवले आहेत. नगरपरिषदेच्या मालकीच्या मार्केटमधील महिलांना वितरीत करण्यात आलेले गाळे पुढील प्रमाणे आहेत. जुने इंदिरा गांधी -३, महादेव मंदिर शॉ -३, नविन इंदिरा गांधी - ३, संजय गांधी मार्केट, नगरपरिषद मार्केट -१, जुना दत चौक मार्केट -१, नवीन प्रशासकीय मार्केट - २७, नवीन दत्त चौक - ६, सुलभेवार मार्केट - १, चौक शॉप - १, लाल बहादुर मार्केट- २, मिनी मार्केट -४, महिला बचत गट व तथापि, त्यांना दुकान गाळे उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही सुरू आहे. नगरपरिषदेमध्ये विविध समित्या आहेत त्यामध्ये महिलांचे प्रमाण सम-प्रमाण आहे. महिला नगरसेविकांसाठी व महिला कर्मचा-यांसाठी वेगळा कक्ष राखून ठेवण्यात आला आहे. महिलांसाठी तक्रार निवारण कक्ष व महिलांची समिती गठीत करण्यात आली आहे. महिला व बाल कल्याण अधिकारी हे पद नाही. मातोश्री रमाबाई आंबेडकर आयुर्वेदिक दवाखाना पाटीपुरा येथे आयुर्वेदिक बाह्य रुग्ण विभाग चालविण्यात येते या ठिकाणी महिलांची आरोग्य तपासणी व औषधोपचार करण्यात येते. मातोश्री रमाबाई आंबेडकर आयुर्वेदिक दवाखाना पाटीपुरा येथे मंजूर पदानुसार १ आयुर्वेदिक वैध (पु) कार्यरत असुन कामकाजाच्या दृष्टीनें जकात विभागातील १ लिपिक (पु) व आरोग्य विभागातील १ स्त्री सफाई कामगार कार्यरत आहेत. पल्स पोलिओ रुग्णालयात गेल्या ३ वर्षातील पोलिओ रुग्णाची महिती बाबत मा.जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय यवतमाळ यांचे पत्र क्र.जिशचिय/सारुय/७३३०/२०१५ दि.२२ जुलै, २०१५ नुसार सन २०१२-१३-२०१३-२०१४-२०१४-२०१५ या ३ वर्षात यवतमाळ शहरात नगरपरिषद हद्दीमध्ये एकही पोलिओ रुग्ण आढलेला नाही. नगरपरिषद अखत्यारित प्राथमिक माध्यमिक शाळांमध्ये एकूण शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पुढील प्रमाणे आहेत. प्राथमिक शाळा - २४, शिक्षक एकूण पुरुष - ५१, शिक्षक महिला एकूण - ९१, लिपिक कर्मचारी -००, शिपाई - ००, प्रयोगशाळा सहायक - ००, माध्यमिक शाळा - ०१, शिक्षक एकूण पुरुष, ०८, शिक्षक महिला एकूण - ०३, लिपिक कर्मचारी - ०१, शिपाई - ०३, प्रयोगशाळा सहायक - ०१

**यवतमाळ नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांची साक्ष :—**

यवतमाळ नगरपरिषदेला दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्याधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने सन २०१४-२०१५ मध्ये ३५ लाख रुपयांचे वार्षिक अंदाजपत्रक होते. ५ टक्के निधीतून गार्डनच्या वॉल कंपाऊंडचे काम करता येऊ शकते का ? या व्यतिरिक्त आणखी कोणकोणत्या बार्बीवर खर्च करण्यात आला ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी सदर निधीतून महिला सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे २ गार्डनच्या वॉल कंपाऊंडचे काम करण्यात आले. महिला बचतगटातील महिलांना प्रशिक्षण देण्यासाठी खर्च करण्यात आला. असे समितीस सांगितले.

समितीने नगरपरिषद क्षेत्रातील मार्केट/मंडई/बाजार इत्यादींमधील गाळे महिलांकरीता राखीव ठेवले जातात काय ? एकूण गाळयांपैकी ३० टक्के गाळे महिलांकरीता राखीव न ठेवता ६६९ गाळ्यांपैकी महिलांना फक्त ३२ गाळ्यांचे वाटप केले आहे. हे खरे आहे काय तसेच हे गाळे केव्हा बांधण्यात आले आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी नगरपरिषद क्षेत्रातील सन २००० पूर्वी मार्केट बांधण्यात आले होते. सन २००० नंतर महात्मा फुले आणि दत्त चौक मार्केट येथे गाळे बांधण्यात आले आहेत. दत्त चौक मार्केट येथे ७० गाळे आहेत. नगर परिषदेच्या इमारतीतील गाळे बीओटी तत्वावर दिलेले आहेत. तसेच एकूण ६६९ गाळे आहेत. त्यापैकी महिलांना ३२ गाळ्यांचे वाटप केलेले आहे. अनेक वर्षापूर्वी गाळ्यांचे वाटप करण्यात आलेले आहे. त्यावेळी महिला आरक्षणाचे पालन केले गेले नाही. यामध्ये ३० वर्षापूर्वीच्या गाळ्यांचा समावेश आहे. व सदरहू गाळे हे सन २००४ मध्ये बांधण्यात आले आहेत. असे समितीस माहिती दिली.

समितीने नगरपरिषदेमध्ये महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंच्या विक्रीबाबत नगर परिषदेचे धोरण काय आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तुंचे प्रदर्शन भरविले जाते. त्यावेळी बचत गटांना दुकाने उपलब्ध करून दिली जातात. परंतु महिला व बचत गटांना विशिष्ट गाळे दिलेले नाहीत. असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, यवतमाळ नगरपरिषद यांनी खालीलप्रमाणे लेखी माहिती दिली :—**

महिलांच्या कल्याणकारी योजनांकरीता ५ टक्के निधी खर्च करण्यात येतो.

सन २०१२-१३ मध्ये तरतुद रु.२५ लक्ष खर्च एकूण रु.१९.९४ लक्ष

सन २०१३-१४ मध्ये तरतुद रु.३५ लक्ष खर्च एकूण रु.०३.५२ लक्ष

सन २०१४-१५ मध्ये तरतुद रु.३५ लक्ष खर्च एकूण रु.१५.६५ लक्ष

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

यवतमाळ नगरपरिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने महिलांचे सबलीकरण करीत असतांना त्यांना प्रशिक्षण दिल्यानंतर रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने त्यांना कोणती साधन सामुग्री देण्यात आली ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्याधिकारी यांनी प्रशिक्षण दिल्यानंतर रोजगार उपलब्ध करून देण्याचे दृष्टीने आवश्यकतेनुसार साधन सामुग्री पुरविण्यात येईल महिलांना घरगुती रसायने फिनेल, साबण, सोडा, उश्या करा‍टेचे प्रशिक्षण दिलेले आहे.

समितीने महिलावर अन्याय होत आहे ही अतिशय गंभीर गोष्ट आहे. महिलांच्या विविध योजना करीता एकूण अंदाजपत्रकाच्या ५ टक्के निधी खर्च करणे आवश्यक आहे. परंतु, यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात आलेली नाही. महिलाना कोणते प्रशिक्षण दिले त्याबाबत कोणत्या वर्तमानपत्रात जाहिरात दिली लाभार्थ्यांची संख्या किती होती याबाबतचे रेकॉर्ड समितीला दाखवावे राज्यस्तरीय वर्तमानपत्रात जाहिरात देणे आवश्यक होते. अशी विचारण केली .

त्यावर मुख्याधिकारी यांनी नगरपरिषदेने केलेल्या खर्चासंबंधी फाईल समितीला दाखविण्यात आली हा माझा देश या स्थानिक वर्तमानपत्रात रोटेशनुसार जाहिरात दिली होती त्यानुसार एकूण १६० प्रशिक्षणार्थींना कौशल्य वृद्धीचे प्रशिक्षण देण्यात आले. यापुढे विभागीय पातळीवरील वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात येईल. असे सांगण्यात आले.

समितीने नगर विकास विभागाने दिनांक २२ नोव्हेंबर, २००१ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. शासन निर्णयातील दुस-या परिच्छेदात असे नमुद केले आहे की शासनाच्या महिला धोरणाच्या अनुषंगाने नगर परिषदांना कळविण्यात येते की नगरपरिषदेनी शहरी सुवर्ण जयंती रोजगार योजनेंतर्गत महिलांच्या स्वसहायता गटाची स्थापना वाढविण्याचे कार्यक्रमात प्रधान देण्यात यावे यामध्ये आदिवासी महिला आपदग्रस्त आणि शहरी महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यावर विशेष भर देण्यात यावा यासाठी महिला व त्याचे गटासाठी नगरपरिषदामार्फत निर्माण करण्यात येत असलेल्या व्यापारी संकुलातील वितरीत होणा-या गाळांपैकी ३० टक्के गाळे महिलांच्या स्वसहायता गटासाठी राखुन ठेवण्यात यावे व त्याचे वाटप संबंधित गटात होईल याची दक्षता घेण्यात यावी असे गाळे वाटप करताना गाळे बांधण्यासाठी आलेल्या खर्चाची रक्कम मोबदला स्वरुपात ना नफा ना तोटा या तत्वावर देवुन गाळे हस्तांतरण करण्याची कार्यवाही करण्यात यावी

एकूण ६६९ गाळे आहेत त्यापैकी महिलांना जवळपास २०० गाळ्यांचे वाटप करावयास पाहिजे होते परंतु महिला फक्त ३२ गाळ्यांचे वाटप करण्यात आले म्हणून संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे, असे समितीने सांगितले.

त्यावर मुख्याधिकारी यांनी एकूण ६६९ गाळयांचे वाटप ३० वर्षापूर्वी करण्यात आले आहे. त्यावेळी महिला आरक्षण नव्हते. तथापि, ६६९ गाळयांमध्ये ३२ गाळे महिलांच्या नावावर आहेत. सद्या १८१ गाळयांची मुदत संपल्यामुळे लिलाव प्रक्रिया चालु आहे. त्या गाळेवाटपात महिलांना ३० टक्के आरक्षणाप्रमाणे गाळे वाटप करण्यात येईल, असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :—**

यवतमाळ नगरपरिषदेचे गत ३ वर्षनिहाय अंदाजपत्रक पाहिले असता नगरपरिषदेमधील महिलांसाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजना व त्यांना देण्यात येणा-या सोयी-सवलती याबाबत अंदाजपत्रकात तरतूद केलेली असतानाही योग्य प्रमाणात कल्याणकारी योजनांवर खर्च केला जात नाही व महिलांना सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत याबाबत समिती खेद व्यक्त करीत आहे. यवतमाळ नगरपरिषदेचे गत ३ अहवाल वर्षात म्हणजेच सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या वर्षात महिलांच्या कल्याणकारी योजनांवर तसेच सोयी सवलतींवर शासन निर्णयाप्रमाणे खर्च करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे रक्कम खर्च न करता निरंक अशी माहिती समितीला दिली आहे. आणि सन २०१४-१५ मध्ये रुपये १५,६४,८७९- योजना निहाय तरतूद असताना रुपये ३०,००,०२५/- इतकाच खर्च करण्यात आला आहे. निधीची तरतूद ५% प्रमाणे करणे आवश्यक असताना त्याची तरतुद करण्यात आली नाही. याबाबत शासन निर्णयाचे उल्लंघन झाले असल्याने **यावर समिती तीव्र नाराजी व्यक्त करते. शासन निर्णयाचे पालन न झाल्याने नगरपरिषदेकडे निधी असूनही तो न वापरणे व ५% प्रमाणे खर्च न करणे यामुळे महिलांच्या सबलीकरण करण्याच्या दिशेने शासनाने उचलेले पाऊल अधिका-यांच्या मनमानीपणामुळे निश्चितच महिलांकरिता असलेला शासनाचा उद्देश सफल होताना दिसून येत नाही. सबब, ज्या अधिका-यांनी शासन निर्णयाचे पालन न करता अपुरी तरतुद केली व महिलांची उपेक्षा केली अशा सर्व अधिका-यांची चौकशी करून त्यात दोषी असणा-या अधिका-यांविरुद्ध कारवाई करावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

समितीने नगरपरिषद क्षेत्रातील नगरपरिषदेच्या मालकीचे मंडई/बाजार येथील गाळे वाटपाचे निकष ठरवून गाळे वाटप करण्यात येते असे विभागीय सचिवांनी सांगितले तसेच गाळे वाटपात महिलांकरीता आरक्षणाचे पालन न करता महिलांना गाळे दिले जात नाहीत यावर समितीने नाराजी व्यक्त केली व आरक्षित असलेले गाळे महिलांना न देणे ही बाब महिलांवर अन्याय करणारी **असून अतिशय गंभीर आहे. सबब नगर विकास विभागाने दिनांक २२ नोव्हेंबर, २००१ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार नगरपरिषदेने शहरी सुवर्ण जयंती रोजगार योजनेंतर्गत महिलांच्या स्वयं-सहाय्यता गटाची स्थापना करून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यांवर विशेष भर देण्यात यावा व नगरपरिषदेमधील निर्माण करण्यात येत असलेल्या व्यापारी संकुलातील वितरीत होणा-या एकूण गाळयांपैकी ३०% गाळे महिलांच्या स्वसहायता गटासाठी राखून ठेवण्यात यावेत तसेच गाळे वाटप करताना गाळे बांधण्यासाठी आलेल्या खर्चाची रक्कम मोबदला स्वरुपात ना नफा ना तोटा या तत्वावर देवून गाळे हस्तांतरण करण्याची कार्यवाही करण्यात यावी. अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी.**

## २. ठाणे महानगरपालिका

### २.१ ठाणे महानगरपालिकेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत :—

मंगळवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ रोजी महिलांचे हक्क व कल्याण समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी ठाणे महानगरपालिका यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली होती.

समितीने महानगरपालिकेतील शासकीय निमशासकीय व शासन अनुदानित संस्थामधील सेवेतील भरतीसाठी महिलांकरीता ३० % जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणाची अंमलबाजावणी महानगरपालिकांच्या सेवेमध्ये भरती करतांना करण्यात येते काय ? महानगरपालिकेतील वर्ग १ ते ४ तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर पद संख्या किती आहे ? त्यापैकी सन २०१४-२०१५ अखेर किती पदे भरण्यात आली आहेत ? महिला उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी गत तीन वर्षात (२०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५) वर्ष निहाय किती वेळा व कोणकोणती पदे भरण्यासाठी जाहिराती देण्यात आल्या होत्या ? महानगरपालिकेतील विविध पदांवर महिला उमेदवारांच्या नियुक्त्या करण्याबाबत महानगरपालिकेने सेवाप्रवेश नियमावली तयार केली आहे काय ? महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांसाठी स्वतंत्र नोंदवही (रोस्टर) ठेवण्यात आली आहे काय ? अशी विचारणा केली.

**उपरोक्त प्रकरणी ठाणे महानगरपालिकेकडून खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली :—**

ठाणे महानगरपालिकेच्या सेवेत एकूण ५,३०४ पुरुष व २,०५१ महिला असे एकूण ७,३५५ अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. २,०५१ महिलांपैकी वर्ग १ मध्ये ५३ व वर्ग २ मध्ये ५१ महिला अधिकारी, वर्ग ३ मध्ये ७६२ महिला कर्मचारी व वर्ग ४ मध्ये १,१७१ महिला कर्मचारी कार्यरत आहेत.

महाराष्ट्र शासन महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२ दि. २५ मे, २००१ अन्वये शासकीय निमशासकीय शासन अनुदानित संस्थामधील सेवांमध्ये भरतीसाठी महिलांकरीता ३०% जागा आरक्षित ठेवणेबाबत आदेश आहेत. त्यानुसार ठाणे महानगरपालिकेमध्ये रिक्त पदे सरळसेवेने भरताना समांतर आरक्षणानुसार ३०% पदे महिलांमधून भरण्यात येईल.

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर एकूण ९७१० स्थायी व २०३ अस्थायी पदे वर्ग १ ते ४ मध्ये मंजूर आहेत.त्यापैकी तांत्रिक २७३८ व अतांत्रिक ६९७२ इतकी पदे मंजूर असून तांत्रिक

१६८२ व अतांत्रिक ५,६४४ इतकी भरलेली आहेत. त्यापैकी सन २०१४-२०१५ अखेर वर्ग १ ते ४ मधील एकूण ७,३५५ पदे भरलेली आहेत.

ठाणे महानगरपालिकेच्या संदर्भातील आस्थापनेवर वर्ग १ ते वर्ग ४ मधील सरळसेवेने एकूण १४८ संवर्ग आहेत यातील खालील महिला आरक्षण एकाकी पदे वगळून ठेवण्यात आली आहेत.

| **वर्ग १ सरळसेवा** | | **वर्ग २ सरळसेवा** | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | संवर्गाचे नांव | अ.क्र. | संवर्गाचे नांव |
| १ | दंत वैद्यकिय अधिकारी | १ | विधी अधिकारी |
| २ | वैद्यकिय अधिकारी | २ | उद्यान निरिक्षक |
| ३ | प्राध्यापक | ३ | उपसमाज विकास अधिकारी |
| ४ | सहयोगी प्राध्यापक | ४ | कार्यालयीन अधिक्षक |
| ५ | डेमॉस्टेटर | ५ | उपअभियंता (विद्युत) |
| ६ | अधिव्याख्याता | ६ | आरोग्य शिक्षक |
| ७ | उपकर निर्धारक व संकलक/ महापालिका सचिव | | |
| ८ | ईटेसिव्हिस्ट | | |

**वर्ग ३ सरळसेवा**

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | अ.क्र. | संवर्गाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (नागरी) | ९ | ज्युनियर केमिस्ट/फिल्ड केमिस्ट |
| २ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | १० | एक्स रे टेक्निशियन |
| ३ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | ११ | अन्न निरिक्षक/फुड इस्पेक्टर |
| ४ | कनिष्ठ अभियंता (ऑटो) | १२ | पर्यवेक्षक/सुपरवायझर |
| ५ | भुमापक/सर्व्हेअर | १३ | पर्यवेक्षक (यांत्रिकी) |
| ६ | आरेखक | १४ | विधी सहाय्यक |
| ७ | वातानुकुलित यंत्र चालक | १५ | सिनियर टेक्निशियन |
| ८ | साऊंड ऑपरेटर | १६ | वैद्यकिय समाजसेवक |

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | अ.क्र. | संवर्गाचे नांव |
|---|---|---|---|
| १७ | सायकॅट्रिक सोशल वर्कर | ४३ | पुरुष/महिला अटेन्डंट |
| १८ | पब्लिक हेल्थ नर्स | ४४ | सहायक प्रयोगशाळा तंत्रज्ञ |
| १९ | ज्युनियर टेक्निशियन | ४५ | नर्स मिडवाईफ |
| २० | क्युरेटर ऑफ म्युझिअम | ४६ | लिनन किपर |
| २१ | आरोग्य निरिक्षक | ४७ | लेप्रेसी असिस्टंट |
| २२ | ग्रंथपाल | ४८ | हेल्थ व्हिजिटर्स |
| २३ | बालवाडी विशेष शिक्षिका | ४९ | मिश्रक तथा लिपिक |
| २४ | ज्युनियर प्रोग्रॉमर | ५० | मिश्रक |
| २५ | मराठी लघुलेखक | ५१ | देवी मुद्रक |
| २६ | उपस्थापक अधिकारी | ५२ | जल निर्देशक/जलजीव रक्षक |
| २७ | इंग्रजी लघुलेखक | ५३ | फिल्ट प्लँट ऑपरेटर/क्लो.प्लँट ऑपरेटर |
| २८ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | | |
| २९ | स्वच्छता निरिक्षक/लायसन्स इन्स्पेक्टर/सहा.परवाना निरिक्षक | ५४ | सहायक मोटर मेकॅनिक |
| | | ५५ | सहाय्यक मेकॅनिक |
| ३० | ॲंथ्थिलिक असिस्टंट | ५६ | बालवाडी शिक्षिका |
| ३१ | डायलेसिस तंत्रज्ञ | ५७ | बहुउद्देशीय कामगार |
| ३२ | दंत तंत्रज्ञ | ५८ | लस टोचक |
| ३३ | सी.एस.डी.सहायक | ५९ | प्रसाविका |
| ३४ | ऑर्टिस्ट | ६० | टीन मेकर |
| ३५ | पंच ऑपरेटर | ६१ | वेल्डर |
| ३६ | लिपिक (ब वर्ग) | ६२ | ॲटो इलेक्ट्रिशियन |
| ३७ | कनिष्ठ लेखापरिक्षक | ६३ | असिस्टंट प्लंबर |
| ३८ | मशिन ऑपरेटर | ६४ | रेडीओ ऑपरेटर |
| ३९ | ट्रेनिंग प्रोग्रामर | ६५ | लोहार |
| ४० | अनुरेखक | ६६ | वायरमन |
| ४१ | मार्केर | ६७ | असिस्टंट फिल्ट प्लँट ऑपरेटर/क्लो प्लँट ऑपरेटर |
| ४२ | टेलिफोन ऑपरेटर | | |

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | अ.क्र. | संवर्गाचे नांव |
|---|---|---|---|
| ६८ | मिटर मेकनिक | ८४ | मोटर मेकॅनिक |
| ६९ | ए.सी.ऑपरेटर | ८५ | जोडारी |
| ७० | असिस्टंट एक्स-रे टेक्निशिया | ८६ | टाईम किपर |
| ७१ | लिपिक (क-वर्ग) | ८७ | आचारी |
| ७२ | मिस्त्री | ८८ | फिजीओ थेरेपिस्ट |
| ७३ | रंगारी | ८९ | पंपचालक |
| ७४ | सहायक ए.सी.ऑपरेटर | ९० | वाहनचालक |
| ७५ | बालवाडी शिक्षिका | ९१ | वाहनचालक (अग्निशामक) |
| ७६ | जे.सी.बी.ऑपरेटर | ९२ | सहाय्यक परवाना निरिक्षक |
| ७७ | फायरमन | ९३ | भांडार लिपिक |
| ७८ | जे.सी.बी.ऑपरेटर | ९४ | लॅब अटेंडंट |
| ७९ | सहाय्यक इलेक्ट्रिशियन | ९५ | वॉर्ड क्लार्क |
| ८० | बालवाडी शिक्षिका | ९६ | मिटर रिडर |
| ८१ | इसेक्ट कलेक्टर | ९७ | विशेष शिक्षक (मतीमंद) |
| ८२ | चौकीदार | ९८ | पाणीखाते-फिटर |
| ८३ | डेप्युटी लायब्रेरिया | ९९ | फिल्ड असिस्टंट |

**वर्ग ४ सरळसेवा**

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | अ.क्र. | संवर्गाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | प्लंबर कम फिटर | १९ | असिस्टंट गोठेवाला |
| २ | सुतार | २० | स्लुसमन |
| ३ | गंवडी | २१ | सहाय्यक सर्व्हिस ऑपरेटर |
| ४ | आरक्षक | २२ | असिस्टंट व्हल्कानॉयझर |
| ५ | सुपिअर फिल्ड वर्कर | २३ | पंप ऑपरेटर/पंप चालक |
| ६ | बालवाडी आया | २४ | क्लिनर |
| ७ | अटेंडंट (क्रिडा पेक्षागृह) | २५ | फिल्ड वर्कर |

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | अ.क्र. | संवर्गाचे नांव |
|---|---|---|---|
| ८ | द्वाररक्षक | २६ | हेल्पर |
| ९ | लाईट चेकर | २७ | स्वेच्छक |
| १० | बॅकस्टेज ऑपरेटर | २८ | मजूर |
| ११ | शिपाई | २९ | अटेंडंट |
| १२ | रिक्षा चालक | ३० | न्हावी |
| १३ | वॉर्ड बॉय | ३१ | शस्त्रक्रिया सहाय्यक |
| १४ | ड्रेसर | ३२ | लॅबोरेटरी अटेंडंट |
| १५ | दवाखाना आया | ३३ | लॅब असिस्टंट |
| १६ | बिगारी (सा.बां.) | ३४ | कूली (कार्यशाळा) |
| १७ | बिगारी (पा.पु.) | ३५ | परिचर |
| १८ | बिगारी (उद्यान) | ३६ | सुतार (पाणी पुरवठा) |

शासन निर्णयानुसार रिक्त पदांची विहीत पद्धतीने/सरळसेवेने वर्तमानपत्रात व संकेत स्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात येऊन पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येते.

महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदांपैकी सन २०१४-१५ अखेर एकूण १ पद खुल्या प्रवर्गातून भरण्यात आले आहेत.

| सन | पदनाम | एकुण पदे | महिलांद्वारे भरण्यात आलेली पद संख्या | प्रवर्ग निहाय महिला |
|---|---|---|---|---|
| २०१२-१३ | भुमापक | २३ | ०६ | खुला ५ अनु.जात १ |
| | आरेखक | ०९ | ०१ | खुला-१ |
| २०१३-१४ | वैद्यकिय अधिकारी | १२ | ०४ | खुला-२, इमाव-१ अनु.जमात-१ |
| २०१४-१५ | लॅब असिस्टंट | ०५ | ०२ | खुला-१, इमाव-१ |
| २०१४-१५ | सहयोगी प्राध्यापक | ११ | ०२ | खुला -०१, अनु.जात-०१ |
| २०१४-१५ | अधिव्याख्याता | १९ | ०३ | विमाप्र-०१, खुला-०१, अनु.जात-०१ |

महिलांसाठी आरक्षित खालील पदे रिक्त आहेत.

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | रिक्त पदे (महिलांसाठी) |
|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (नागरी | १४ |
| २ | कनिष्ठ अभियंता विद्युत | २ |
| ३ | भुमापक/सर्व्हेअर | ४ |
| ४ | आरेखक | १ |
| ५ | एक्स-रे-टेक्निशियन | ४ |
| ६ | पर्यवेक्षक/सुपरवायझर | ६ |
| ७ | विधी सहायक | ३ |
| ८ | सिनिअर टेक्निशियन | ७ |
| ९ | वैद्यकिय समाजसेवक | ३ |
| १० | ज्युनियर टेक्निशियन | १० |
| ११ | मराठी लघुलेखक | महिला आरक्षण पुर्ण झाले आहे. |
| १२ | इंग्रजी लघुलेखक | महिला आरक्षण पुर्ण झाले आहे. |
| १३ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | महिला आरक्षण पुर्ण झाले आहे. |
| १४ | लिपिक (ब वर्ग) / कनिष्ठ लेखापरिक्षक | महिला आरक्षण पुर्ण झाले आहे. |
| १५ | अनुरेखक | २ |
| १६ | नर्स मिडवाईफ | महिला आरक्षण पुर्ण झाले आहे. |
| १७ | हेल्थ व्हिजिटर्स | ३ |
| १८ | मिश्रक तथा लिपिक | ९ |
| १९ | मिश्रक | २ |
| २० | जल निर्देशक/जलजीव रक्षक | २ |
| २१ | बालवाडी शिक्षका | महिला आरक्षण रिक्त नाही. पुर्ण झाले आहे. |
| २२ | बहुउद्देशीय कामागार | आरक्षण लागू नाही. |

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | रिक्त पदे (महिलांसाठी) |
|---|---|---|
| २३ | प्रसाविका | महिला आरक्षण रिक्त नाही. पुर्ण झाले आहे. |
| २४ | लिपिक (क-वर्ग | व्यपगतासाठी प्रस्तावित |
| २५ | बालवाडी शिक्षिका | महिला आरक्षण रिक्त नाही. पुर्ण झाले आहे. |
| २६ | भंडार लिपिक | महिला आरक्षण रिक्त नाही. पुर्ण झाले आहे. |
| २७ | विशेष शिक्षक (मतीमंद | महिला आरक्षण रिक्त नाही. पुर्ण झाले आहे. |
| २८ | फायरमन | आरक्षण लागू नाही. |
| २९ | आरक्षक | रिक्त पदे भरण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे. |
| ३० | बालवाडी आया | महिला आरक्षण रिक्त नाही. पुर्ण झाले आहे. |
| ३१ | अटेडंट (क्रिडा पेक्षागृह | २ |
| ३२ | ड्रेसर | ३ |
| ३३ | दवाखाना/आया | ९ |
| ३४ | बिगारी (सा.बां. | १३० शासन निर्देशानुसार व्यपगतची कार्यवाही प्रस्तावित |
| ३५ | बिगारी (पा.पु. | रिक्त पदे भरण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात चालु आहे. |
| ३६ | बिगारी (उद्यान | महिला आरक्षण पुर्ण झाली आहे. |
| ३७ | हेल्पर | शासन निर्देशानुसार व्यपगतची कार्यवाही प्रस्तावित |
| ३८ | मजूर | शासन निर्देशानुसार व्यपगतची कार्यवाही प्रस्तावित |
| ३९ | शस्त्रक्रिया सहाय्यक | २ |
| ४० | लॅब असिस्टंट | ३ |
| | **एकुण** | **२२१** |

शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येते. सेवा प्रवेश नियम अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे. नोंदवही स्वतंत्र ठेवण्यात आलेली नाही. कारण सामाजिक आरक्षणा अंतर्गत समांतर आरक्षणात महिलांसाठी ३०% आरक्षण लागू आहे. अशी समितीस माहिती देण्यात आली.

**ठाणे महानगरपालिका आयुक्त यांची साक्ष :—**

ठाणे महानगरपालिकेला मंगळवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी आयुक्त यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने महानगरपालिकेमध्ये रिक्त पदे भरण्यासाठी कोणत्या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात येते, सन २०१५ मध्ये जाहिरात देण्यात आली होती काय ? सन २०१२-१३ मध्ये भूमापक संवर्गामध्ये महिलांसाठी ९ पदे रिक्त होती व त्यापैकी केवळ ६ पदे का भरण्यात आली आहेत ? महिलांची रिक्त पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही सुरु आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त यांनी राज्य पातळीवरील वर्तमानपत्रामध्ये रिक्त पदे भरण्याची जाहिरात देण्यात येते, आता सन २०१५ मध्ये जाहिरात देणे प्रस्तावित आहे. सन २०१२ ते २०१४ या कालावधीमध्ये अनेक संवर्गातील रिक्त असलेली जवळपास ३६२ पदे भरण्यासाठी जाहिरात देण्यात आली होती. त्यामध्ये महिलांसाठी ११० पदे राखीव होती व त्यापैकी २० पदे भरण्यात आली. अनेक संवर्गातील रिक्त पदांसाठी महिला उमेदवार मिळाले नाही म्हणून पदे रिक्त आहेत. प्रयोग शाळा तंत्रज्ञाची पदे भरण्याबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे, परिचारिका, प्रसाविका, भांडार लिपिक, लॅब असिस्टंटची पदे भरण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे. असे समितीस सांगितले.

समितीने महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आली आहे काय, अशी विचारणा केली.

त्यावर अतिरिक्त आयुक्त यांनी समितीच्या सूचनेनुसार स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात येईल असे समितीस सांगितले.

समितीने महानगरपालिकेत महिला अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा विषयक बाबी हाताळण्यासाठी विशेष कक्ष आहे काय ? तसेच महानगरपालिकेत फक्त दोनच शौचालये आहेत आणि तेथे स्वच्छताही नसते. अशी विचारणा केली.

त्यावर अतिरिक्त आयुक्त यांनी महानगरपालिकेत महिला अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा विषयक बाबी हाताळण्यासाठी विशेष कक्ष आहे. व महिला शौचालयांची नियमित स्वच्छता केली जाईल. तसेच त्यांची काळजी घेतली जाईल. असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे लेखी माहिती दिली :—**

ठाणे महानगरपालिकेत महिलांसाठी राखीव असलेल्या ११० पदांची भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. त्यानुसार विविध संवर्गात ४४ पदे भरण्यात आलेली आहेत. त्याप्रमाणे आया, परिचारिका, प्रसाविका, इत्यादी पदे भरण्यात आली आहेत. सेल्समन, वायरमन, पाणी खाते फिटर, या संवर्गात महिला आरक्षणा अंतर्गत महिला उमेदवार उपलब्ध झाले नाहीत. महिलांसाठी राखीव पदांपैकी २२१ पदे रिक्त होती. त्यापैकी आजतागायत महिला आरक्षणाअंतर्गत खालील पदे नियमानुसार भरण्यात आली आहे.

| अ.क्र | पदनाम | पद संख्या |
|---|---|---|
| १ | अधिष्ठाता | ०१ |
| २ | सहयोगी प्राध्यापक | १+१ – २ |
| ३ | अधिव्याख्याता | ५+५ –१० |
| ४ | वैद्यकिय अधिकारी | १+२ –३ |
| ५ | वैद्यकिय अधीक्षक | ०१ |
| ६ | प्रयोग शाळा तंत्रज्ञ | २+२ –४ |
| ७ | भंडार लिपिक | ०१ |
| ८ | परिचारिका | १३+२३ – ३६ |
| ९ | प्रसाविका | १४+२० – ३४ |
| १० | आरक्षक | ८६+२ – ८८ |
| ११ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | ०१ |
| १२ | विधी सहाय्यक | १+२ – ३ |
| १३ | वॉडबॉय/आया | १४ |
| १४ | विशेष शिक्षिका | ०१ |
| १५ | बिगारी (पापु) | ०४ |
| १६ | मिश्रक | ०४ |
| **एकूण** | | **२०७** |

कनिष्ठ अभियंता या संवर्गातील सेवाज्येष्ठते बाबतचे प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्यामुळे संवर्गातील भरती प्रक्रिया करण्यात आलेली नाही. तसेच बिगारी (सां.बां.विभाग) या संवर्गातील एकुण १३० पदे व्यपगत करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

ठाणे महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने महानगरपालिकेमध्ये महिलांसाठी राखीव असलेल्या ११० पदांपैकी फक्त २० पदे भरली होती. सद्यःस्थिती काय आहे, सर्व पदे भरण्यात आली आहेत का ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी समितीने ठाणे मनपाला समितीने भेट दिली होती त्यावेळी रिक्त असलेल्या पदांपैकी २०७ पदे भरली आहेत. ही पदे १६ संवर्गातील आहेत. पदनिहाय माहिती उपलब्ध करून दिली आहे. तसेच त्यावेळी भरतीची प्रक्रिया सुरु होती, जाहिरात दिली होती. ऑक्टोबर, २०१५ पासून एप्रिल, २०१८ या काळात २०७ पदे भरली आहेत, भरलेल्या पदांच्या १६ संवर्गातील आहेत अशी माहिती समितीला देण्यात आली.

महिलांच्या राखीव पदांसाठी महिला उमेदवार मिळत नाहीत, असे उत्तर देण्यात येते आणि त्या पदांवर पुरुष उमेदवारांची भरती केली जाते. याबाबत विभागाकडून शासन निर्णयाकडे लक्ष जात आहे. आपण जाहिरात देण्यासाठी निवडलेली वर्तमानपत्रेही व्यवस्थित नसतात. २ वेळा जाहिरात द्यावी लागत आहे, महिलांच्या संदर्भात ही अतिशय दुःखाची गोष्ट आहे. त्यामध्ये महिला उमेदवार मिळाल्या नाहीत तर त्या पदांवर पुरुष उमेदवारांची भरती करायची, असे चालत नाही. अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय अधिकारी यांनी यासंदर्भातील मंत्रालयीन प्रशासकीय विभाग महिला व बालविकास हा आहे. त्यामुळे त्यांना जर हा धोरणात्मक निर्णय घ्यायचा असेल तर, त्याकरीता मंत्रिमंडळ मंजुरीकरीता प्रक्रिया करावी लागणार आहे. प्रशासकीय विभागालगतच या संदर्भातील पुढील कार्यवाही करावयाची आहे. एकदा त्यांनी धोरणात्मक बदल केला की, मग तो नगर विकास विभाग, ग्रामविकास विभाग अशा इतर सर्व विभागांना लागू होणार आहे. महिलांसाठी ३ वर्षापर्यंत अनुशेष ठेवायचा आहे. प्रत्येक वर्षी महिला उमेदवार मिळाले नाही तर ३ वर्षात अनुशेष आहे. आणि त्यानंतर इतर प्रवर्गातील महिला घ्यायच्या आहेत. अशी माहिती समितीस देण्यात आली.

**अभिप्राय व शिफारशी :—**

समितीने ठाणे जिल्हा परिषदेला भेट देऊन आयुक्त, ठाणे महानगरपालिका व इतर अधिका-यांची साक्ष दिनांक २७ ऑक्टोबर २०१५ रोजी घेतली होती. उक्त साक्षीच्या वेळी समितीने महानगरपालिकेतील शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थामधील सेवेतील भरतीसाठी महिलांकरीता ३०% जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणाची अंमलबजावणी महानगरपालिकांच्या सेवेमध्ये भरती करताना करण्यात येते काय ? याबाबत माहिती घेतली असता शासन निर्णयानुसार महाराष्ट्र शासन महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि.२५ मे, २००१ अन्वये शासकीय निमशासकीय शासन अनुदानित संस्थामधील सेवांमध्ये भरतीसाठी महिलांकरीता ३०% जागा आरक्षित ठेवणेबाबत आदेश आहेत. त्यानुसार ठाणे महानगरपालिकेमध्ये रिक्त पदे सरळसेवेने भरताना समांतर आरक्षणानुसार ३०% पदे महिलांमधून भरण्यात येतात.

उक्त साक्षीच्या वेळी महिलांकरिता आरक्षित असलेल्या ३०% कोटयातील अनेक पदे रिक्त असल्याचे समितीच्यासमोर आयुक्तांनी विशद केले. सदरची रिक्त पदे भरण्यासाठी वर्तमानपत्रातून जाहिरात दिली जाते. तथापि, महिलांच्या भरती प्रक्रियेत विशेष प्रतिसाद मिळत नसल्यामुळे व पात्र महिला उमेदवार मिळत नसल्याने अनेक पदे रिक्त ठेवली जात आहेत असे साक्षीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले. या अनुषंगाने विभागीय सचिवांच्या साक्षी घेतल्या असता उक्त साक्षीच्यावेळी विभागीय सचिवांनी महिलांसाठी रिक्त असलेल्या ११० पदांपैकी फक्त २० पदे भरली का ? अशी विचारणा केली असता विभागीय आयुक्तांनी सांगितले की, रिक्त २०७ पदे भरली असून सदरची पदे १६ संवर्गामधील आहेत. महिलांच्या राखीव पदांसाठी महिला उमेदवार मिळत नाहीत. त्या पदांवर देखील पुरुष उमेदवारांची भरती केली जाते असेही समितीला सांगण्यात आले. समिती राज्यात अनेक ठिकाणी भेटी देत असताना शासन निर्णयानुसार शासकीय व निमशासकीय आस्थापनांवरील महिलांकरिता ३०% जागा उक्त आस्थापनांनी भरणे, त्याचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असूनही तसे केले जात नाही. त्यामुळे अनेक आस्थापनांमधील महिलांकरीता राखीव असलेल्या ३०% पदांपैकी बरीच पदे रिक्त ठेवली जातात. वर्तमानपत्रात जाहिरात देऊनही पात्र उमेदवार मिळत नाहीत. यासबबी खाली सदरची पदे रिक्त ठेवली जातात. सदरची बाब गंभीर असून यामुळे महिलांकरीता राखीव ठेवण्यात आलेल्या जागांचा मुळ उद्देश सफल होताना दिसत नाही. म्हणून ठाणे महानगरपालिकेने आयुक्त व सचिवांच्या साक्षीत सांगितलेल्या माहितीवर ठाणे महानगरपालिकेत महिलांकरीता आरक्षीत असलेली पदे तातडीने भरण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही

करावी. **महिलांना न्याय देण्याच्या दृष्टीने शासन निर्णयानुसार ३०% जागा कोणत्याही परिस्थितीमध्ये भरण्यात याव्यात व त्यांची रिक्त पदे ठेवण्यात येऊ नयेत अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

**तसेच समितीच्या भेटीच्या वेळी असेही सांगण्यात आले की, महिलांकरीता ३०% जागा आरक्षित ठेवण्यात आल्याची नोंदवही ठेवली जात नाही. ही बाब गंभीर असून ज्या प्रवर्गाचे आरक्षण नमूद आहे. त्या प्रवर्गासाठी नोंदवही ठेवणे बंधनकारक करावे, अशीही समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी.**

**२.२ ठाणे महानगरपालिकेचे गत ३ वर्षातील वर्षनिहाय अंदाजपत्रक :—**

समितीने महानगरपालिकेचे गत ३ वर्षातील (सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५) वर्षनिहाय अंदाजपत्रक किती रक्कमेचे आहे ? शासन धोरणानुसार प्रत्येक महानगरपालिकेत महसूली व आस्थापना खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५% निधी महिला व बालकल्याण विभागासाठी राखून ठेवण्यात येतो. त्या अनुषंगाने मागील ३ वर्षात सदरहू ५% निधी कसा खर्च करण्यात आला आहे ? महानगरपालिकेमध्ये महिलांचे सबलीकरण करण्याकरीता तसेच आर्थिकदृष्टया मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरीता देण्यात येणा-या सोयी-सवलती इत्यादी योजनांबाबत माहिती देण्यात यावी ? उक्त योजनांवर गत ३ वर्षात वर्षनिहाय व योजनानिहाय एकूण किती खर्च झाला ? महानगरपालिकेच्या एकूण उत्पनाच्या किती टक्के रक्कम महिलांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याबाबत खर्च करण्यात येते याची माहिती देण्यात यावी ? तसेच, या योजनांची माहिती गरजू महिलांपर्यत पोहचविण्यासाठी व त्यांनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी स्वतंत्र अशी योजना महानगरपालिकेकडे आहे काय? महिलांच्या आरोग्याबाबत महानगरपालिका कोणत्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात याची सविस्तर माहिती द्यावी ? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी ठाणे महानगरपालिकेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :—**

(अ) महानगरपालिकेचे गत ३ वर्षातील वर्षनिहाय वार्षिक अंदाजपत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | महापालिका उत्पन्नाचा तपशील |
|---|---|---|
| १ | २०१२-१३ | रु.१०७८.३७ कोटी |
| २ | २०१३-१४ | रु.११५४.३८ कोटी |
| ३ | २०१४-१५ | रु.१३७०.६२ कोटी |

(ब) शासन धोरणानुसार महानगरपालिकेत महसूली व आस्थापना खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५% निधी महिला व बालकल्याण विभागासाठी खालीलप्रमाणे राखून ठेवण्यात आला आहे.

| अ.क्र. | वर्ष | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|
| १ | २०१२-१३ | रु.२२.१२ कोटी |
| २ | २०१३-१४ | रु.२३.८४ कोटी |
| ३ | २०१४-१५ | रु.३०.४४ कोटी |

ठाणे महानगरपालिकेमधील समाज विकास विभागाकडे महिला व बालकल्याण योजनेंतर्गत मा.महासभा ठराव क्र.५२८, दि.२०/२/२०१४ अन्वये योजना राबविल्या जातात.

सन २०१२-१३

| अ.क्र | योजनेचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | शिलाई मशिन वाटप करणे | १६,९९,००० |
| २ | ठाणे महापालिकाकरीता समुपदेश केंद्र | १,५२,००० |
| ३ | स्टॉल व विक्री प्रदर्शन | २,५०,००० |
| ४ | सावित्रीबाई फुले जयंती योजना | २,४८,६५० |
| ५ | महापालिका क्षेत्रात आरोग्य शिबीर | २,४७,८०० |
| ६ | महापालिका शाळातील १ ते ७ वी मधील विद्यार्थ्यांच्या पालकांना उपस्थिती भत्ता | ३०,००,००० |
| ७ | सहा.आयुक्त माध्यमिक शिक्षण विभाग | ५०,००,००० |
| ८ | प्रकल्प संचालक व समूह संघ कार्यशाळा | ९३२ |
| ९ | महिला व मुलींच्या क्रिडा स्पर्धा योजनेबाबत | ३,१५,००० |
| १० | विधवा घटस्पोटींकरीता | ५,००० |
| ११ | स्वयंरोजगाराकरीता | ९,२०० |
| १२ | बचत गट अनुदान | २,९०,००० |

| अ.क्र | योजनेचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १३ | सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत माहिती पत्रके | ११,००० |
| १४ | देशात परदेशात प्रशिक्षण | २५,००० |
| १५ | विधवा /घटस्फोटित अनुदान | ३०,००० |
| १६ | अपघाती निधन | २५,००० |
| १७ | बचत गट अनुदान | १,४०,००० |
| १८ | मुलींच्या विवाहासाठी | १०,००० |
| १९ | स्वयंरोजगार अनुदान | १,३५,००० |
| २० | फ्लेक्स बॅनर योजना प्रसिद्धी | २२,१७६ |
| २१ | महापालिका माध्यम शाळेतील विद्यार्थ्यांना कराटे प्रशिक्षण | ६,१४,३७५ |
| | **एकूण** | **३,१२,४८,३००** |

सन २०१२-१३ मध्ये उपरोक्त योजनाद्वारे एकूण ७९५२ लाभार्थींना लाभ देण्यात आला.

सन २०१३-१४

| अ.क्र | योजनेचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | बचत गट अनुदान | ३२,३०,००० |
| २ | महिलेच्या मुलीच्या लग्नाकरीता अनुदान | २०,००० |
| ३ | स्वयंरोजगार अनुदान | ८७,४०,४११ |
| ४ | विधवा घटस्फोटित महिलांना स्वयंरोजगार अनुदान | ७१,९०,३७२ |
| ५ | जिजामाता आधार योजना | ८,२५,००० |
| ६ | उच्च शिक्षण | ६०,८४२ |
| ७ | सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना | ४,१८,३२० |
| ८ | रात्रनिवारे | ९,९७,५३६ |
| ९ | आंतरजातीय विवाह | ७५,००० |

| अ.क्र | योजनेचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १० | बालीका समुद्धी योजना | ३,८०,००० |
| ११ | कुष्ठ रुग्ण अनुदान | २८,००,००० |
| १२ | क्रिडा स्पर्धा अनुदान | ५,३२,३६० |
| १३ | मुलींना सायकल वाटप | ३८,३८,३६० |
| १४ | योजना प्रसिद्धी व हॅण्ड बिल छपाई | १६,५०० |
| १५ | शिक्षण मंडळाकडील सन २०१२-१३ मधील (१) प्राथमिक शाळेसाठी फर्निचर पुरविणे मे. आकृती एन्टरप्रायझेस रु.१७,१८,६०० | १,५९,१४,९६७ |
| १६ | पौष्टीक आहार पुरविणेबाबत मे.प्रकाश ट्रेडिंग रु.१०,०३,८३,८६१ | |
| १७ | विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका उत्तर पत्रिका पुरविणे मे.सदानंद एन्टर प्रायझेस रु.३८,१२,५०६ | |
| | **एकूण** | **४,५०,४९,३०८** |

सन २०१३-१४ मध्ये उपरोक्त योजनाद्वारे एकूण ३१९४ लाभार्थींना लाभ देण्यात आला.

| अ.क्र | योजनेचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | पाळणाघर माहे (ऑगस्ट, २०१३ ते फेब्रुवारी २०१४ पर्यंत) | ६६,००० |
| २ | कुष्ठ रुग्णासाठी मार्गदर्शन शिबीर कोपरी येथे ७ म.का.सं.सं.) | ४,५४,२०० |
| ३ | गुरुदेव दत्त महिला बचत गट मुलींसाठी स्पर्धा आयोजन (सन २०१२-१३) वर्तकनगर | २५,००० |
| ४ | गुरुदेव दत्त महिला बचत गट मुलींसाठी स्पर्धा आयोजन (सन २०१२-१३) वर्तकनगर | २५,००० |
| ५ | राणी लक्ष्मीबाई महिला व बचत गट मुलींसाठी स्पर्धा आयोजन (सन २०१२-१३) रायलादेवी | २५,००० |

| अ.क्र | योजनेचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ६ | हेल्पिंग हॅण्ड ऑर्गनायझेशन शिलाई मशीन ओव्हर ऑइलिंग ५०% अदा | ७३,५९४ |
| ७ | पाळणाघर आवश्यक स्थापत्य कामे (श्री.नामदेव म.का.स.सं) | ३,९८,७२५ |
| ८ | हेल्पिंग हॅण्ड ऑर्गनायझेशन शिलाई मशीन ओव्हर ऑईलिंग ५०% अदा | ७३,५९४ |
| ९ | योगो फिल्मस (Audia Add) | १,४५,००० |
| | **मंजूर रक्कम** | **२०,००,००,००००** |
| | **एकूण खर्च** | **३,५४,५४,४९४** |
| | **शिल्लक** | **१६,४५,४५,५०६** |

योजनांवर सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षात योजनेनिहाय झालेला खर्चाबाबत तपशिल खालीलप्रमाणे आहे :–

| अ.क्र | आर्थिक वर्ष | एकूण खर्च |
|---|---|---|
| १ | २०१२-१३ | रु. ३,१२,७५,९६० |
| २ | २०१३-१४ | रु. १०,९५,५६,६२१ (शिक्षण मंडळ) |
| | | रु. ३,१२,७३,३०० (म. बा. योजना) |
| | | एकूण रु. १४,०८,२९,९२१ |
| ३ | २०१४-१५ | रु. ३,५४,५४,४९४ |

महानगरपालिकेच्या एकूण महसुलातून बांधील खर्च वजा जाता निव्वळ महसूल ५% इतकी तरतूद करण्यात येते ते खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | सन | टक्केवारी खर्च |
|---|---|---|
| १ | २०१२-१३ | ३% |
| २ | २०१३-१४ | ४.२५% |
| ३ | २०१४-१५ | ३.४७% |

उपरोक्त नमुद टक्केवारी खर्च महिलांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याबाबत खर्च करण्यात येते.

महानगरपालिकेमार्फत महिला व बालकल्याण योजना समाज विकास विभागामार्फत राबविल्या जातात. योजनांची जाहिरात स्थानिक व राज्यस्तरीय वर्तमानपत्रात देऊन महिला व मुलींकडुन फॉर्म घेऊन त्यांची छाननी करून तसेच पात्र/अपात्र ठरवून लाभ दिला जातो. सदर योजना महापालिकेकडील सर्व प्रभाग समिती स्तरावरुन राबविण्यात येतात. सदरच्या जाहिरातीचे बॅनर लावले जातात. तसेच स्थानिक नगरसेवकांना त्यानुसार कळवून जास्तीत जास्त महिलांना लाभ घेणेबाबत सुचित केले जाते.

ठाणे महानगरपालिकेमार्फत महिला करीता पुढील योजना राबविण्यात येतात.

(१) जननी शिशु सुरक्षा योजना.

(२) जननी सुरक्षा योजना.

(३) कुंटूब शस्त्रक्रिया मोफत केली जाते.

(४) सी.आ.वाडीय येथे महिलांकरीता Gyanocological Work Station कार्यान्वित करण्यात येत आहे.

**ठाणे महानगरपालिका आयुक्त यांची साक्ष :—**

ठाणे महानगरपालिकेला मंगळवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी आयुक्त यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने महानगरपालिकेचे अंदाजपत्रक सन २०१२-१३ मध्ये १०७८.३७ कोटी रुपये सन २०१३-१४ मध्ये ११५४.३८ कोटी रुपये आणि सन २०१४-१५ मध्ये १३७०.६२ कोटी रुपये होते. महानगरपालिकेने महसुली व आस्थापना खर्च वगळता महिलांच्या कल्याणकारी योजना राबविण्यासाठी ५ टक्के प्रमाणे किती निधी राखून ठेवला आहे ? अशी समितीने विचारणा केली :

त्यावर आयुक्त यांनी सन २०१२-१३ मध्ये महानगरपालिकेचे एकुण उत्पन्न १,०७८.३७ कोटी रुपये होते.एकुण बांधील खर्च ६३५.९५ कोटी रुपये होता आणि बांधील खर्च वजा जाता निव्वळ महसुली उत्पन्न ४४२.४२ कोटी रुपये होते. ५ टक्के प्रमाणे २२.१२ कोटी रुपये होतील सन २०१३-१४ मध्ये एकूण उत्पन्न ११५४.३८ कोटी रुपये होते. एकूण बांधील खर्च ६७७.६५ कोटी रुपये होता आणि बांधील खर्च वजा जाता निव्वळ महसुली उत्पन्न ४७६.७३ कोटी रुपये होते. ५ टक्के प्रमाणे २३.८४ कोटी रुपये होतात. सन २०१४-१५ मध्ये एकुण उत्पन्न १३७०.६२ कोटी रुपये होते. एकुण बांधील खर्च ७६१.८६ कोटी रुपये होता आणि बांधील खर्च वजा जाता निव्वळ

महसुली उत्पन्न ६०८.७६ कोटी रुपये होते. ५ टक्के प्रमाणे ३०.४४ कोटी रुपये होतात. सन २०१२-१३ मध्ये १३.२७ कोटी रुपये, सन २०१३-१४ मध्ये २०.२५ कोटी रुपये आणि सन २०१४-१५ मध्ये २१.१३ कोटी प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. मागील ३ वर्षातील खर्चाची टक्केवारी अनुक्रमे ६० टक्के, ८५ आणि ६९ टक्के आहे. असे समितीस सांगितले.

समितीने सन २०१२-१३ मध्ये १३.७० कोटी रुपये खर्च झाल्याचे नमूद केले आहे. जो खर्च झालेला आहे त्याची विगतवारी समितीला द्यावी. अशी विचारणा केली.

त्यावर अतिरिक्त आयुक्त यांनी सन २०१२-१३ मध्ये महिला व बाल कल्याण कार्यक्रमासाठी १२.२१ कोटी रुपये, प्राथमिक शिक्षण विभागाकडील विद्यार्थ्यांसाठी विविध योजनांसाठी ७५ लाख रुपये, बालवाडी अल्पोपहार यासाठी २१ लाख रुपये, उद्यानात खेळणी बसविणेकरीता १० लाख रुपये असे एकूण १३.२७ लाख रुपये खर्च झालेले आहेत. सन २०१३-१४ मध्ये महिला व बाल कल्याण कार्यक्रमासाठी ४.५० कोटी रुपये, प्राथमिक शिक्षण विभागाकडील विद्यार्थ्यांसाठी विविध योजनांसाठी १३.४१ कोटी रुपये, बालवाडी अल्पोपहार यासाठी ४ हजार रुपये, उद्यानात खेळणी बसविणेकरीता २.३० कोटी रुपये असे एकूण २०.२५ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने सन २०१३-१४ मध्ये सावित्रीबाई फुले जयंती योजनेवर २,४८,६५० रुपये ठाणे महानगरपालिका शाळेतील इयत्ता १ ली ते ७ वी मधील विद्यार्थ्यांच्या पालकांना उपस्थिती भत्ता देणे यावर ३० लाख रुपये खर्च केल्याचे नमूद केले आहे. शासन निर्णयानुसार ५ टक्के निधीतून या योजनांवर खर्च करता येतो काय ? नगर विकास विभागाने दिनांक ८ नोव्हेंबर, २०१० रोजी महानगरपालिका व नगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती यामध्ये महिला व बाल कल्याण समितीने राबवयाच्या योजनांच्या संदर्भात शासन निर्णय निर्गमित केला आहे. शासन निर्णयामध्ये एकूण १५ मुद्दे नमुद केलेले आहेत. महानगरपालिकेने शासन निर्णयात नमुद केलेल्या १५ बाबींवर ५ टक्के निधी खर्च करावयाचा असतो. परंतु त्याप्रमाणे खर्च झाल्याचे दिसत नाही. ठाणे महानगरपालिकेत मागील दोन वर्षे महिला व बाल कल्याण समिती स्थापन झाली नव्हती. अशी विचारणा केली.

त्यावर अतिरिक्त आयुक्त यांनी कोर्टात लिटिगेशन होते. त्यामुळे महिला व बाल कल्याण समिती गठीत करण्यास विलंब झालेला आहे. नगरसेविकांनी सांगितले की, निधी खर्च होत नाही. परंतु त्यामध्ये वैयक्तिक लाभाच्या योजनांचा समावेश होता. नगरसेविकांचे म्हणणे होते की, बचत गट स्थापन झाल्यानंतर त्यांना निधी द्यावा. बचत गट स्थापन करून ६ महिन्यात त्याचे ग्रेडिंग करावे आणि बचत गट सक्षम झाला तर त्याला निधी द्यावा. असे समितीस सांगितले.

समितीने विधवा, घटस्फोटित महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी कोणतीच योजना राबविली नाही. आपण त्यांना शिलाई मशीन, कांडण मशीन उपलब्ध करून देण्यात आले नाही. अशी समितीने विचारणा केली.

त्यावर अतिरिक्त आयुक्त यांनी निराधार, निराश्रीत, विधवा, घटस्फोटित, परितक्त्या महिलांना व आर्थिक दुर्बल घटकातील महिलांनी स्वयंरोजगारासाठी मान्यता प्राप्त बँकेकडून कर्ज पुरवठा घेतल्यास कर्जाच्या १० टक्के किंवा जास्तीत जास्त २५ हजार रुपये यापैकी कमी असणारी रक्कम अनुदान स्वरुपात देण्यात येते.

समितीने कोर्टात लिटिगेशन केव्हा झाले होते ? महिला बाल कल्याण समिती गठीत करु नये या संदर्भात कोर्टाने स्टे दिला होता काय ?

त्यावर विधी सल्लागार यांनी माननीय उच्च न्यायालयाने आदेश दिले होते त्यास माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये आव्हान दिले होते व सदर प्रकरणी स्टे देण्यात आला होता.

समितीने अतिरिक्त आयुक्तांनी रुपये १३ कोटी रुपया पेक्षा जास्त खर्च केले, सदरील खर्च कोणाच्या आदेशाने करण्यात आला ? अशी विचारणा केली.

त्यावर अतिरिक्त आयुक्त यांनी महिला व बालकल्याण समिती स्थापन करण्यात आली नसेल तर त्याबाबतचे सर्व अधिकार महासभेकडे असतात व महासभेच्या मान्यतेने सदरील खर्च करण्यात आला आहे. असे समितीस सांगितले.

त्यावर समितीने महानगरपालिकेने १० हजार रुपये अनुदानाची योजना बंद करून मान्यता प्राप्त बँकेकडून घेतलेल्या कर्जावर अनुदान देण्याची नवीन योजना सुरु केली आहे, ती योजना कोणती आहे ? देशात परदेशात प्रशिक्षण योजनेवर २५, ००० रुपये खर्च केला आहे, ते प्रशिक्षण कोठे देण्यात आले होते ? अशी समितीने विचारणा केली.

त्यावर अतिरिक्त आयुक्त यांनी महानगरपालिका सन्माननीय सदस्यांची मागणी होती की, १० हजार रुपये अनुदान थेट लाभार्थ्यांना देण्यात यावे. देशात परदेशात प्रशिक्षण योजनेकरीता सन २०१२-१३ मध्ये एकच लाभार्थी प्राप्त असून सदर योजनेवर २५, ००० रुपये खर्च करण्यात आला आहे.

समितीने महिला व नगरसेविकांनी माहिती दिली होती की लाभार्थ्यांना योजनांची माहिती पुरविली जात नाही ? महिला व बालकल्याण योजनेंतर्गत २२.१२ कोटी रुपये निधीची तरतूद असताना केवळ ३ कोटी १२ लाख रुपये योजनेवर खर्च केले, शिल्लक निधी कोणत्या योजनासाठी वापरण्यात आला ? तसेच प्राथमिक शिक्षण विभागाकडील विद्यार्थ्यांसाठी विविध योजनावर ०.८७ लाख रुपये खर्च करण्यात आला आहे, तो शिक्षण विभागाच्या योजनेतून केला आहे काय ? तसेच योजनांवर १३.४१ कोटी रुपये खर्च कशा प्रकारे केला आहे, त्यामध्ये कोणत्या योजनांचा समावेश आहे ? शिक्षण मंडळासाठी महापालिका किती तरतूद करते ? अशी विचारणा केली.

त्यावर अतिरिक्त आयुक्त यांनी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देवून योजनांची माहिती पुरविण्यात येते,त्याबाबतची कात्रणे उपलब्ध आहेत. महिला व बालकल्याण समिती कार्यक्रमातील योजनांवर १२ कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे. तसेच सदरील खर्च महिला व बालकल्याण विभागाच्या योजनेतून केला आहे. अशी समितीला माहिती दिली. शिक्षण विभागाकडून कल्याणकारी योजनावर खर्च करण्यात आला असून सर्व योजना आयुक्त यांच्या मान्यतेने समाज विकास विभागाकडे वर्ग करण्यात आल्या होत्या. त्यानुसार विद्यार्थीनींना वॉटर, बॅग, पुस्तके, शाळेतील साहित्य इत्यादी योजना राबविण्यात आल्या होत्या. तसेच शिक्षण या बाबीवर १३.४१ कोटी रुपये महानगरपालिकेने खर्च केले आहेत. अशी माहिती सांगण्यात आली.

समितीने मागील ३ वर्षात किती निधी अखर्चित राहिलेला आहे ? तसेच निधी शिल्लक आहे का व सदरचा निधी वर्ग केलेला आहे का ? महापालिकेने सन २०१२-१३ मध्ये ५ टक्के प्रमाणे २२.१२ कोटी रुपये महिलांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करावायास पाहिजे होते. जी तरतूद करण्यात आलेली आहे ती खर्च व्हावयास पाहिजे. अशी समितीने विचारणा केली.

त्यावर समितीने दिनांक ८ नोव्हेंबर, २०१० रोजी नगर विकास विभागाने शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.त्यातील बहुतांश योजना यामध्ये कव्हर झालेल्या आहेत. निधी वर्ग केलेला नाही. सन २०१३-१४ मध्ये महिला व बाल कल्याण कार्यक्रमावर ४.५० कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. सन २०१३-१४ मध्ये २३.८४ कोटी रुपये तरतूद करण्यात आली होती. यापैकी २०.२५ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी अतिरिक्त आयुक्त, ठाणे यांनी खालीलप्रमाणे लेखी माहिती दिली :—**

दिनांक ८ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयानुसार सन २०१२-१३ सन २०१३-१४ व सन २०१४-१५ महिला व बालकल्याण निधीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :—

| अ.क्र | सन | एकूण तरतूद (कोटीत) | एकूण खर्च (कोटीत) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २०१२-१३ | २२.१२ | १३.२७ | ६०% |
| २ | २०१३-१४ | २३.८४ | २०.२५ | ८४.९४% |
| ३ | २०१४-१५ | ३०.४४ | २१.१३ | ६९.४१% |

सन २०१५-१६ सन २०१६-१७ व सन २०१७-१८ महिला व बालकल्याण निधीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | सन | एकूण तरतूद (कोटीत) | एकूण खर्च (कोटीत) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | २९.२४ | १८.०९ | ६१.८६% |
| २ | २०१६-१७ | ३२.३६ | २२.२६ | ६८.७८% |
| ३ | २०१७-१८ | २७.७२ | ३१.५१ | ११३.६७% |

पुढील वर्षात महिला व बालकल्याण योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी व जास्तीत जास्त खर्च करणेसाठी निर्देश देऊन योग्य ती दक्षता घेण्यात येत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

ठाणे महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी दिनांक ८ नोव्हेंबर, २०१५ रोजी शासन निर्णयानुसार खर्च केल्याचे सांगितले आहे. आपला खर्च सन २०१२-१३ मध्ये झाला आहे. मात्र सन २०१५ चा शासन निर्णय लावत नाही ? सन २०१५ चा ५ टक्के शासन निर्णय कसा लागेल ? तसेच कोणकोणत्या योजनांवर खर्च केला त्याची समितीला माहिती द्यावी. अशी विचारणा केली.

त्यावर अतिरिक्त आयुक्त यांनी सन १९९३ चा शासन निर्णय आहे. तारखेच्या बाबतीत टायपोग्राफीकल एरर आहे. तो ५ टक्क्यांचा शासन निर्णय आहे. महिला बालकल्याण विभागासाठी जी ५ टक्के तरतूद ठेवण्यात येते त्याचे दोन भाग करण्यात येतात. पहिला भाग म्हणजे महिलांकरीता वैयक्तिक लाभाच्या योजना म्हणजे थेट लाभाच्या योजना आणि दुसरा भाग म्हणजे महिलांकरीता स्वच्छतागृह बांधणे, बचत गटासाठी गाळे काढणे, वर्कशेड तयार करणे. अशा दोन स्वरुपाच्या योजनांमध्ये काम करतो, सन २०१७-१८ मध्ये महिलांना आर्थिकदृष्टया सबळ करण्यासाठी त्यांना अत्याधुनिक साहित्य खरेदी करण्यासाठी मदत देण्यात येते. पंतप्रधान आणि राज्य शासनाच्या सूचनेप्रमाणे त्यांना डीबीटी करण्यात येते. त्यांच्या खात्यावर ईसीएसच्या माध्यमातून रक्कम जमा करण्यात येते. ज्या महिला स्वतःच्या घराच्या मागे किंवा छतावर परसबाग करतात अशा १९१ महिलांना प्रत्येकी १५ हजार रुपयांचे अनुदान दिलेले आहे. असे समितीस सांगितले.

समितीने महिला बचत गटांना आर्थिक सहाय्य केले जाते काय तसेच त्यांना गाळे उपलब्ध करून दिले आहेत काय ?

त्यावर अतिरिक्त आयुक्त यांनी रोजगारासाठी दुर्बल घटकांतील १४८ महिलांना घरघंटी दिलेल्या आहेत. त्यांच्या खात्यावर ही रक्कम जमा केलेली आहे. त्यासाठी ट्रायपार्टी ॲग्रीमेंट केले. घरघंटी खरेदीची प्रक्रिया महिलेने करावयाची आहे. महानगरपालिकेने फक्त तांत्रिक मदत केली. महिलांना त्यांच्या मर्जीनुसार कोणत्याही कंपनीची घरघंटी घेण्याची मुभा दिली. अशा प्रकारे घरघंटी घेऊन त्यांनी कामही सुरु केलेले आहे. तसेच एकूण १३५ महिला बचत गटांना पापड मशीन, मिरची कांडप मशील, शेवया मशीन, मसाला ग्राईंडर मशीन दिलेल्या आहेत. त्याशिवाय ज्या महिला स्वःताचा व्यवसाय करतात त्यांना टेक्निकली इनपूट देणे जसे अकाऊंट कसे लिहिले पाहिजे. बुक किपिंग कसे केले पाहिजे, पॅकेंजिंग कसे केले पाहिजे, प्रोडक्ट कसे डिस्प्ले केले पाहिजे असे रिटेल मॅनेजमेंटमध्ये प्रशिक्षण ४५ महिलांना दिलेले आहे. महिला ज्या व्यवसाय करु इच्छितात त्यांना त्या त्या व्यवसायामध्ये व्हॅल्यू ॲडीशनचे काम केलेली आहे.

समितीने महिलांसाठी ५ टक्के निधी हा समितीचे बॅनर, जाहिरात, पुस्तक छापणे यावर खर्च झाला म्हणून समितीने त्यावेळी आक्षेप घेतला होता. दिनांक ८ नोव्हेंबर, २०१० चा शासन निर्णय पहावा. त्यामध्ये १५ गोष्टी दिलेल्या आहेत त्यापैकी एकही गोष्ट महानगरपालिकेकडुन झाली नव्हती. त्या शासन निर्णयातील कामांची यादी नुसार अंगणवाडी केंद्रातील मुला-मुलींकरीता आवश्यक शैक्षणिक साहित्य खरेदी करणे. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था निर्माण करणे, शौचालय बांधकाम करणे, मुलांना पोषक आहार पुरविणे, शुन्य ते तीन वर्षापर्यंतच्या मुलांकरीता क्रॅंची किंवा

डेकेअर सेंटर बांधणे व ते क्रियान्वीत करणे, पाळणाघर चालविणा-या अशासकीय संस्थांना अर्थसहाय्य करणे, गरोदर महिलांसाठी तसेच शालेय विद्यार्थी व अंगणवाडी विद्यार्थी यांची वैद्यकीय तपासणी व औषधोपचार करणे. मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना राबविणे. समितीने यवतमाळ येथे भेट दिली होती तेव्हा महिलांकीरता प्रसुती गृह नव्हते असे सांगण्यात आले होते. महिलांसाठी प्रसुतीगृह बांधणे अथवा श्रेणीवाढ करणे, विस्तारीकरण करणे, मुलींना/महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे, काम करणा-या महिलांसाठी वसतिगृह बांधणे, शिकणा-या मुलींकरीता वसतिगृह बांधणे, पोलिओग्रस्त किंवा अपंग मुलांना औषधे पुरविणे, महिलांसाठी समुपदेशक केंद्र चालविणे, हेल्पलाईन चालविणे, विधी सल्ला केंद्र चालविणे, बीपीएल खालील मुलींची शाळा गळतीचे प्रमाण थांबविण्याबाबत प्रोत्साहनपर दैनिक उपस्थिती भत्ता देणे, मुलींच्या सार्वजनिक शाळेत विविध क्रिडा सुविधा निर्माण करणे. या गोष्टी का करण्यात आल्या नव्हत्या. तसेच महानगरपालिका उक्त कामांमध्ये कमी कामे करण्यात आलेली आहेत. अशी विचारणा केली.

त्यावर अतिरिक्त आयुक्त यांनी समितीने २०१५ च्या अखेरीस महानगरपालिकेस भेट दिली होती. त्यावेळी समितीने दिलेल्या सूचनेनुसार महानगरपालिकेने योजना राबविण्याच्या पद्धतीमध्ये बदल केलेला आहे जसे की, महिलांसाठी समुपदेशन केंद्र सुरु करणे, हेल्प लाईन करणे, विधी सल्ला केंद्र चालविणे यासाठी तरतुदी ठेवल्या आहेत. त्याच बरोबर नोकरीवर जाणा-या महिलांच्या मुलाकरीता पाळणाघर चालविणे ही योजना घेतलेली आहे. ठाणे महानगरपालिकेने महिलांकरीता राबविलेल्या योजनांची पुस्तिका काढलेली आहे. समितीने ज्या सुचना केल्या होत्या त्यामध्ये थोडाफार बदल करून त्या रिड्राफ्ट करून त्याची पुस्तिका तयार केलेली आहे. समितीने २०१५ मध्ये भेट दिली होती. त्यावेळी काम कमी झाले होते. परंतु मागील सात वर्षात जास्त खर्च झालेला आहे. महिला व दिव्यांगासाठी खूपच खर्च झालेला आहे. तसेच दहा प्रभागामध्ये ही कामे करीत आहोत. तसेच धुणी-भांडी करणा-या महिलांना मदत करण्याबाबत सुचना दिल्या होत्या. ज्या महिला घरकाम करतात परंतु भाडयाच्या घरामध्ये राहतात अशा महिलांना व्हॅल्यू ॲडीशन म्हणून महानगरपालिकेने त्यांचे घरभाडे शेअर केलेले आहे. घराचे ॲग्रीमेंट घेऊन भाडयाची काही रक्कम घरमालकाला दिलेली आहे. अशी एकूण ४८५ महिलांना मदत केलेली आहे. महिलांसाठीच्या योजना राबविण्यावरील खर्च ६४ टक्के झालेला आहे. तर वैयक्तिक योजनांवरील खर्च १०० टक्क्यांपेक्षा जास्त झालेला आहे. त्यामध्ये प्रसिद्धीचा खर्च समाविष्ट नाही. ज्या महिलांना पोलिसात भरती व्हावयाचे आहे त्याच्या प्रशिक्षणासाठी देखील तरतूद केलेली आहे. पोलिस भरतीपूर्वी महिलांना प्रशिक्षण देण्यासाठी मदत करणे म्हणजे त्यांना पोलिस भरती प्रवेशासाठी मदत होईल. एखादी महिला आर्मीमध्ये भरती होत असेल तर अशा महिलांना देखील मदत केलेली आहे.

महिला कॉम्पीटेटिव्ह परिक्षेची तयारी करीत असतील तर त्यांनी एखाद्या क्लासमध्ये ॲडमिशन घेतले असेल किंवा त्यांनी संस्थेची माहिती दिली तर त्यांची फी भरण्याची व्यवस्था केलेली आहे. थोडक्यात महिलांना ज्या क्षेत्रामध्ये काम करावयाचे आहे त्या क्षेत्रामध्ये त्यांना मदत करण्याचा महानगरपालिकेने प्रयत्न केलेला आहे.

**अभिप्राय व शिफारशी :-**

समितीने ठाणे महानगरपालिकेला भेट देऊन शासन धोरणानुसार प्रत्येक महानगरपालिकेत महसूली व आस्थापना खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५% निधी महिला व बालकल्याण विभागासाठी राखून ठेवण्यात येतो. त्या अनुषंगाने मागील ३ वर्षात सदरहू ५% निधी कसा खर्च करण्यात आला किंवा कसे? याबाबत माहिती घेतली असता समितीला सन २०१२-१३ मध्ये एकूण रुपये १०७८.३७ कोटी पैकी रुपये २२.१२ कोटी प्रत्यक्ष खर्च करण्यात आला, सन २०१३-१४ मध्ये एकूण रुपये ११५४.३८ कोटी पैकी रुपये २३.८४ कोटी खर्च करण्यात आला. तर सन २०१४-१५ मध्ये एकूण रुपये १३७०.६२ कोटी पैकी रुपये ३०.४४ कोटी खर्च करण्यात आल्याचे समितीला लेखी माहितीत सांगण्यात आले. तसेच यामधील ३ वर्षाची टक्केवारी अनुक्रमे ६०%, ८४.९४% व ६९.४१% असे सांगण्यात आले.

तथापि, सदरचा खर्च हा शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे केलेला नसून अन्य योजनांवर केला असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. त्यातही शिक्षण विभागात या खर्चाचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. आजही ठाणे महानगरपालिकेने शासन निर्णयानुसार सदरहू ५% निधी खर्च दिनांक ८ नोव्हेंबर २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार केलेला दिसून येत नाही. याचाच अर्थ महिलांसाठी राबविण्यात येणा-या योजनांची देखील प्रभाविपणे अंमलबजावणी ठाणे महानगरपालिकेकडून करण्यात आलेली नाही. व सदरचा खर्च उक्त शासन निर्णयानुसार केलेला नसल्यामुळे इतर योजनांवर केलेला आहे. तो नियमांच्या कक्षेत राहून केला आहे असे समितीला दिसून येत नाही. त्यामुळे ज्या उद्देशाने दिनांक ८ नोव्हेंबर, २०१० रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला त्या मुळे उद्देशाचे ठाणे महानगरपालिकेकडून पालन होताना दिसून येत नाही.

**सबब याप्रकरणी ठाणे महानगरपालिकेकडून शासनाच्या निर्णयाचे पालन झाले नसल्यामुळे याबाबतची चौकशी करून संबंधित अधिकारी दोषी असल्याचे आढळल्यास त्यांच्याविरुद्ध नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच यापुढे ठाणे महानगरपालिकेने कोणत्याही परिस्थितीत शासन निर्णयाचे उल्लंघन न करता महिलांच्या योजनांवरच ५% प्रमाणे खर्च करावा अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात कळविण्यात यावी.**

## ३. ठाणे जिल्हापरिषद

### ३.१ ठाणे जिल्हापरिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत.

दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ रोजी महिलांचे हक्क व कल्याण समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी जिल्हापरिषद, ठाणे यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली.

समितीने जिल्हा परिषदेतील वर्ग १ ते ४ मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर संख्या किती आहे. त्यापैकी सन २०१४-२०१५ अखेर एकूण किती पदे भरण्यात आली आहेत व त्यामध्ये वर्गनिहाय महिला अधिकारी/कर्मचारी यांची संख्या किती आहे ? उक्त मंजूर पदांपैकी १ ते ४ मधील किती व कोणती पदे महिलांकरीता आरक्षित करण्यात आली आहेत ? महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदांपैकी सन २०१४-२०१५ अखेर किती पदे भरण्यात आली आहेत व किती व कोणकोणती पदे रिक्त आहेत ? तसेच सदरची पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत ? महिला उमेदवारांसाठी राखीव असलेली वर्ग १ ते ४ मधील पदे भरण्यासाठी कोणती कार्यपद्धती अवलंबली जाते. अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी ठाणे जिल्हापरिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे :—**

जिल्हा परिषदेतील वर्ग १ ते ४ मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची सन २०१४-१५ अखेरची मंजूर संख्या पुढीलप्रमाणे आहे:—

| अ.क्र | वर्ग | मंजूर पदसंख्या | | सन २०१४-१५ अखेर एकुण भरण्यात आलेली पदे | | रिक्त पदे | | भरण्यात आलेल्या पदांपैकी वर्ग निहाय महिला अधिकारी व कर्मचारी संख्या | | उक्त पदांपैकी वर्ग ३ व वर्ग ४ मधील किती व कोणती पदे महिलांकरीता आरक्षित पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वर्ग-१ | २४६ | ३८ | २१२ | २८ | ३४ | १० | ३१ | ६ | सदरची पदे शासन-स्तरावरुन भरली जातात. |
| २ | वर्ग-२ | ११२ | ८३ | ९५ | ४० | १७ | ४३ | १७ | ८ | |
| ३ | वर्ग-३ | २२६२ | ११०४५ | १९६१ | १०३५२ | ३०१ | ६९३ | ९१२ | ४६६८ | ४०४ |
| ४ | वर्ग-४ | ० | ७८८ | ० | ७१२ | ० | ७६ | ० | ३७५ | १७ |
| | एकुण | २६२० | ११९५४ | २२६८ | १११३२ | ३५२ | ८२२ | ९६० | ५०५७ | ४२१ |

जिल्हा परिषदेतील वर्ग १ ते ४ मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर संख्या पुढीलप्रमाणे :-

| अ. क्र. | संवर्ग | उक्त पदांपैकी वर्ग ३ व वर्ग ४ मधील किती व कोणती पदे महिलांकरीता आरक्षित पदांची संख्या. |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| **सामान्य प्रशासन विभाग** | | |
| १ | विस्तार अधिकारी (सां) | ४ |
| २ | वरिष्ठ सहाय्यक | ३ |
| ३ | कनिष्ठ सहाय्यक | ३६ |
| **आरोग्य विभाग** | | |
| १ | आरोग्य सेवक (महिला) | ५९८ (१००% महिलांसाठी राखीव) |
| २ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | २ |
| ३ | औषध निर्माण अधिकारी | ६ |
| **कृषी विभाग** | | |
| ४ | कृषी अधिकारी | १ |
| ५ | विस्तार अधिकारी (कृषी) | २ |
| **पशुसंवर्धन विभाग** | | |
| | पशुसंवर्धन पर्यवेक्षक | ६ |
| **महिला व बालकल्याण विभाग** | | |
| | सहायक बालविकास प्रकल्प अधिकारी | २ (१००% महिलासांठी राखीव) (मृत संवर्ग) |
| | मुख्यसेविका (पर्यवेक्षक) | ८४(१००% महिलांसाठी राखीव) |
| **ग्रामपंचायत विभाग** | | |
| | ग्रामसेवक | ८० |
| **बांधकाम विभाग** | | |
| | स्थापत्य अभि. सहायक | २ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| **अर्थ विभाग** | | |
| | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | १ |
| **शिक्षण विभाग (प्राथ.)** | | |
| | प्राथमिक शिक्षक | २६१ |
| **सामान्य प्रशासन विभाग** | | |
| | शिपाई (वर्ग-४) | १७ |

महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते वर्ग ४ मधील पदांपैकी सन २०१४-१५ अखेर भरण्यात आलेली पदे व रिक्त असलेली पदे तसेच सदरची पदे रिक्त राहण्याची कारणे यांची महिती पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे:—

| अ. क्र. | संवर्ग | राखीव ठेवण्यात आलेल्या पदांपैकी सन २०१४-१५ अखेर भरण्यात आलेली पदे | रिक्त पदे | सदरची पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत ? |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| **सामान्य प्रशासन विभाग** | | | | |
| १ | लघुलेखक (उ.श्रे.) | ० | ० | महिला व बालविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०९३/ प्र.क्र.३६६/का-२/दि.२२ जून, १९९४ नुसार सरळसेवा भरती मध्ये महिलांकरीता ३० टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे. |
| २ | लघुलेखक (नि.श्रे.) | ० | ० | |
| ३ | विस्तार अधिकारी (सां) | ४ | ० | |
| ४ | वरिष्ठ सहाय्यक | ३ | ० | |
| ५ | कनिष्ठ सहाय्यक | ३६ | ० | |
| ६ | शिपाई | १७ | ० | |
| | एकुण | ६० | ० | २) महिला व बालविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण १०९६/ प्र.क्र ३०/का-२, दि.१ ऑगस्ट, १९९७ मधील अ.क्र.४ नुसार महिलांचे |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | आरक्षण हे त्या त्या प्रवर्गसाठी संमातर आरक्षण राहिल. तथापि भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाही तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवार भरण्यात यावे. महिलांच्या आरक्षणाचा अनुशेष पुढे ओढण्यात येऊ नये असे नमुद आहे. त्यामुळे सदरची पदे रिक्त राहण्यास प्रश्न उद्‌भवत नाही . |
| **आरोग्य विभाग** | | | | |
| ७ | आरोग्य सेवक (महिला) | ५६४ | ० | |
| ८ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | २ | ० | |
| ९ | औषध निर्माण अधिकारी | ६ | ० | |
| १० | आरोग्य सेवक (पुरुष) | ० | ० | |
| ११ | आरोग्य पर्यवेक्षक (पुरुष) | ० | ० | |
| | एकूण | ५७२ | ० | |
| **कृषी विभाग** | | | | |
| १२ | कृषी अधिकारी | १ | ० | |
| १३ | विस्तार अधिकारी कृषी | २ | ० | |
| | एकूण | ३ | ० | |

महिला व बालकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय.क्र.संकिर्ण १०९६/प्र.क्र.३०/का-२, दि.१ ऑगस्ट, १९९७ मधील मार्गदर्शक सुचना नुसार जिल्हापरिषद ठाणे अंतर्गत सरळसेवा भरती करताना त्या सामाजिक आरक्षणातील एकुण रिक्त पदांच्या ३० % पदे व समांतर आरक्षण निश्चित करून रिक्त पदे महिला उमेदवारांकडून सरळसेवा भरतीने भरण्यात येतात. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर, २००७ व २७ जून, २००८ मधील मार्गदर्शक सुचनानुसार भरती करण्यात येते. अशी माहिती समितीस सांगितली.

**ठाणे जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

ठाणे जिल्हापरिषदेला मंगळवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेच्या वर्ग ३ संवर्गातील अतांत्रिक पदामधील ६९३ पदे रिक्त राहण्याची कारणे काय ? महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांसाठी स्वंतत्र नोंदवही (रोस्टर) ठेवण्यात आले आहे काय ? तसेच ती अद्ययावत स्वरुपात आहेत काय ? नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरील माहिती १ एप्रिल, २०१५ पूर्वीच्या ३ वर्षाची आहे. ठाणे जिल्हयाचे विभाजन झाल्यानंतर रोस्टर फायनल करण्याची प्रक्रिया पुर्ण झालेली नाही. यावर्षी ठाणे व पालघर जिल्हा परिषदेत पद भरती प्रक्रिया राबवू नये असे शासनाचे आदेश असल्याने सदर पदे रिक्त आहेत. रोस्टर फायनल करण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे. परंतु त्यासाठी निश्चित किती कालावधी लागेल हे सांगता येणे शक्य नाही. रोस्टर फायनल झाल्यानंतर ६ महिन्यात रिक्त पदांची भरती प्रक्रिया पार पाडण्यात येईल. महिला उमेदवारांसाठी सरळसेवा भरतीसाठी ३०% प्रमाणे समांतर आरक्षण असल्याने स्वंतत्र बिंदू नामावली ठेवलेली नाही. मात्र सामाजिक आरक्षणानुसार ठेवलेल्या बिंदूनामावलीमध्ये समांतर आरक्षणानुसार पद भरती झाल्यास त्याची नोंद करण्यात येते.

समितीने जिल्हा परिषदेने वर्तमानपत्रात जाहिरातीप्रमाणे भरती करण्यात आली आहे काय ? सदर भरती केल्यानंतर देखील रिक्त पदांची संख्या मोठया प्रमाणात का आहे ? बिंदू नामावली तयार केली आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वर्तमानपत्रात सन २०१३ मध्ये जाहिरात देण्यात आली होती व त्याप्रमाणे भरती करण्यात आली आहे. आंतर जिल्हा बदली, सेवा निवृत्ती या कारणामुळे रिक्त पदांचा अनुशेष मोठया प्रमाणात दिसून येत आहे. शासनाकडून रोस्टर रिवाईज करून मिळणार आहे, त्यानुसार बिंदुनामावली तयार करण्यात येईल. असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे जिल्हापरिषद यांनी खालीलप्रमाणे लेखी माहिती दिली :-**

ठाणे व पालघर जिल्हा परिषद विभाजनाने कर्मचा-यांच्या समायोजनाचे काम सुरु असून भरती प्रक्रिया न झाल्याने पदे रिक्त आहेत. आज रोजी विभाजीत ठाणे जिल्हयात वर्ग ३ व वर्ग ४ मिळून एकूण ५०८ पदे रिक्त आहेत. शासन स्तरावरुन एकत्रितपणे भरती करण्यासाठी मागविण्यात

आलेली माहिती सादर करण्यात आली आहे. ठाणे जिल्हयाच्या विभाजनानंतर रोस्टर फायनल होण्याच्या प्रक्रियेस उशीर होत असल्याने मोठया प्रमाणात रिक्त पदांचा अनुशेष निर्माण झाला आहे. अशी विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी असे सांगितले की, दिनांक १ ऑगस्ट, २०१४ रोजी ठाणे व पालघर जिल्हा विभाजन झाले. ग्रामविकास विभागाचे पत्र दिनांक ९ ऑक्टोबर, २०१५ अन्वये ठाणे व पालघर विभाजनानंतर रोस्टर तयार करण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाचे स्तरावर सुरु होते. अशा परिस्थितीत नोव्हेंबर, २०१५ मधील सरळसेवा भरती ठाणे व पालघर या दोन जिल्हयांमध्ये करण्यात येऊ नये असे आदेश होते. शासन निर्णय दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६ अन्वये ठाणे/पालघर मध्ये कार्यरत कर्मचा-यांची समायोजनाची कार्यवाही करणेच्या मार्गदर्शक सुचना प्राप्त झाल्या होत्या त्यानुसार समायोजनाची माहिती अंतिम टप्यात पुर्ण करणेची कार्यवाही सुरु असताना समायोजनाबाबत ग्रामविकास विभागाकडील दिनांक २२ जुलै, २०१६ रोजीचा सुधारीत शासन निर्णय निर्गमित झाल्याने उक्त शासन निर्णयातील सुधारीत मार्गदर्शक सुचनांनुसार समायोजन प्रक्रियेचा अंतिम प्रस्ताव तयार करून मान्यतेस्तव समन्वय समितीकडे सादर करण्यात आला आहे. समन्वय समायोजन समितीने दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ रोजीचे बैठकीचे सदर प्रस्तावास अंतिम मान्यता देण्यात आली. दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ रोजीचे समायोजनाचे प्रस्तावानुसार पदनिश्चिती झाल्यानंतर दोन्ही जिल्हा परिषदेचे पदोन्नतीची पहिली फेरी पुर्ण करण्यात आली. ग्रामविकास विभागाकडील पत्र दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ भरती प्रक्रियेसाठी अद्ययावत रोस्टर नुसार रिक्त पदांची माहिती मागविण्यात आली होती. त्यानुसार सदरची प्रवर्ग व संवर्गनिहाय रिक्त पदांची माहिती या कार्यालयाचे जा.क्र.ठाजिप/साप्रवि/आस्था-३अ/वशी-९८८ दि. २० ऑक्टोबर, २०१६ रोजी शासनस्तरावर पाठविणेत आली आहे. परंतू अद्याप पावेतो शासनस्तरावरुन भरती प्रक्रियेबाबत कोणत्याही मार्गदर्शक सुचना अथवा परिक्षेचे वेळापत्रक प्राप्त झालेले नाहीत. शासनस्तरावरुन संपुर्ण महाराष्ट्रात केंद्रीय पद्धतीने भरती प्रक्रिया नोव्हेंबर, २०१७ मध्ये संभाव्य राबविणेचे प्रस्तावित आहे. ग्रामविकास विभागाकडील दिनांक २२ मे, २०१७ रोजीच्या पत्रानुसार दोन्ही जिल्ह्यातील किमान कर्मचारी समायोजनाने कार्यमुक्त करणेचे निर्देशानुसार ठाणे जिल्ह्याकडून ४२५ कर्मचारी पालघर जिल्ह्याकडे कार्यमुक्त करणेत आले आहेत. तसेच पालघर जिल्ह्याकडून ४२५ कर्मचारी ठाणे जिल्ह्याकडे कार्यमुक्त केले आहेत. त्यापैकी आजअखेर ३४५ कर्मचारी ठाणे जिल्ह्याकडे हजर झाले आहेत. सद्य:स्थितीत जिल्हा परिषद ठाणे येथे ५३ संवर्गातील एकूण ५०८ पदे रिक्त आहेत.

त्यावर जिल्हापरिषदेने बिंदू नामावली तयार केली आहे का ? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, ठाणे/पालघर जिल्हा विभाजनानंतर दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजीचे शासन निर्णयान्वये निश्चित करून दिलेल्या सुधारीत आरक्षणानुसार ठाणे जिल्हा परिषदेंतर्गत सर्व विभागांनी ठाणे जिल्ह्याची स्वतंत्र बिंदुनामावली तयार केली आहे. ठाणे जिल्हा परिषदेंतर्गत सामान्य प्रशासन विभाग, अर्थ विभाग, ग्रामपंचायत विभाग, आरोग्य विभाग, बांधकाम विभाग, महिला व बाल विकास विभाग या ६ विभागांनी मा.व.क कक्षातून बिंदूनामावली तपासून घेतली आहे. उर्वरीत कृषी विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, लघुपाटबंधारे विभाग, पशुसंवर्धन विभाग व शिक्षण विभाग या ५ विभागांकडून बिंदुनामावली नोंदवही तपासताना मावक कक्षाकडून देण्यात आलेल्या त्रुटींची पुर्तता करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे. सोबत बिंदुनामावली नोंदवही तपासणेबाबतचा विभागनिहाय अहवाल जोडणेत आला आहे. तरी सदरचा मुद्दा स्वीकृत होणेस विनंती आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

ठाणे जिल्हापरिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ७ जून, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने ठाणे जिल्हापरिषदेच्या विभाजनांनतर रोस्टर फायनल होण्याच्या प्रक्रियेस उशीर होत असल्याने मोठया प्रमाणात रिक्त पदांचा अनुशेष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक १ ऑगस्ट, २०१४ रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन पालघर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आलेली आहे. त्यावेळी शासनाने एक शासन निर्णय काढलेला आहे. त्यात असे नमूद करण्यात आलेले आहे की, समायोजनाची प्रक्रिया पुर्ण झाल्याशिवाय कोणत्याही पदांची पद भरती करण्यात येऊ नये. शासनाकडून समायोजन प्रक्रियेस अंतिम मान्यता दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ रोजी देण्यात आलेली आहे. या संदर्भातील रोस्टर फायनल करीत आहोत. त्यातील ६ विभागांचे रोस्टर फायनल झालेली आहेत. त्यातील ५ विभागाचे रोस्टर फायनल करण्याचे काम अंतिम टप्यात आलेले आहे. शालेय शिक्षण विभागाची व्याप्ती मोठी आहे. या विभागामध्ये कर्मचारी वर्ग मोठया प्रमाणावर असल्यामुळे या कामी थोडा वेळ लागत आहे. रोस्टर पुर्ण करण्याची प्रक्रिया येत्या एक-दोन महिन्यांत पुर्ण करणार आहोत, त्यानंतर पद भरतीची प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने करणार आहोत. असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

समितीने दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ रोजी ठाणे जिल्हापरिषदेला दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने तसेच दिनांक ७ जून, २०१७ रोजी घेतलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी ठाणे जिल्हा परिषदेतील वर्ग १ ते ४ मधील सर्व संवर्गातील पदाची एकूण संख्या किती व या मंजूर पदापैकी वर्ग १ ते ४ मधील किती व कोणती पदे महिलांकरीता आरक्षित करण्यात आली आहेत ? किती पदे भरली गेली आहेत व किती पदे रिक्त आहेत तसेच सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत आणि महिलांसाठी राखून ठेवलेल्या पदांसाठी स्वंतत्र नोंदवही ठेवण्यात आली असून ती अद्ययावत आहेत का ? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी दिनांक १ ऑगस्ट, २०१४ रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होवून ठाणे व पालघर अशा दोन जिल्हे निर्मिती करण्यात आली. त्यामुळे ठाणे व पालघर जिल्हापरिषदेच्या विभागातील कर्मचा-यांच्या समायोजनाचे काम सुरु असून भरती प्रक्रिया राबवू नये असे शासनाचे आदेश असल्याने सदर पदे रिक्त आहेत. रोस्टर फायनल करण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येत असून रोस्टर फायनल झाल्यानंतर सहा महिन्यांत रिक्त पदांची अशी प्रक्रिया पार पाडण्यात येईल तसेच समायोजनाची माहिती अंतिम टप्यात पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु असताना समायोजनाबाबत ग्रामविकास विभागाकडून दिनांक २२ जूलै, २०१६ रोजीच्या सुधारीत शासन निर्णय निर्गमित झाल्याने उक्त शासन निर्णयातील सुधारीत मार्गदर्शक सूचना नुसार समायोजन प्रक्रियेचा अंतिम प्रस्ताव तयार करून समन्वय समितीकडे सादर करण्यात आला असून दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ रोजी या प्रस्तावास मान्यता देण्यात आली ग्रामविकास विभागाकडे दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या प्रत्रानुसार भरती प्रक्रियेसाठी अद्ययावत रोस्टर नुसार रिक्त पदांची मागणी दिनांक २० आक्टोबर, २०१६ रोजी शासन स्तरावर पाठविण्यात आली आहे. परंतू अद्ययावत आजपावेतो शासन स्तरावरुन भरती प्रक्रियेबाबत कोणत्याही मार्गदर्शक सूचना अथवा परिक्षेचे वेळापत्रक प्राप्त झालेले नाही. तथापि दिनांक २२ मे, २०१७ रोजीच्या पत्रानुसार दोन्ही जिल्ह्यातील किमान कर्मचारी समायोजनातील कार्यक्रम करण्याचे निर्देशानुसार पालघर जिल्हयाकडून ४२५ कर्मचारी पैकी ३४५ कर्मचारी ठाणे जिल्ह्याकडे हजर झाले आहेत. सद्य:स्थिती ठाणे जिल्हापरिषदेकडे ५३ संवर्गातील एकूण ५०८ पदे रिक्त आहेत **यावर समितीने जिल्हा परिषद ठाणे यांनी ५३ संवर्गातील एकूण ५०८ पदांचा रिक्त संदर्भात तात्काळ पदे भरण्यासाठी शासन स्तरावरुन याचा पाठपुरावा करावा आणि लवकरात लवकर शासन स्तरावरुन या रिक्त पदांसाठी भरती प्रक्रियेबाबत मार्गदर्शक सूचना अथवा परिक्षेचे वेळापत्रक प्राप्त करण्यासाठी शासनाला विनंती करून ही भरती प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला ३ महिन्यात देण्यात यावा.**

### ३.२. ठाणे जिल्हापरिषदेचे गत ३ वर्षातील वर्षनिहाय अंदाजपत्रक :-

दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ रोजी महिलांचे हक्क व कल्याण समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडून खालीलप्रमाणे माहिती मागविण्यात आली होती.

जिल्हापरिषदेचे गत तीन वर्षातील (सन २०१२-१३, २०१३-१४, व २०१४-१५) वर्षनिहाय अंदाजपत्रक किती रक्कमेचे आहे ? उक्त अंदाजपत्रकातील रकमेपैकी एकूण किती रक्कम जिल्हापरिषद क्षेत्रातील महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी राखून ठेवण्यात आली आहे ? जिल्हा परिषदेमार्फत महिलांचे सबलीकरण करण्याकरीता तसेच आर्थिकदृष्टया मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरीता राबविण्यात येणा-या योजना तसेच महिलांकरीता देण्यात येणा-या सोयी सवलती इत्यादी योजनांबाबत माहिती देण्यात यावी ? तसेच उक्त योजनांवर गत ३ वर्षात वर्षनिहाय व योजनानिहाय एकूण किती खर्च झाला ? जिल्हापरिषदेमार्फत महिलांसाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजना त्यांना देण्यात येणा-या सोयी सवलती इ.बाबतची माहिती देण्यात यावी. तसेच, या योजनांची माहिती गरजू महिलांपर्यंत पोहचविण्यासाठी व त्यांनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी स्वतंत्र अशी योजना जिल्हापरिषदांकडे आहे काय ? जिल्हापरिषद निधीतून महिलांशी संबधित कार्यक्रमासाठी १०% रक्कम खर्च करण्यात येते काय ? हा निधी महिला व बाल कल्याण विभागासाठी राखून ठेवला असल्यास, गत ३ वर्षात कोणकोणत्या योजनांवर खर्च करण्यात आली याची माहिती देण्यात यावी ? महिलांच्या आरोग्याबाबत जिल्हापरिषदेमार्फत कोणत्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात याची सविस्तर माहिती द्यावी ? तसेच बचत गटांसाठी काही योजना राबविण्यात आल्या आहेत काय ? अशी विचारणा करण्यात आली.

उपरोक्त प्रकरणी ठाणे जिल्हापरिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :-

जिल्हा परिषदेचे गत ३ वर्षातील ( २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५) वर्षनिहाय अंदाजपत्रक खालीलप्रमाणे आहे.

| सन | एकूण अंदाजपत्रक |
|---|---|
| २०१२-१३ | ९९००.७२ |
| २०१३-१४ | १५३६५.७३ |
| २०१४-१५ | १२६४१.९९ |

महिला व बालकल्याणकारी योजनांसाठीचे अंदाजपत्रक करताना जिल्हापरिषदेच्या स्वउत्पन्नाच्या बाबी विचारात घेऊन अंदाजपत्रकात तरतूद करण्यात येते.

| सन | तरतूद |
|---|---|
| २०१२-१३ | ६८२.८८ |
| २०१३-१४ | ८४७.३१ |
| २०१४-१५ | ७३८.१७ |

ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र. झेडपीए २०१०/अनैसंक्रं.३३/ प्र.क.१६८/परा-१/मंत्रालय मुंबई दि.१० मार्च,२०११ व शासन शुद्धी पत्रक दि.२२ जुलै, २०११, दि.१६ जून,२०१२, शासन निर्णय क्र.झेडपीए २०१२/९८७/प्र.क्र.२००/पं.रा.१ दि.१३ मार्च, २०१३ शासन परिपत्रक दि.२१ मार्च, २०१३ व शासन परिपत्रक दि.२१ मार्च, २०१३ व शासन निर्णय क्र. झेडपीए २०१३/प्र.क्र.७६/पं.रा-१, दि.२४ जानेवारी २०१४ नुसार महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. त्यामध्ये खालील योजनांचा समावेश करण्यात आला आहे.

**महिला व बालकल्याण विभाग :-**

(१) महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे, ग्रामीण भागातील मुलींना टंकलेखन / वाहन चालक प्रशिक्षण देणे, सौंदर्य प्रसाधनाचे प्रशिक्षण देणे, एम.एस.सी. आय.टी.चे प्रशिक्षण देणे.

(२) ग्रामीण भागातील महिलांना कायदेविषयक व विधीविषयक मार्गदर्शन करणे.

(३) ग्रामीण भागातील किशोर वयीन मुलींना व महिलांना जेंडर प्रशिक्षण

(४) पंचायत राज संस्थामधील महिला प्रतिनिधींना कामकाजाचे प्रशिक्षण देणे.

(५) महिला लोक प्रतिनिधींचा मेळावा आयोजित करणे.

(६) ग्रामपंचायत स्तरावरील महिला प्रतिनिधींचा अभ्यास दौरा आयोजित करणे.

(७) मुलींना स्वसंरक्षणासाठी व शारिरिक विकासासाठी ज्युडो व कराटे प्रशिक्षण देणे.

(८) महिलांना साहित्य पुरविणे (पिंठाची गिरणी पुरविणे, पिको फॉल मशिन पुरविणे, शिवण मशिन पुरविणे.)

(९) इयत्ता ५ ते १२ वी तील शिकणा-या ग्रामीण भागातील मुलींना दोन चाकी सायकल पुरविणे

(१०) विशेष प्राविण्य मिळविलेल्या मुलींचा सत्कार करणे.

(११) आदर्श अंगणवाडी कार्यकर्ता/मदतनीस पुरस्कार

(१२) महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे.

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे :-**

(१) राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांन्तर्गत ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील कुटुंबातील, महिलांचे स्वयंसहाय्यता बचत गट तयार करणे, टप्या टप्याने दशसुत्रि मुल्यमापनानुसार फिरता निधी मिळवून देणे व त्यांना बँकेमार्फत कर्ज उपलब्ध करून आर्थिक मदत मिळवून रोजगार निर्मितीस सहाय्य करणे,

(२) राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत नॉन इन्टेंसिव्ह तालुक्यातील ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील, गरीबातील गरीब (PIP) व अंपग कुंटुबातील, वयोवृद्ध, परितक्त्या, वेश्या व्यवसायी महिला, मानवी मैला वाहतूक करणा-या तृतीय पंथी महिलांचे स्वयंसहायता बचत गट तयार करणे व दशसुत्रि मुल्यमापनानुसार फिरता निधी मिळवून देणे व त्यांना बँकेमार्फत कर्ज उपलब्ध करून आर्थिक सहाय्य मिळवून रोजगार निर्मीतीस मदत करणे.

**आरोग्य विभाग :-**

(१) तज्ञ महिला डॉक्टरांकडून गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी करणे आणि औषधोपचार करणे,

(२) किशोरवयीन मुलींना आरोग्य विषयक बाबी व व्यवसाय कौशल्य विकसित करण्याबाबत प्रशिक्षण देणे,

(३) अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती खालील गरोदर महिलेला बुडीत मंजुरी देणे.

मागील ३ वर्षात (सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५) या वर्षनिहाय व योजनानिहाय खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र | योजनेचे नांव | वर्ष | झालेला खर्च |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे | २०१२-१३ | ९.१८ |
| (२) | मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण | २०१२-१३ | ५९.९९ |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| (३) | किशोरवयीन मुलींना जीवन कौशल्याचे प्रशिक्षण | २०१२-१३ | १०.०० |
| (४) | १०/१२ वी पास मुलींना संगणक MS-CIT प्रशिक्षण | २०१२-१३ | १०.०० |
| (५) | महिलांना साहित्य पुरविणे | २०१२-१३ | १६.९७ |
| (६) | पंचायत राज समितीमधील लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण | २०१२-१३ | १२.९४ |
| (७) | ३% अपंग कल्याण- महिलांना साहित्य पुरविणे | २०१२-१३ | ३२.८५ |
| (१) | आदर्श अंगणवाडी सेविकांना पुरस्कार | २०१३-१४ | २.०१ |
| (२) | महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे | २०१३-१४ | ९.७२ |
| (३) | मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण | २०१३-१४ | २.५८ |
| (४) | किशोरवयीन मुलींना जीवन कौशल्याचे प्रशिक्षण | २०१३-१४ | ७.१६ |
| (५) | १०/१२ वी पास मुलींना संगणक MS-CIT प्रशिक्षण | २०१३-१४ | ११.५७ |
| (६) | अंगणवाडी केंद्राना साहित्य पुरविणे | २०१३-१४ | ५०७.६५ |
| (७) | महिलांना साहित्य पुरविणे | २०१३-१४ | ४९.९५ |
| (८) | मुलींना स्वसंरक्षणासाठी ज्युडो कराटे प्रशिक्षण देणे | २०१३-१४ | ९.२३ |
| (९) | महिलांना कायदेविषयक व विधीविषयक० | २०१३-१४ | १.०० |
| (१०) | ३% अपंग कल्याण- महिलांना साहित्य पुरविणे | २०१३-१४ | १४.२९ |
| (१) | आदर्श अंगणवाडी सेविकांना पुरस्कार | २०१४-१५ | १.६५ |
| (२) | महिला लोकप्रतिनिधी अभ्यास दौरा | २०१४-१५ | ३.८३ |
| (३) | महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे | २०१४-१५ | ९.१८ |
| (४) | शाळेत जाणा-या मुलींना दोन चाकी सायकल पुरविणे | २०१४-१५ | ४८.७२ |
| (५) | मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण | २०१४-१५ | ९.५९ |
| (६) | किशोरवयीन मुलींना जीवन कौशल्ये प्रशिक्षण | २०१४-१५ | ९.५६ |
| (७) | १०/१२ वी पास मुलींना संगणक MS-CIT प्रशिक्षण | २०१४-१५ | २४.९८ |
| (८) | अंगणवाडी केंद्रांना साहित्य पुरविणे | २०१४-१५ | ३८९.६६ |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| (९) | महिलांना साहित्य पुरविणे | २०१४-१५ | ३०.८८ |
| (१०) | मुलींना स्वसंरक्षणासाठी ज्युडो कराटे प्रशिक्षण देणे | २०१४-१५ | १८.९५ |
| (११) | पंचायत राज समितीमधील लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण | २०१४-१५ | ४.२९ |
| (१२) | महिलांना कायदेविषयक व विधीविषयक | २०१४-१५ | १.०० |
| (१३) | विशेष प्राविण्य मिळविलेल्या मुलींचा सत्कार | २०१४-१५ | १.०० |
| (१४) | दुर्धर आजारी मुलांचे शस्त्रक्रियेसाठी अर्थसहाय्य | २०१४-१५ | ०.५८ |
| (१५) | ३% अपंग कल्याण- महिलांना साहित्य पुरविणे | २०१४-१५ | १०.२९ |
| | **जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान** | | |
| १ | राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत नॉन इन्टेंसिव्ह तालुक्यातील ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील, गरीबातील गरीब (PIP) व अंपग कुंटुबातील, वयोवृद्ध, परितकत्या, वेश्या व्यवसायी महिला, मानवी मैला वाहतूक करणा-या तृतीय पंथी महिलांचे स्वयसहायता बचत गट तयार करणे व दशसुत्रि मुल्यमापना नुसार फिरता निधी मिळवून देणे व त्यांना बँकेमार्फत कर्ज उपलब्ध करून आर्थिक सहाय्य मिळवून रोजगार निर्मीतीस मदत करणे. | २०१२-१३<br>२०१३-१४<br>२०१४-१५ | ०<br>७३२८२९३<br>२८५३५९३८ |
| २ | राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील कुटुंबातील, महिलांचे स्वयंसहाय्यता बचत गट तयार करणे टप्या टप्याने दशसुत्रि मुल्यमापना नुसार फिरता निधी मिळवून देणे व त्यांना बँकेमार्फत कर्ज उपलब्ध करून आर्थिक मदत मिळवून रोजगार निर्मितीस सहाय्य करणे, | २०१२-१३<br>२०१३-१४<br>२०१४-१५ | ७६५.५२<br>३६३.७२<br>१६२.८६ |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | **आरोग्य विभाग** | | |
| १) | तज्ञ महिला डॉक्टरांकडून गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी करणे आणि औषधोपचार करणे, | २०१२-१३ | १८९.२३८ |
| | | २०१३-१४ | १४३.१८ |
| | | २०१४-१५ | ५२.६ |
| २) | किशोरवयीन मुलींना आरोग्य विषयक बाबी व व्यवसाय कौशल्य विकसित करण्याबाबत प्रशिक्षण देणे, | २०१२-१३ | ६८.५७२ |
| | | २०१३-१४ | ३८.८९ |
| | | २०१४-१५ | ६०.९३ |
| ३) | अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती खालील गरोदर महिलेला बुडीत मंजुरी देणे. | २०१२-१३ | १३९.३३ |
| | | २०१३-१४ | २०२.३ |
| | | २०१४-१५ | २०६.५ |

महिला उद्योजकांसाठी विशेषतःआर्थिकदृष्टया मागास महिला उद्योजकांसाठी उद्योगधंदे उभारण्याकरीता जिल्हा परिषदेमार्फत दिनांक २४ जानेवारी, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रती लाभार्थी रुपये २०,००० च्या मर्यादेत राहून साहित्य स्वरुपात सहाय्य केले जाते.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र. झेडपीए २०१०/अनैसंक्रं.३३/ प्र.क.१६८/परा-१/मंत्रालय मुंबई दि.१० मार्च,२०११ व शासन शुद्धी पत्रक दि.२२ जुलै, २०११, दि.१६ जून,२०१२, शासन निर्णय क्र.झेडपीए २०१२/९८७/प्र.क्र.२००/पं.रा.१ दि.१३ मार्च, २०१३ शासन परिपत्रक दि.२१ मार्च, २०१३ व शासन परिपत्रक दि.२१ मार्च, २०१३ व शासन निर्णय क्र. झेढपीए २०१३/प्र.क्र.७६/पं.रा-१, दि.२४ जानेवारी २०१४ नुसार महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी महिला व बालकल्याण समितीने शासन निर्णयातील योजना राबविल्या जातात.

ग्रामीण भागातील मुली व महिलांना व्यवसाय व तांत्रिक प्रशिक्षण देणे व महिलांना विविध साहित्य पुरविणे इ.योजना राबविण्यात येतात तसेच जिल्हा परिषदेचे मार्फत राबविण्यात येणा-या योजनांची माहिती गरजु महिलांपर्यत पोहचविण्यासाठी पंचायत स्तरावरील कार्यक्रम कर्मचा-यांच्या(ग्राम सेवक, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी) मार्फत लाभ देणे प्रोत्साहित करण्यात येते.तसेच स्थानिक स्तरावर होणा-या सभेमध्ये पदाधिकारी यांना योजनेचे प्रारुप देवून त्यांच्या सहकार्याने

प्रभावीपणे राबविण्यात येते, तसेच ग्रामीण पातळीवर महिला मेळावे, ग्रामसभा, विविध प्रदर्शने, माहिती पुस्तिका, चित्ररथ व वर्तमानपत्रातून प्रसिद्धी देण्यात येऊन महिलांपर्यंत जनजागृती करण्यात येते.

समाज कल्याण विभागामार्फत मागासवर्गीय महिला लाभार्थ्यांना शिलाई मशीन पुरविणे, महिला व बचत गटांना अनुदान देणे योजना राबविण्यात येतात. पंचायत स्तरावरुन प्रत्येक ग्रामसेवकांना सदर योजनांची माहिती सांगून सदर योजना गावोगावी पोहचवून जास्तीत जास्त महिलांना सदर योजनेचा लाभ देण्यात येतो. सदर योजनांचे गरजू महिलांना आवश्यक ती माहिती तालुका स्तरावरुन देण्यात येते व महिलांना वैयक्तिक लाभ देण्याबाबतचे प्रस्ताव मागविण्यात येतात.

या योजनेंतर्गत ग्रामीण भागातील महिला लाभार्थ्यांना व महिला बचत गटांना लाभ देण्यात आलेला आहे. सदरहू महिलांना मशीन देण्यात आल्याने त्या स्वयंरोजगार करीत आहेत व महिला व बचत गटांना दिलेल्या आर्थिक सहाय्यामुळे गरजू महिलांना मदत केली जाते.

**ठाणे जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

ठाणे जिल्हापरिषदेला दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेने गत तीन वर्षातील अंदाजपत्रक सन २०१२-१३ मध्ये ९९००.७२ लाख रुपयांचे होते. सन २०१३-१४ मध्ये १५३६८.७३ लाख रुपये आणि सन २०१४-१५ मध्ये १२६४१.९९ लाख रुपये इतके होते. त्यापैकी महिलांच्या विविध कल्याणकारी योजनांसाठी १० टक्के प्रमाणे सन २०१२-१३ मध्ये ६८२.८८ लाख रुपये, सन २०१३-१४ मध्ये ८४७.३१ लाख रुपये आणि सन २०१४-१५ मध्ये ७३८.१७ लाख रुपये आहे. तरतूद करण्यात आल्याचे नमूद केले आहे. तसेच सन २०१२-१३ मध्ये ६८२.८८ लाख रुपये तरतूद करण्यात आली होती ती खर्च झालेली आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रत्यक्षात जी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापेक्षा थोडा कमी खर्च झालेला आहे. परंतू एका वर्षी जास्त खर्च झालेला आहे. सन २०१२-१३ मध्ये ६८२.८८ लाख रुपये तरतूद करण्यात आली होती. ती खर्च ५९१ लाख रुपये खर्च झालेले आहेत.

समितीने किशोरवयीन मुलींना जीवन कौशल्याचे प्रशिक्षण देण्यासाठी १० लाख रुपये खर्च केलेले आहे. हा निधी खर्च करणारी एजन्सी कोणती आहे ? महिलांना कोणते साहित्य पुरविण्यात आलेले आहे ? लाभार्थ्यांची निवड कशी केली जाते ? अशी विचारणा केली.

त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एजन्सी नियुक्त केलेली नाही. २५०० किशोरवयीन मुलींना लैंगिक प्रशिक्षण, आरोग्य पोषण आहार प्रशिक्षण, मासिक पाळी व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले होते. प्रशिक्षणासाठी २५०० लाभार्थ्यांची निवड करण्यात आली होती. प्रशिक्षण देणारे तज्ज्ञ डॉक्टर सुपरवायझर, एनएम यांना तासिकेप्रमाणे मानधन दिले जाते. शाळा किंवा शाळाबाह्य मुलींना प्रशिक्षण दिले जाते. महिलांना पिठाची गिरणी वगैरे अशा प्रकारचे साहित्य पुरविण्यात आलेले आहे. ग्रामसभेत लाभार्थ्यांची निवड केली जाते. लाभार्थी बीपीएल धारक असला पाहिजे. लाभार्थ्यांच्या घरी विजेचे कनेक्शन असले पाहिजे. ज्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांच्याकडून १० टक्के रक्कम भरुन घेतली जाते. तसेच लाभार्थ्यांना साहित्य पुरविणे या योजनेंतर्गत फक्त ९३ लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे.

समितीने बचत गटांसाठी काही योजना राबविण्यात आलेल्या आहेत काय ? सन २०१२-१३ मध्ये कृषी विभागाने महिला बचत गटांसाठी योजना राबविलेली नाही. निधी शिल्लक ठेवून तो इतरत्र का वापरण्यात आला ? तसेच ठाणे जिल्ह्यात एकूण किती बचत गट आहेत ? महिला बचत गटांनी तयार केलेल्या मालाला बाजारपेठ मिळावी यासाठी कोणते प्रयत्न केले जातात ? तसेच महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तुचे प्रदर्शन भरविले जाते काय ? अशी विचारणा केली.

त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०१२-१३ ते २०१४-१५ या तीन वर्षात बचत गटांसाठी योजना घेण्यात आलेल्या नव्हत्या. परंतु यावर्षी बचत गटांसाठी अनेक योजना घेण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन निर्णयानुसार ३ टक्के अपंग कल्याण महिलांवर खर्च करावयास पाहिजे, अशी तरतूद आहे.तसेच प्रत्येक विभागाने ३ टक्के रक्कम अपंगांसाठी खर्च करावी, अशी तरतूद बजेटमध्ये करण्यात आली होती. ठाणे जिल्ह्यात नवीन स्वयंसहाय्यता गट १७४३ व जुने गट १९३२ असे एकूण ३६७५ गट आहेत आणि २०४ ग्रामसंस्था, ५ सीएमआरसी कार्यरत आहेत. या माध्यमातून रोजगार निर्मितीचा स्त्रोत निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, समाज कल्याण विभागामार्फत महिला बचत गटांसाठी योजना हाती घेण्यात आलेल्या आहेत. महिला बचत गटांचे आर्थिक सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. तसेच जे उत्पादन असेल ते शासन एकहाती खरेदी करेल असे जिल्हाअधिका-यांसोबत टायअप केलेले आहे. प्रत्येक वर्षी महिला बचत गटांचे मेळावे आयोजित केले जातात. मागील दोन वर्षामध्ये जिल्हा परिषदेने महिलांच्या योजनांतर्गत एम.एस.सी.आय.टी. वाहन चालकाचे प्रशिक्षण महिलांना दिले आहे व त्यास खूप महिलांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे.

समितीने सन २०१२-१३ मध्ये ६८२.८८ लाख रुपये, सन २०१३-१४ मध्ये ८४७.३१ लाख रुपये आणि सन २०१४-१५ मध्ये ७३८.१७ लाख रुपये महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी तरतूद करण्यात आली होती. ही रक्कम खर्च झालेली आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०१२-१३ मध्ये ५९१ लाख रुपये सन २०१३-१४ मध्ये ७१५ लाख रुपये आणि सन २०१४-१५ मध्ये ६६४ लाख रुपये खर्च झालेले आहेत. वर्षाच्या सुरुवातीला ३४ लाख रुपयांचा बॅकलॉग होता. त्यापैकी रुपये २५ लाख कन्सिडर केलेले आहेत आणि उर्वरीत ९ लाख रुपयांचा बॅकलॉग पुनर्वियोजनात घेतलेला आहे.

समितीने स्त्री-पुरुष प्रमाण समप्रमाणात आणण्यासाठी कोणती उपाय योजना करण्यात येत आहे ? अशा कार्यकर्त्यांना केसेसनुसार मानधन देण्यात येते काय ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्त्री-पुरुष प्रमाण समान रहावे याकरीता स्त्रीभृण हत्या रोखण्याकरीता तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली एक स्कॉड नियुक्त करण्यात आला असून त्यांच्यामार्फत आढावा घेण्यात येतो व दोषी विरुद्ध कारवाई करण्यात येते. तसेच त्याबाबतचा आढावा जिल्हा परिषदेच्या ईसीजी मार्फत घेण्यात येतो. अशा कार्यकर्त्यांना मानधन देण्यात येते. अशा कार्यकर्त्यांनी मलेरिया, टी.बी., कुंटुब नियोजन अशा वेगवेगळया प्रकारचे रुग्ण आणले तर त्यांना त्यासाठी वेगवेगळ्या नॉर्म्सनुसार मानधन देण्यात येते. असे समितीस सांगण्यात आले.

समितीने ठाणे जिल्ह्यातील वसतिगृहातील महिला व मुलींना सॅनिटरी नॅपकीन दिले जाते काय ? तसेच विद्यार्थ्यांना ग्रॅन्ड दिली जाते काय ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सॅनिटरी नॅपकीन पुरवठ्याबाबत केलेल्या सूचनेची नोंद घेण्यात येत आहे. वसतिगृहातील मुला मुलींना त्यांच्या आवश्यकतेनुसार एखाद्या बाबीची मागणी केली तर ती पुरविण्यात येते. वसतिगृहातील मुलींना व महिलांना सॅनिटरी नॅपकीन पुरविण्यात येतील. जिल्हा परिषदेने अशा बाबींकरीता २ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यावर्षी ठाणे जिल्ह्यातील शाळाबाह्य मुलामुलींसाठी एक प्रोग्राम तयार करण्यात येत आहे. प्रती विद्यार्थी रुपये ९०० ग्रॅट दिली जाते. वसतिगृहात किती मुले आहेत हे बघून ग्रॅन्ड दिली जाते. वसतिगृहात बेड किंवा इतर साहित्य पुरविण्यात येते. असे समितीस सांगण्यात आले.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे जिल्हापरिषद यांनी खालीलप्रमाणे लेखी माहिती दिली :-**

सन २०१५-१६ पुर्वी ३% अपंग कल्याण निधीमधील तरतूद जिल्हा परिषदेतील सर्व विभागांना खर्च करण्याकरीता देण्यात येत होती. सन २०१५-१६ पासुन ३% अपंग कल्याण निधीतुन राखून ठेवण्यात आलेला सर्व निधी हा समाज कल्याण विभागामार्फत खर्च करण्यात येत आहे.

स्त्री-भृणहत्या विरोधी कायद्याची अंमलबजावणी मा.जिल्हा चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, जि.ठाणे यांचेकडून केली जाते.

या विभागाकडून सदर कायद्याबाबत जागृती व प्रचारप्रसिद्धी केली जाते. दरवर्षी जिल्हा परिषदेस सेस निधीमधून आरोग्य विषयक जनजागृती या कार्यक्रमांतर्गत स्थानिक महिला व बचत गट किंवा स्वंयसेवी संस्था यांची निवड करून संपुर्ण जिल्ह्यामधील या संस्थामार्फत "बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ" तसेच हुंडा बळी व इतर आरोग्य विषयक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

समितीने दिनांक २७ -२८ ऑक्टोबर, २०१५ या दौ-याच्यावेळी सुचना दिल्यानंतर अनुदानित वसतीगृहातील मुलींना सॅनिटरी नॅपकीन पुरवण्याची योजना घेण्यात येऊन १२०० इतके पाकीटे खरेदी करून सन २०१६-१७ वर्षभर पुरतील एवढा पुरवठा ७ वसतिगृहातील एकुण प्रवेशित ३७८ मुलींना करण्यात आला आहे. चालु वर्षात समाज कल्याण विभागामार्फत वर्षभरासाठी सॅनिटरी नॅपकीन पुरविण्याबाबतची त्वरीत कार्यवाही करण्यात येत आहे. जिल्हा परिषदेस सेस निधीमधून किशोरवयीन मुलींना सॅनिटरी नॅपकीनचा पुरवठा करणे या योजनेंतर्गत उपलब्ध अनुदानातून नॅपकीन खरेदी करून जिल्ह्यातील ३३ प्राथमिक आरोग्य केंद्र व १८५ उपकेंद्रातील कार्यरत आरोग्य सेवक महिला व आरोग्य सहायक महिला मार्फत ४१७०० सॅनिटरी नॅपकीनचा पुरवठा केला आहे. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात समाज कल्याण विभागामार्फत ७ अनुदानित मुलींच्या ३७८ विद्यार्थीनींना (१२०० पाकिटे) वर्षभर पुरेल एवढी सॅनिटरी नॅपकीन पुरवठा करणेत आली आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

ठाणे जिल्हापरिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ७ जून, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने ठाणे जिल्हापरिषदेने पालघर जिल्हा परिषदेचा निधी शासनाने ठाणे जिल्हा परिषदेकडे देण्यात आलेला होता. तो निधी ठाणे जिल्हा परिषदेने पालघर जिल्हा परिषदेकडे वर्ग केलेला नाही. तो निधी का वर्ग करण्यात आलेला नाही ? तसेच सदरहू निधी वर्ग करण्याच्या संदर्भातील कार्यवाही केव्हा पुर्ण करण्यात येणार आहे ? पालघर जिल्हा परिषदेस एकूण किती निधी वर्ग करावयाचा होता तसेच ९१ कोटी निधी रक्कम कोणत्या वर्षातील वर्ग करण्यात आलेली आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निधी वर्ग करण्याच्या संदर्भातील कार्यवाही सुरु आहे. तसेच ठाणे आणि पालघर जिल्ह्यांचे विभाजन झाल्यानंतर ठाणे जिल्हा परिषदेने पालघर जिल्हा परिषदेस शासकीय निधी ९१ कोटी रुपये वर्ग करण्यात आलेला आहे. जिल्हा परिषदेकडील त्या दिवशीच्या येणा-या रकमेपैकी त्यांची रक्कम अदा करण्यासंदर्भात मध्यंतरी माहितीचा आदान प्रदान झालेला आहे. तो फार्मुला लवकरात लवकर करण्यात येईल. असे समितीस सांगण्यात आले.

समितीने ठाणे जिल्ह्यातील शासकीय अनुदानित वसतिगृहातील मुलींना सॅनीटरी नॅपकीनच्या संदर्भात समितीस माहिती देण्यात यावी ? दर महिन्याला किती सॅनीटरी नॅपकीन देण्यात येतात ? एका मुलीला महिन्याला किती सॅनीटरी नॅपकीन देण्यात येतात ? प्रत्येक मुलीला महिन्याला १० सॅनीटरी नॅपकीन का देण्यात येत नाहीत अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०१६-१७ मध्ये एकूण वसतीगृहामधील मुलींची संख्या ३७८ आहे. त्यांना सॅनीटरी नॅपकीन देण्यात आले होते.समाज कल्याण विभागामार्फत १२०० पाकिटे देण्यात आली होती. एका मुलीला महिन्याला ०५ नॅपकीन देण्यात येतात.

समितीने जिल्हा परिषदेतील कृषी विभागाच्या महिलांसाठी शेतीपुरक काही योजना असल्याचे दिसुन येत नाही. महिलांकरीता शेतीवर आधारित उद्योगाची नितांत आवश्यकता आहे ? ठाणे जिल्ह्यात महिलांच्या बचत गटांना सामुहिक प्रोत्साहन शेती करण्यास प्रोत्साहन देण्याकरीता योजना राबविण्यात आल्या आहेत काय ? बचत गटांना कोणकोणत्या माध्यमातून तयार करण्यात आले आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अवजारे बँक नावाची नाविन्यपूर्ण योजना सुरु केलेली आहे. अवजारे बँकेची सर्व राज्यामध्ये अंमलबजावणी केली जात आहे. ज्या महिला बचत गटांना काही अवजारे घेऊन दिलेली आहेत. ठाणे जिल्ह्यात अवजारे बँक सर्वात प्रथम राबविण्यात आलेली आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये मजुरांची अतिशय कमतरता आहे. जिल्ह्यामध्ये महिला बचत गट ३६०० आहेत. महिलांनी शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करावी याकरीता अवजारांचे संच दिलेले आहेत. त्याला अवजारे बँक असे नाव दिलेले आहे. अवजार बँकेमुळे महिला बचत गटांना चांगला लाभ झालेला आहे व पर्यायाने भागातील शेतक-यांचाही फायदा होत आहे. पीडी डीआरडी, महिला आर्थिक विकास महामंडळ, एनआरएमएल अशा ३ ते ४ यंत्रणांच्या माध्यमातून बचत गट तयार करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :**

दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ रोजी समितीने ठाणे जिल्हापरिषदेला दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने आणि दिनांक ७ जून, २०१७ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी समितीला ठाणे जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकाबाबत खालीलप्रमाणे माहिती दिली. ठाणे जिल्हापरिषदेचे गत ३ वर्षातील वर्षाचे अंदाजपत्रक पाहता जी तरतूद करण्यात आली होती त्यापेक्षा थोडा कमी खर्च झालेला असून या तरतूदीतून २५०० किशोरवयीन मुलींना लैंगिक शिक्षण, आरोग्य पोषण आहार प्रशिक्षण तसेच मासिक पाळी व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणारे या किशोर वयीन मुलींना प्रशिक्षण देणे तज्ञ डॉक्टर, सुपरवायझर तसेच एन एन यांना या प्रशिक्षणासाठी तासिकेप्रमाणे मानधन ही दिले गेले आहे. तसेच महिलांना पिठाची गिरणी इत्यादी प्रकारे साहित्य पुरविण्यात आलेले आहे. त्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ घ्यावयाचा असतो त्यांच्याकडून १०% रक्कम भरुन घेतली जाते अशा लाभार्थ्यांना साहित्य पुरविणे या योजनेंतर्गत आतापर्यंत ९३ लाभार्थीनी लाभ घेतलेला आहे. त्यानंतर समितीस विभागीय सचिवांनी अशी ही माहिती दिली की, सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या तीन वर्षात ठाणे जिल्हापरिषदेने बचत गटांसाठी कोणत्याही योजना राबविण्यात आल्या नव्हत्या. परंतू या वर्षी बचत गटांसाठी अनेक योजना घेण्यात आलेल्या आहेत. तसेच महिला बचत गटाचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी तसेच जे उत्पादन ते तयार करतात ते उत्पादन शासनाकडे एक हाती खरेदी करावे यासाठी जिल्हाधिका-यांसोबत टायअप केलेले आहे.

समितीने स्त्री-पुरुष सम प्रमाणत आणण्यासाठी कोणती उपाययोजना ठाणे जिल्हापरिषदेने केली अशी विचारणा केली असता, स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली एक स्कॉड नियुक्त करण्यात आला असून त्यांच्या मार्फत आढावा घेण्यात येतो व दोषींविरुद्ध कार्यवाही करण्यात येते असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले. त्यावर समितीने ठाणे जिल्ह्यातील शासकीय अनुदानित वसतिगृहातील मुलींना सॅनिटरी नॅपकीन दिले जातात काय ? दर महिन्याला किती सॅनिटरी नॅपकीन दिले जातात ? प्रत्येक मुलीला दर महिन्याला कमीत कमी १० सॅनिटरी नॅपकीन दिले जातात का ? अशी विचारणा केली त्यावर विभागीय सचिवांनी समितीला असे विहीत केले की, सन २०१६-१७ मध्ये ठाणे जिल्ह्यातील एकूण वसतिगृहामधील मुलींची संख्या ३७९ असून त्यांना सॅनिटरी नॅपकीनची १२०० पाकिटे देण्यात आली होती. त्यातून प्रत्येक मुलीला महिन्याला ५ सॅनिटरी नॅपकीन देण्यात येतात.

विभागीय सचिवांनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने आणि ठाणे जिल्ह्याच्या लिखित माहितीच्या अनुषंगाने समिती अशी शिफारस करीत आहे की, ठाणे जिल्हापरिषदेने सन २०१२-१३ ते २०१४-१५ या वर्षात जिल्हापरिषदेने महिलांच्या सक्षमीकरणासाठी ज्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात आणि बचत गटासाठी जी तरतूद अंदाजपत्रकात केलेली आहे ती तरतूद कल्याणकारी योजना व बचत गट यासाठी वापरण्यात आलेली नाही. यावरुन ठाणे जिल्हापरिषद महिलांसाठी जास्त सक्षमतेने काम करत नसून दुर्लक्ष करत आहेत असे समितीचे ठाम मत आहे. यास्तव ठाणे **जिल्हापरिषदेने महिलांच्या कल्याणकारी योजना सक्षमतेने राबविण्याकरीता जी तरतूद अंदाजपत्रकात या योजनासाठी केलेली आहे ती तरतूद प्रत्येक गरजू महिलांपर्यंत पोहचली पाहिजे यासाठी जनजागृती करणे आणि तसेच महिला या योजना पासून वंचित राहणार नाही यासाठी गांभीर्याने पाऊले उचलावित अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे आणि ठाणे जिल्हापरिषद याबाबत तत्परतेने पावले उचलून कार्यवाही करत आहे किंवा नाही याबाबत शासनाने यात लक्ष घालून त्याबाबत केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल समितीला तीन महिन्यात देण्यात यावा.**

**तसेच ठाणे जिल्हापरिषदेने जिल्ह्यातील एकूण वसतीगृहातील मुलींना महिन्याला ५ सॅनिटरी नॅपकीनच्या ऐवजी प्रत्येक मुलींना महिन्याला १० सॅनिटरी नॅपकीन पुरवावेत तसेच शासनाने जिल्हापरिषदेच्या सॅनिटरी नॅपकीन पुरविणारी मशीन आणि डिस्पोजेबल मशीन प्रत्येक मुलींच्या वसतिगृहात लावण्याबाबतची अंमलबजावणी लवकारात लवकर करण्यात यावी अशीही समितीची आग्रहाची शिफारस आहे आणि शासनाने याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीला सादर करावा. अशी समितीची शिफारस आहे.**

## ४. पालघर जिल्हापरिषद

### ४.१ पालघर, जिल्हापरिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत :

दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी महिलांचे हक्क व कल्याण समितीने पालघर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी जिल्हापरिषद, पालघर यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली होती.

शासकीय निमशासकीय व शासन अनुदानित संस्थेमधील सेवेतील भरतीसाठी महिलांकरीता ३०% जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणांची अंमलबजावणी जिल्हापरिषदेच्या सेवेमध्ये भरती करताना करण्यात येते काय ? असल्यास त्याबाबतचे निकष, भरतीची पद्धत इत्यादी बाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. जिल्हापरिषदेतील वर्ग १ ते ४ मध्ये तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजुर पदसंख्या किती आहेत ? त्यापैकी सन २०१४-२०१५ अखेर किती पदे भरण्यात आली आहेत ? वर्ग १ ते ४ मधील किती व कोणती पदे महिलांकरीता आरक्षित ठेवण्यात आली ? त्यामध्ये संवर्गनिहाय महिला अधिकारी/कर्मचारी यांची संख्या किती आहे ? महिला उमेदवारांसाठी राखीव असलेली वर्ग १ ते ४ मधील पदे भरण्यासाठी कोणती कार्यपद्धती अवलंबली जाते ? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी पालघर, जिल्हापरिषदेकडून खालील माहिती प्राप्त झाली आहे :**

उपरोक्त भेटीच्या वेळी जिल्हापरिषदेने दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने पालघर, जिल्हा परिषदेची स्थापना दिनांक ०१ ऑगस्ट, २०१४ रोजी झाली असून त्यावेळी वर्ग १ ते वर्ग ४ चे एकुण ८९६१ अधिकारी व कर्मचारी कार्यरत होते. त्यापैकी महिला अधिकारी व कर्मचारी यांची संख्या ३७०८ होती. महिला व बालकल्याण विभाग मंत्रालय, मुंबई यांचकडील शासन निर्णय क्रः- संकीर्ण १०९४ प्र.क्र.३६६/का-२/ दिनांक २२ जून, १९९४ व सा.प्र.वि..मंत्रालय मुंबई यांचेकडील परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०९७ /प्र.क्र.३१/९८/१६ -अ/ दिनांक १६ मार्च १९९९ मधील मार्गदर्शक सुचना नुसार सरळसेवा भरतीने पदे भरताना एकूण रिक्त पदांचा ३०% पदे महिला उमेदवारांसाठी समांतर आरक्षण निश्चीत करून रिक्त पदे महिला उमेदवारांमधून सरळसेवा भरतीने भरण्यात येतात. सा.प्र.वि.शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर, २००७ व २७, जून २००८ मधील मार्गदर्शक सुचनानुसार भरती करण्यात येते. सन २०१३-१४ व २०१४-१५ वर्षी ठाणे जिल्हा परिषदेकडे एकत्रित आकडेवारी असून पालघर जिल्हा १ ऑगस्ट २०१४ रोजी स्थापन झाल्यामुळे पालघर जिल्हा परिषदेत सन २०१६-२०१७ या वर्षात भरती प्रक्रिया न झाल्यामुळे पदे भरण्यात आलेली नाही.

**वर्ग १ ते ४ मधील सन २०१५-१६ तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर संख्या खालील प्रमाणे :—**

| वर्ग | मंजूर पद संख्या | | भरलेली | | रिक्त | | सन २०१५-१६ अखेर एकूण किती पदे भरण्यात आली | | भरण्यात आलेल्या पदांपैकी वर्ग निहाय महिला अधिकारी व कर्मचारी संख्या | | उक्त पदांपैकी वर्ग-३ व वर्ग-४ मधील किती व कोणती पदे महिलांकरिता आरक्षित पदांची संख्या. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | तांत्रिक पदे | अतांत्रिक पदे | तांत्रिक पदे | अतांत्रिक पदे | तांत्रिक पदे | अतांत्रिक पदे | तांत्रिक पदे | अतांत्रिक पदे | तांत्रिक पदे | अतांत्रिक पदे | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (१२) | (१३) |
| वर्ग-१ | २७ | १३४ | २० | १११ | ७ | २३ | ० | ० | ० | ० | शासन स्तरावर |
| वर्ग-२ | २ | १३६ | २ | ७४ | ० | ६२ | ० | ० | ० | ० | शासन स्तरावर |
| वर्ग-३ | १०९० | ८५३४ | ८५९ | ७४८४ | २३१ | १०५० | ० | ० | ० | ० | २९९३ |
| वर्ग-४ | ० | ५८१ | ० | ४११ | ० | १७० | ० | ० | ० | ० | १४९ |
| एकूण | १११९ | ९३८५ | ८८१ | ८०८० | २३८ | १३०५ | ० | ० | ० | ० | ३१४२ |

सन २०१३-१४ व २०१४-१५ वर्षी ठाणे जिल्हा परिषदेकडे एकत्रित आकडेवारी असून पालघर जिल्हा १ ऑगस्ट २०१४ रोजी स्थापन झाल्यामुळे पालघर जिल्हा परिषदेतील वर्ग १ व २ ची पदांची आरक्षित पदाबाबत माहिती शासन स्तरावर असून वर्ग ३ ते ४ मधील सन २०१५-१६ ची पदाची आकडेवारी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | महिलांकरीता आरक्षित असलेली पदे | सरळ सेवेची मंजूर पदे | महिलांकरिता आरक्षित पदांची संख्या |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | विस्तार अधिकारी (सा.) | २६ | ८ |
| २. | वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) | २३ | ७ |
| ३. | वरिष्ठ सहाय्यक (निवडीने) | २२ | ७ |
| ४. | कनिष्ठ सहाय्यक | १२२ | ३७ |
| | **एकूण सामान्य प्रशासन** | १९३ | ५९ |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ५. | विस्तार अधिकारी (ग्रा. प) | ५ | १ |
| ६. | ग्राम विकास अधिकारी | ३४ | १० |
| ७. | ग्राम सेवक | ३४३ | १०३ |
| | **एकूण ग्रामपंचायत विभाग** | ३८२ | ११४ |
| ८. | कनिष्ठ लेखा अधिकारी | ४ | १ |
| ९. | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | २३ | ७ |
| १०. | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | २० | ६ |
| ११. | मुख्य सेविका | १०३ | १०३ |
| | **एकूण अर्थ विभाग** | ४७ | १४ |
| १२. | पशुधन पर्यवेक्षक | ६१ | १८ |
| | **एकूण महिला व बाल कल्याण** | १०३ | १०३ |
| १३. | कनिष्ठ अभियंता स्थापत्य | १५ | ४ |
| | **एकूण पाणीपुरवठा** | १५ | ४ |
| १४. | विस्तार अधिकारी (कृषि) | १० | ३ |
| १५. | कृषि अधिकारी | ४ | १ |
| | **एकूण कृषि अधिकारी** | १४ | ४ |
| १६ | शाखा अभियंता | ५१ | १५ |
| .१७. | स्थापत्य अभियांत्रिकी सहा. | ७० | २१ |
| | **एकूण बांधकाम** | १२१ | ३६ |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १८. | आरोग्य सेविका | ३७२ | ३७२ (१००% महिलांसाठी राखीव) |
| १९ | आरोग्य सहाय्यिका | ६५ | ६५ (१००% महिलांसाठी राखीव) |
| २० | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ६५ | २ |
| २१ | कृष्ठ रोग तंत्रज्ञ | ८ | २ |
| २२ | औषध निर्माण अधिकारी | ६९ | २१ |
| २३ | आरोग्य पर्यवेक्षक | ११ | ३ |
| २४ | विस्तार अधिकारी (आरोग्य) | ४ | १ |
| | **एकूण आरोग्य विभाग** | ५६५ | ४७५ |
| २५ | विस्तार अधिकारी (शि) श्रेणी-२ | ३३ | १० |
| २६ | पदवीधर शिक्षक/सहशिक्षक | ६७०२ | २०११ |
| | **एकूण शिक्षण विभाग** | ६७३५ | २०२१ |
| | एकूण वर्ग-क | ८२३६ | २८४८ |
| | वर्ग-ड चे कर्मचारी | | |
| २७ | शिपाई | ४७२ | १४२ |
| २८ | सफाई कामगार | २४ | ७ |
| | एकूण वर्ग-ड | ४९६ | १४९ |
| | एकूण क-व-ड | ८७३२ | २९९७ |

सन २०१३-१४ व २०१४-१५ वर्षी ठाणे जिल्हा परिषदेकडे एकत्रित आकडेवारी असून पालघर जिल्हा १ ऑगस्ट २०१४ रोजी स्थापन झाल्यामुळे पालघर जिल्हा परिषदेतील वर्ग १ ते ४ मधील सन २०१५ -१६ ची पदाची संख्या खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | संवर्ग | उक्त पदांपैकी वर्ग ३ वर्ग ४ मधील किती व कोणती पदे महिलांकरीता आरक्षित पदांची संख्या | महिलांची कार्यरत पदे | रिक्त पदे | सदरची पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत ? |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| (१) | विस्तार अधिकारी (सां) | ८ | ५ | ३ | स्थापत्य जिल्हा |
| (२) | वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) | ७ | १४ | ० | १ ऑगस्ट, २०१४ |
| (३) | वरिष्ठ सहाय्यक (निवडीने) | ७ | | ० | निर्माण झाल्यानंतर |
| (४) | कनिष्ठ सहाय्यक | ३७ | २६ | १ | पालघर जिल्हयात |
| | **एकुण सामान्य प्रशासन** | ५९ | ५५ | ४ | भरती प्रक्रिया |
| (५) | विस्तार अधिकारी (ग्रा.पं) | १ | १ | ० | करण्यात आलेली |
| (६) | ग्राम विकास अधिकारी | १० | १७ | ० | नाही. |
| (७) | ग्रामसेवक | १०३ | १०८ | ० | |
| | **एकुण ग्रामपंचायत विभाग** | ११४ | १२६ | ० | |
| (८) | कनिष्ठ लेखा अधिकारी | १ | १ | ० | |
| (९) | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | ७ | १ | ६ | |
| (१०) | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | ६ | २ | ४ | |
| | **एकुण अर्थ विभाग** | १४ | ४ | १० | |
| (११) | मुख्य सेविका | १०३ | ८८ | १५ | |
| | **एकुण महिला व बाल कल्याण** | १०३ | ८८ | १५ | |
| (१२) | पशुधन पर्यवेक्षक | १८ | ७ | ११ | |
| | **एकुण पशुसंवर्धन** | १८ | ७ | ११ | |
| (१३) | कनिष्ठ अभियंता स्थापत्य | ४ | ० | ४ | |
| | एकुण पाणीपुरवठा | ४ | ० | ४ | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| (१४) | विस्तार अधिकारी (कृषी) | ३ | ५ | ० | पालघर जिल्हा |
| (१५) | कृषि अधिकारी | १ | ० | १ | १ ऑगस्ट,२०१४ |
| | **एकुण कृषि विभाग** | ४ | ५ | १ | निर्माण झाल्यानंतर |
| (१६) | शाखा अभियंता | १५ | ० | १५ | पालघर जिल्हयात |
| (१७) | स्थापत्य अभियांत्रिकी सहा | २१ | ५ | १६ | भरती प्रक्रिया |
| | **एकुण बांधकाम** | ३६ | ५ | ३१ | करण्यात आलेली |
| (१८) | आरोग्य सेविका | ३७२ | ३२७ | ४५ | नाही. |
| (१९) | आरोग्य सहाय्यिका | ६५ | ४८ | १७ | |
| (२०) | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ११ | ७ | ४ | |
| (२१) | कृष्ठ रोग तंत्रज्ञ | २ | ० | २ | |
| (२२) | औषध निर्माण अधिकारी | २१ | १४ | ७ | |
| (२३) | आरोग्य पर्यवेक्षक | ३ | ० | ३ | |
| (२४) | विस्तार अ आरोग्य विभाग | १ | ० | १ | |
| | **एकुण अ आरोग्य विभाग** | ४७५ | ३९६ | ७९ | |
| (२५) | विस्तार अधिकारी (शि) श्रेणी-२ | १० | १ | ९ | |
| (२६) | पदवीधर शिक्षक/सहशिक्षक | २०११ | २७७४ | ० | |
| | **एकुण शिक्षण विभाग** | २०२१ | २७७५ | ९ | |
| | **एकुण वर्ग क** | २८४८ | ३४६१ | १६४ | |
| | **वर्ग ड चे कर्मचारी** | | | ० | |
| (२७) | शिपाई | १४२ | ९७ | ४५ | |
| (२८) | सफाई कामगार | ७ | १२ | ० | |
| | **एकुण वर्ग-ड** | १४९ | १०९ | ४० | |
| | **एकुण क-व ड कर्मचारी** | २९९७ | ३५७० | २०४ | |

महिला व बालकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०९६/प्र.क्र.३०/का-२/दिनांक १ ऑगस्ट, १९९७ मधील मार्गदर्शक सुचना नुसार वर्ग १ व वर्ग २ ची पदे शासन मार्फत भरण्यात येतात. जिल्हा परिषद अंतर्गत केवळ वर्ग ३ व ४ ची पदे सरळसेवा भरती

करताना एकूण रिक्त पदांचे ३०% पदे समांतर आरक्षण निश्चित करून रिक्त पदे महिला उमेदवारांमधून सळसेवा भरतीने व पदोन्नतीने भरण्यात येतात. तसेच सा.प्र.वि.शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर, २००७ व २७ जून, २००८ मधील मार्गदर्शक सुचनानुसार भरती करण्यात येते.

**पालघर जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

पालघर जिल्हापरिषदेला दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्याधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेमध्ये महिलांकरीता वर्ग १ ते वर्ग ४ ची पदे भरण्यात आल्याचे नमूद केले आहे. त्यापैकी महिला अधिकारी व कर्मचारी यांची संख्या किती आहे. नोकरीत महिलांसाठी ३०% आरक्षण देण्याबाबत दि.२५ मे, २००१ रोजीचा शासन निर्णयानुसार भरती करण्यात आली आहे काय, नसल्याची त्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वर्ग १ ते वर्ग ४ एकूण ८९६१ अधिकारी होते. त्यापैकी महिला अधिकारी व कर्मचारी यांची ३७०८ पदे भरलेली आहेत. शिक्षक, एएनएम यांची १०० टक्के पदे भरली जातात. विस्तार अधिकारी (सामान्य) ८ पदे राखीव आहेत त्यापैकी ५ पदे भरली असून ३ पदे रिक्त आहेत. वरिष्ठ सहायक (लिपिक) पदाची १४ पदे भरली आहे.कनिष्ठ सहायक ३७ पदे असून ३६ पदे भरली असून १ पद रिक्त आहे. ग्रामपंचायत, अर्थ विभाग, महिला व बालकल्याण विभागातील पदे देखील रिक्त आहेत. १३ सीडीपीओ पैकी फक्त २ पदे भरण्यात आलेली आहेत. उर्वरीत पदे भरलेली नाहीत. असे समितीस सांगितले.

समितीने महिला व बाल कल्याण विभागाची वर्ग २ ची २ पदे आहेत ? तसेच कनिष्ठ अभियंता स्थापत्य पदाची ४ पदे रिक्त आहेत. पाणी पुरवठा विभागातील ४ पदे देखील रिक्त आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महिला व बालकल्याण विभागात महिलांची ८८ पदे कार्यरत असून १५ पदे रिक्त आहेत. पालघर जिल्हयाची निर्मिती १ ऑगस्ट, २०१४ रोजी झाली. त्यानंतर शासनाने नवीन भरतीसाठी अद्याप पर्यत परवानगी दिलेली नाही. दिनांक १८ फेब्रुवारी, २०१६ रोजीचा जो शासन निर्णय होता त्यामध्ये बदल करण्यात आला व १८ जुलै, २०१६ रोजी शासन निर्णय काढण्यात आला. त्याप्रमाणे ठाणे आणि पालघर जिल्हयांची समावेशन प्रक्रिया अद्याप पर्यंत पुर्ण झालेली नाही. दोन वर्षापासून कोणत्याही प्रकारे भरती प्रक्रिया करण्यात आलेली नाही. असे समितीस सांगितले.

समितीने ठाणे जिल्हयाचे विभाजन झाल्यानंतर तेथील स्टाफ पालघर जिल्हयामध्ये पाठविला असता त्यापैकी किती अधिकारी व कर्मचारी हे पालघर जिल्हयात हजर झाले नाहीत ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समावेशनासंबधात दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित झाला आहे. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. भरतीसाठी प्रस्ताव शासनाकडे मार्च २०१७ मध्ये पाठविण्यात आला त्यानुसार शासनाची परवानगी मिळाली की भरती प्रक्रिया सुरु करण्यात येईल. असे समितीस सांगितले.

समितीने ठाणे जिल्हापरिषदेकडे जो निधी होता तो जिल्हा परिषदेला वर्ग झालेला आहे काय ?

तसेच पालघर जिल्हयांच्या निर्मितीनंतर जो सेस फंड मिळावयास पाहिजे होता तो देण्यात आला आहे काय ? विद्यार्थ्यांना गणवेश व बुट साहित्य देण्यात आले नाही असे नमूद केले आहे, हे खरे आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पाठपुरावा केल्यानंतर सदर निधी मिळालेला आहे. परंतु जिल्हयाच्या विभाजनाच्या वेळी जिल्हा परिषदेचा सेस एकत्र होता त्याबद्दल अजूनही पाठपुरावा सुरु आहे. तसेच पालघर जिल्हयांच्या निर्मितीनंतर जो सेस फंड देण्यात येतो तो अद्याप देण्यात आलेला नाही. गणवेश साहित्य वाटपाची योजना राबविलेली नाही. परंतु विद्यार्थ्यांना भोजन दिले जाते. पालघर जिल्हयासाठी डीपीडीसीमध्ये प्रत्येक मुलांच्या गणवेशासाठी निधीची मागणी केली होती. परंतु अद्याप मान्यता मिळालेली नाही. योजनेमध्ये तांत्रिक मान्यतेची अडचण येत असते. परंतु विद्यार्थ्यांना आता भोजन, निवासस्थान, तसेच पुस्तके उपलब्ध करून देत आहोत. असे समितीस सांगितले.

समितीने महिला उमेदवारांसाठी सरळसेवा भरतीसाठी ३० टक्के प्रमाणे समांतर आरक्षण असल्याने स्वतंत्र बिंदू नामावली ठेवलेली नाही, बिदुंनामवलीमध्ये नोंद घेतली जात नाही असे नमूद केले आहे. व भरती प्रक्रिया राबवू नये याबाबत शासनाकडून आदेश मिळालेले आहेत काय ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समायोजनाचा जीआर निघाला होता त्याची प्रक्रिया शेवटच्या टप्प्यापर्यत झाल्यानंतर शासन निर्णय बदलण्यात आला. त्यानंतर डिव्हीजनल कमिशनरांच्या अध्यक्षतेखाली समिती असून आम्ही याद्या प्रसिद्ध करून डिव्हीजनल कमिशनरांची मान्यता नोव्हेंबर, २०१६ मध्ये प्राप्त झाली. मान्यता मिळाल्या नंतर सर्वांना प्रमोशन दिले गेले.

जिल्हा परिषदेच्या रोस्टरला अद्याप शासनाकडून मान्यता मिळालेली नाही. असे समितीस सांगितले.

समितीने जिल्हा परिषदेच्या आरोग्य केंद्रामध्ये डॉक्टरांची काही पदे रिक्त आहेत काय ? स्त्री रोग तज्ञ प्राथमिक आरोग्य केंद्रावर नाहीत असे नमूद करण्यात आले आहे ? जिल्हयाच्या सिव्हील हॉस्पिटल मान्य झालेले आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या आरोग्य केंद्रामध्ये डॉक्टरांची काही रिक्त पदे मागच्या वर्षी रिक्त होती. त्यामुळे जिल्हा परिषदेने डॉक्टर नेमण्याचा निर्णय घेतला. तसेच स्त्री रोग तज्ञ प्राथमिक आरोग्य केंद्रावर नसतो. एसडीएच ही बाब सिव्हील सर्जनच्या अखत्यारित येते. जिल्हयाच्या सिव्हील हॉस्पिटल मान्य झालेले नाही. तसेच खाटांची मंजुरी अद्याप मिळालेली नाही.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, पालघर जिल्हापरिषद यांनी खालीलप्रमाणे लेखी माहिती दिली :-**

पालघर जिल्हयाची निर्मिती १ ऑगस्ट, २०१४ रोजी झालेली आहे. ठाणे पालघर समायोजनाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. पालघर जिल्हयातील रिक्त असलेली भरती प्रक्रिया अद्यापही राबविण्यात आलेली नाही. भविष्यात म्हणजेच यावर्षी भरती प्रक्रिया राबविताना महिलांचे आरक्षण ३०% राखीव ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

महिला व बालकल्याण विभागामधील बाल विकास प्रकल्प अधिकारी वर्ग २ यांचे एकूण १३ मंजुर पदांपैकी १२ पदे भरण्यात आलेली आहेत १ पद रिक्त आहे.

**राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत भरती झालेल्या कर्मचा-यांची संख्या तालुका स्तरावरील**

| अ.क्र | सन | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त |
|---|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | १९३ | १७२ | २१ |
| २ | २०१६-१७ | २१६ | २१६ | ० |
| ३ | २०१७-१८ | २२३ | २०४ | १९ |

**जिल्हा स्तरावरील**

| अ.क्र | सन | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त |
|---|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | १५ | १० | ५ |
| २ | २०१६-१७ | २६ | २४ | २ |
| ३ | २०१७-१८ | २६ | २२ | ४ |

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

पालघर जिल्हापरिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ३ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने पालघर जिल्हापरिषदेच्या वर्ग १ ते ४ मधील अधिकारी कर्मचारी यांची मंजूर पदसंख्या किती आहे ? संवर्ग १ ते २ मधील किती व कोणती पदे महिलांकरीता आरक्षित करण्यात आली आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय सचिव यांनी वर्ग १ व २ ची पदे शासन स्तरावरुन तर वर्ग ३ व ४ ची पदे भरली जातात. आतापर्यंत ही पदे भरण्यावर बंदी होती. रिक्त पदांच्या ५० % जास्त नाही व एकूण पदांच्या केवळ ४ टक्केपेक्षा जास्त नाही, एवढीच पदे भरण्यास मुभा होती. मागील वर्षी सर्व जिल्हा परिषदांसाठी भरती प्रक्रिया सुरु केली त्यावेळी वित्त विभागाने नवीन आकृतीबंध मंजुर करून घेण्यास सांगितले होते. तसेच जोपर्यंत नवीन आकृतीबंध मंजुर होत नाही तोपर्यत भरती प्रक्रिया करु नका, असेही सांगितले होते. सर्व जिल्हा परिषदेमध्ये एकाच वेळी भरती प्रक्रिया राबवितो. जेणेकरून एकच उमेदवार सर्व ठिकाणी अर्ज करु शकत नाही. वित्त विभागाकडुन भरती प्रक्रियेला परवानगी मिळेल असे मुख्यमंत्री महोदयांनी बैठकीमध्ये सांगितले. त्यामुळे या महिन्यात परवानगी मिळेल असे वाटते. परवानगी मिळाल्यानंतर आम्ही तात्काळ भरती प्रक्रिया सुरु करु. अशी माहिती समितीस दिली.

समितीने जिल्हा समाजकल्याण अधिकारी वर्ग १ च्या प्रस्तावाबाबत कार्यवाही झाली आहे काय ? अशी विचारणा केली,

त्यावर विभागीय सचिव यांनी वर्ग १ व २ संवर्गातील अधिका-यांची नियुक्ती शासनाकडून करण्यात येते. रिक्त पदांबाबत शासनाला माहिती कळवित असतो, त्यानंतर पुढील कार्यवाही होते.

समितीने जिल्हा परिषदेसाठी जो सेस फंड मिळायला पाहिजे तो अद्यापपर्यंत मिळालेला नाही. या सेस फंडाच्या सद्य : स्थितीची माहिती द्यावी अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय सचिवांनी प्रॉपर्टी रजिस्ट्रेशनवर लावल्या जाणा-या सेसचा सेस फंडामध्ये सर्वात मोठा वाटा असतो. संपूर्ण राज्यातील सर्वच जिल्हा परिषदांचा सेसफंड मोठया प्रमाणात थकित आहे ही वस्तुस्थिती आहे. आम्ही याबाबत वित्त विभागाला कळवितो ते बजेटप्रमाणे निधी रिलीज करतात. एकंदर आर्थिक परिस्थिती पाहूनच वित्त विभागाकडून हा निधी रिलीज केला जातो.

समितीने निधी रिलीज न झाल्यामुळे महिलांच्या योजना राबविल्या जात नाहीत. अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय सचिवांनी प्रॉपर्टी रजिस्ट्रेशन ज्या प्रमाणात होते त्या प्रमाणे प्लॅन होत नाही. कारण राज्य शासनाकडून प्रत्यक्षात निधी येत नाही. याबाबत वित्त विभागाला विनंती असते. हे जिल्हा परिषदेचे हक्काचे व गोळा झालेले पैसे असतात परंतु वित्त विभागाकडून रिलीज न झाल्यामुळे त्यांना मिळत नाहीत. कधी कधी कमी अधिक रजिस्ट्रेशन झाले तर त्यानुसार पैसे मिळतात. असे समितीस सांगितले.

समितीने डीपीपीसी मध्ये मुलांच्या गणवेशाबाबत निधीची मागणी केली होती परंतु त्याला अद्यापर्यंत मान्यता मिळाली नसल्याचे समितीला सांगण्यात आले त्याबाबत शासनाची भूमिका स्पष्ट करावी व विलंबाची कारणे काय आहेत याबाबत समितीला माहिती द्यावी. अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्ताव दिलेला आहे. असे समितीला सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी समितीने पालघर जिल्हापरिषद येथे भेट दिनांक ३ मे, २०१८ रोजी संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेतली यावेळी समितीने पालघर जिल्हा परिषदेच्या वर्ग १ ते ४ मधील अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर पद संख्या किती व संवर्ग १ ते २ मधील किती कोणती पदे महिलांकरीता आरक्षित करण्यात आली आहेत याबाबत विचारणा केली असता विभागीय सचिवांनी वर्ग १ ते २ ची पदे शासन स्तरावरुन भरली जातात आणि वर्ग ३ व ४ पदे ग्रामविकास विभागाकडून भरली जातात. आतापर्यंत ही पदे भरण्यावर बंदी होती रिक्त पदाचा ५०% जास्त नाही व एकूण पदाच्या केवळ ४% पेक्षा जास्त नाही एवढीच पदे भरण्यास शासनाने

मंजूरी दिली होती. गतवर्षी सर्व जिल्हा परिषदांसाठी भरती प्रक्रिया सुरु केली असता त्यावेळी वित्त विभागाने नवीन आकृतीबंध मंजुर करून घेण्यास सांगितले होते आणि जो पर्यंत नवीन आकृतीबंध मंजूर होत नाही तो पर्यंत भरती प्रक्रिया करु नये असे निदेश दिले होते. यास्तव पालघर जिल्हापषिदेच्या वर्ग १ ते ४ मधील अधिकारी कर्मचारी यांची रिक्त पदे जो पर्यंत आकृतीबंध तयार होऊन त्यास वित्त विभागाची मान्यता मिळत नाही तो पर्यत पदभरती करता येणार नाही. असे समितीस सांगितले.

त्यानंतर समितीने अशी विचारणा केली की पालघर जिल्हापरिषदेसाठी जो सेसफंड मिळायला हवा होता तो अद्यापर्यंत न मिळण्याची कारणे काय आहेत ? यावर विभागीय सचिवांनी जिल्हापरिषदेमध्ये प्रॉपर्टी रजिस्ट्रेशन लावला जाणा-या सेस फंड सर्वात मोठा असतो संपूर्ण राज्यातील सर्व जिल्हापरिषदेचा हा सेस फंड फार मोठया प्रमाणात थकीत आहे. ही वस्तूस्थिती आहे याबाबत वित्त विभागाकडून सतत कळविले जाते व आवश्यकतेनुसार वित्त विभाग हा निधी जिल्हापरिषदांना उपलब्ध करून देते. जिल्हा परिषदेच्या रिक्त जागा व थकित रक्कमेचा मोठया प्रमाणावरील सेस फंड याबाबतची विभागीय सचिवांनी समिती समोर मांडलेली वस्तूस्थिती पहाता **पालघर जिल्हापरिषदेने शासनाकडे सादर केलेला आकृतीबंधाची संपूर्णपणे शहानिशा करून तो आकृतीबंध जिल्हापरिषदेला शासनाने तात्काळ मंजूर करून देण्यात यावा. जेणेकरून जिल्हापरिषदेला त्याच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या रिक्त जागा तात्काळ भरता येतील तसेच आरोग्य केंद्रातील रिक्त जागा ही भरता येतील अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. तसेच प्रॉपर्टी रजिस्ट्रेशन जिल्हापरिषदेला मिळणारा सेस फंड हा फार मोठया प्रमाणात मिळतो तो शासनाने (वित्त विभागांतर्गत) तात्काळ जिल्हापरिषदेला उपलब्ध करून द्यावा जेणेकरून जिल्हापरिषदेला सेस फंडातून विकासाची कामे जलद गतीने करता येतील अशीही समितीची आग्रहाची शिफारस आहे. या दोन्ही शिफारशीची शासनाने तात्काळ अंमलबजावणी करावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ३ महिन्यात सादर करावा.**

### ४.२ पालघर जिल्हापरिषदेचे गत ३ वर्षातील वर्षनिहाय अंदाजपत्रक : -

दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्याधिकारी यांनी समितीस विचारलेल्या प्रश्नांना माहिती दिली त्यावेळी समितीने जिल्हा परिषदेचे गत ३ वर्षातील (सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५) वर्षनिहाय अंदाजपत्रक किती रक्कमेचे आहे ? उक्त अंदाजपत्रकातील रक्कमेपैकी एकूण किती रक्कम जिल्हा परिषद क्षेत्रातील महिलांच्या कल्याणकारी योजनासांठी राखून ठेवण्यात आली आहे ? जिल्हा परिषदेमार्फत महिलांचे बलशाहीकरण करण्याकरिता तसेच आर्थिकदृष्टया मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरिता राबविण्यात येणा-या योजना तसेच महिलांकरिता देण्यात येणा-या सोयी-सवलती इत्यादी योजनांबाबत माहिती देण्यात यावी ? तसेच, उक्त योजनांवर गत ३ वर्षात वर्षनिहाय व योजनानिहाय एकूण किती खर्च झाला ? जिल्हा परिषदेमार्फत महिलांसाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजना त्यांना देण्यात येणा-या सोयी-सवलती इ.बाबतची माहिती देण्यात यावी. तसेच, या योजनांची माहिती गरजू महिलांपर्यत पोहचविण्यासाठी व त्यांनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी स्वतंत्र अशी योजना जिल्हा परिषदांकडे आहे काय? जिल्हा परिषद निधीतून महिलांशी संबधित कार्यक्रमासाठी १०% रक्कम खर्च करण्यात येते काय ? हा निधी महिला व बालकल्याण विभागासाठी राखून ठेवला असल्यास, गत ३ वर्षात कोणकोणत्या योजनांवर खर्च करण्यात आली त्याची माहिती देण्यात यावी ? महिलांच्या आरोग्याबाबत जिल्हा परिषदेमार्फत कोणत्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात याची सविस्तर माहिती द्यावी ? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी पालघर जिल्हापरिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :-**

जिल्हा परिषदेत गत ३ वर्षातील (२०१३-१४-, २०१४-१५ व २०१५-१६) वर्षनिहाय अंदाजपत्रक खालीलप्रमाणे आह . सन २०१३-१४ व २०१४-१५ वे एकत्रित अंदाजपत्रक ठाणे जिल्हा परिषदे कडुन करण्यात आलेले आहे. पालघर जिल्हा १ ऑगस्ट २०१४ रोजी स्थापन झाल्यानंतर पालघर जिल्हापरिषद अंदाजपत्रक सन २०१५-१६ पासुन करण्यात आले आहे.

| वर्ष | एकुण अंदाजपत्रक |
|---|---|
| १) सन २०१३-२०१४ | ० |
| २) सन २०१३-२०१४ | ० |
| ३) सन २०१३-२०१४ | २८,४६,०२२ |

महिला व बालकल्याणकारी योजनांसाठी अंदाजपत्रक करताना जिल्हापरिषदेच्या स्वउत्पन्नाच्या बाबी विचारात घेऊन अदाजपत्रकात तरतूद करण्यात येते.

| वर्ष | तरतूद |
|---|---|
| १) सन २०१३-२०१४ | ० |
| २) सन २०१४-२०१५ | ० |
| ३) सन २०१५-२०१६ | १७६,५७,४८०/ |

ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र. झेडपीए २०१० अनैसंक्र, ३३ प्र.क्र. १६८ पं रा. -१ मंत्रालय मुंबई दिनांक १० मार्च २०११ व शासन शुद्धी पत्रक दि.२० जुलै २०११ दि. १६ जुन २०१२ शासन निर्णय क्र. झेडपीए २०१३ प्र.क्र. ७६ पं रा. -१ दि. २४ जानेवारी २०१४ नुसार महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातुन योजनाची अमलबजावणी करण्यात येते त्यामध्ये खालील योजनांचा समावेश करण्यात आला आहे .

१) महिलांना व्यवसाय व तांत्रिक प्रशिक्षण देणे.

(अ) ग्रामीण भागातील मुलींना टंकलेखन / वाहन चालक प्रशिक्षण.

(ब) सौंदर्य प्रसाधनाचे प्रशिक्षण देणे.

(क) एम.एस.सी. आय. टी. चे प्रशिक्षण देणे.

२) ग्रामीण भागातील महिलांना कायदेविषयक व विधीविषयक मार्गदर्शन करणे.

३) ग्रामीण भागातील किशोरवयीन मुलीना व महिलांना जेंडर प्रशिक्षण.

४) पंचायत राज संस्थामधील महिला प्रतिनीधीनी कामकाजाचे प्रशिक्षण देणे.

५) महिला लोक प्रतिनिधींचा मेळावा आयोजित करणे.

६) ग्राम, पं.स. व जि. प. स्तरावरील महिला प्रतिनिधींचा अभ्यास दौरा आयोजित करणे.

७) मुलींना स्वसंरक्षणासाठी व शारिरीक विकासासाठी ज्युडो कराटे प्रशिक्षण देणे.

८) महिलांना साहित्य पुरविणे (अ) पिठाची गिरणी पुरविणे, (ब) पिको फॉल मशिन पुरविणे, शिवण मशिन पुरविणे.

९) इयत्ता ५ ते १२ वी तील शिकणा-या ग्रामीण भागातील मुलींना दोन चाकी सायकल पुरविणे.

१०) विशेष प्राविंण्य मिळविलेल्या मुलींचा सत्कार करणे.

११) आदर्श अंगणवाडी कार्यकर्ती / मदतनीस पुरस्कार.

१२) महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे.

राष्ट्रीय ग्रमीण जीवनोन्नती अभियानांअतर्गत ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील, कुटुंबातील, महिलांचे स्वयंसहाय्यता बचत गट तयार करणे टप्प्या टप्प्याने दशसुत्री मुल्यमापनानुसार फिरता निधी मिळवून देणे व त्यांना बँके मार्फत कर्ज उपलब्ध करून आर्थिक मदत मिळवून रोजगार निर्मितीस सहाय्य करणे.

१) **मीना राजू मंच -** बालकांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी नव्हे तर प्रत्येक मुल शाळेत येण्यासाठी भारत सरकारने राज्य शासनाच्या मदतीने सन २००१ पासून सर्व शिक्षा अभियान हा महत्वाकांक्षी प्रकल्प सुरु केला आणि त्याचाच महत्वाचा भाग म्हणजे मीना राजू मंच पालघर जिल्हयात एकूण ६२३ उच्च प्राथमिक शाळांमध्ये मीना राजू मंचची स्थापना करण्यात आली आहे.

मुलांमुलींमधील स्त्री पुरुष असमानतेविषयी गैरसमज दूर करणे.

मुलांमुलींमध्ये शिक्षणाचे महत्व रुजवणे, गोडी वाढविणे आणि संवेदनशील कुमारमन तयार करणे. नियमित उपस्थिती वाढविण्यासाठी आनंदी शिक्षण असे पोषक वातावरण तयार करणे.

२) **उपस्थिती भत्ता :-** जिल्हा परिषदेच्या शाळांतर्गत इयत्ता १ ली ते ४ थी च्या एकूण ७५६४९ मुली शिक्षण घेत आहेत . सदर उपस्थिती भत्ता हा शाळेतील उपस्थित असणा-या सर्वच मुलींना देण्यात येतो.

३) **मोफत पाठ्यपुस्तक -** जिल्हा परिषद व अनुदानीत शाळांमध्ये इयत्ता १ ली ते ८ वी च्या मुलांना व मुलींना १००% मोफत पाठयपुस्तक पुरविण्यात येतात त्यापैकी २७३९७३ एवढी मुलींची संख्या आहे.

४) **मोफत गणवेश योजना-** जिल्हा परिषदे अंतर्गत इयत्ता १ ली ते ८ वी मधील प्रवर्गाच्या एकूण ९६९२५ मुली शिक्षण घेत आहेत व या सर्व मुलींना मोफत गणवेश पुरविण्यात आले आहे.

५) **बालिका आंनद मेळावा -**जिल्हा परिषेदतील जि.प. शाळा २१९१ अ एकुण इयत्ता १ ली ते ८ वी च्या ७३३७९ अनुसचित जमातीच्या १००% मुलींना सुवर्ण महोत्सवी लाभ देण्यात येतो.

६) **लेक शिकवा अभियान -**जिल्हापरिषदेच्या सर्वच शाळामध्ये ३ जानेवारी ते २४ जानेवारी पर्यंत मुलीच्या शिक्षणावर आधारित विविध उपक्रम व नाटिका, स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले.

योजनांवर मागील ३ वर्षात वर्षनिहाय व योजनानिहाय एकूण खर्च तपशील परिशिष्ट "अ" पहावे.

उत्कृष्ट काम करणा-या पर्यवेक्षिका, अंगणवाडी व मदतनीस यांना आदर्श पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. १५ वर्षापेक्षा जास्त सेवा असणा-या महिला शिक्षिकांसाठी, ज्यांनी मुलींच्या शिक्षणात भरीव योगदान दिले आहे. तसेच वंचित घटकातील मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे त्यांना थोर समाजसुधारक सावित्रीबाई फुले राज्यशासन आदर्श शिक्षिका पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्यात येतो. राज्य शासन स्तरावर त्या महिलांना मानचिन्ह व रु.१०००००/- देवून गौरविले जाते. उत्कृष्ट काम करणा-या आशा स्वंयसेविका, गतप्रवर्तक, आरोग्य सेविका सहाय्यीका यांना आदर्श पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र. झेडपीए २०१० अनैसंक्र, ३३ प्र.क्र १६८ पं रा. -१ मंत्रालय मुंबई दिनांक १० मार्च २०११ व शासन शुद्धी पत्रक दि.२० जुलै २०११ दि. १६ जुन २०१२ शासन निर्णय क्र. झेडपीए २०१३ प्र.क्र. ७६ पं रा. -१ दि. २४ जानेवारी, २०१४ नुसार महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी महिला व बालकल्याण समितीच्या शासन निर्णयातील योजना राबविल्या जातात.

ग्रामीण भागातील मुली व महिलांना व्यवसाय व तांत्रिक प्रशिक्षण देणे व विविध साहित्य पुरविणे इ. योजना राबविण्यात येतात तसेच जिल्हा परिषदमार्फत राबविण्यात येणा-या योजनांची माहिती गरजु महिलांपर्यत पोहोचविण्याचा पंचायत स्तरावरिल कार्यरत कर्मचा-यांचा (ग्राम सेवक, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी ) मार्फत लाभ देणे करिता प्रोत्साहित करण्यात येते. तसेच स्थानिक स्तरावर होणा-या सभेमध्ये पदाधिकारी यांना योजनेचे प्रारुप देवुन त्यांच्या सहकार्याने योजना प्रभाविपणे राबविण्यात येते. तसेच ग्रामीण पातळीवर महीला मेळावे, ग्रामसभा, विविध प्रदर्शने, वर्तमानपत्रातुन प्रसिद्धी देण्यात येवुन महिलांपर्यत जनजागृती करण्यात येते.

महिलाच्या कल्याणाकरीता राबविण्यात येणा-या व त्यांना देण्यात येणा-या सोयी सवलतीकरिता जिल्हा परिषदेला राज्य शासनाकडे स्वतंत्ररित्या कोणतेही अनुदान प्राप्त झालेले नाही.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, पालघर जिल्हापरिषद यांनी खालीलप्रमाणे लेखी माहिती दिली :-**

पालघर जिल्हापरिषद निर्मिती नंतर ठाणे जिल्हापरिषदेकडून जिल्हापरिषदेस देय अनुदान रक्कम रुपये १०१.०६ कोटी पैकी रक्कम रुपये ९५.२३ कोटी प्राप्त झाले असुन जिल्हा परिषदेस निधी अंतगर्त रक्कम रुपये २.८२ कोटीचे दायीत्व अप्राप्त आहे.

पालघर जिल्हा स्थापनेपासून सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये समाजकल्याण विभागांतर्गत चालविण्यात येणा-या स्वयंसेवी संस्थेच्या अनुदानित वसतीगृहातील विद्यार्थ्यांना गणवेश वा इतर साहित्य पुरविण्यात आलेले नाही. सन २०१३-१४ मध्ये सदरचा लाभ जि. प. ठाणे कडून देण्यांत आलेला आहे.

पालघर जिल्हयाची निर्मिती १ ऑगस्ट, २०१४ रोजी झालेली आहे. ठाणे पालघर समायोजनाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. पालघर जिल्हयातील रिक्त असलेली भरती प्रक्रिया अदयापही राबविण्यात आलेली नाही. भविष्यात म्हणजेच यावर्षी भरती प्रक्रिया राबविताना महिलांचे आरक्षण ३०% राखीव ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

महिला व बाल विकास विभागांतर्गत सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये अंगणवाडी कार्यकर्ती १३, मदतनीस १३ व मुख्यसेविका १३ अशा ३९ महिलांना उत्कृष्ट कामाबदल गौरव करण्यात आला असून मानचिन्ह व २६ महिलांना नॅशनल सेव्हींग सर्टिफिकेट देण्यात आले.

सन २०१५-१६ मध्ये महिला व बालकल्याण विभागांतर्गत एकुण ५२६ शाळेत जाणा-या मुलींना सायकल, ६० अनुसूचित जातीचे महिलांना घरघंटी व ७७ अपंग महिलांना घरघंटी असे एकूण १३७ महिलांना घरघंटी पुरविणे एकूण १७८ महिलांना शिलाई मशीन पुरविणे असे साहित्य महिलांना पुरविण्यात आले आहे.

शाळेत जाणा-या ५२६ मुलींना दुचाकी पुरविल्या असून या सायकल आयएसआय मार्कच्या होत्या. एस. के. बाईक्स या कंपनीच्या / गँग ब्रँडच्या सायकल पुरविण्यात आल्या आहेत. सदर सायकल प्रती नग किंमत रु.३८००/- इतकी होती. ई-निविदा दरम्यान हिरो एस.के.बाईक्स या कंपनीच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या, यामध्ये न्युनतम निविदा भरणा-या कंपनीचे निविदा स्वीकृत करण्यात आल्या.

सदर योजनेचे नाव बदलून महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान करण्यात आले आहे. या योजने अंतर्गत शेळीसाठी आणि भाजीपाला लागवाडीसाठी एकुण १७० बचत गट कार्यरत आहेत. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत कृषी बचत गट तयार केले जात नाही.

| तालुक्याचे नाव | उमेद स्वयंसहायता समूहाची |
|---|---|
| जव्हार | २४२३ |
| तलासरी | १७५९ |
| डहाणू | ९०५ |
| मोखाडा | ७८३ |
| वसई | ४६२ |
| विक्रमगड | ७१९ |
| वाडा | ७६५ |
| **एकूण** | **१२१२०** |

**अभिप्राय व शिफारशी :-**

दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी समितीने पालघर जिल्हा परिषदेला दिलेली भेट व दिनांक ३ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची घेतलेली साक्ष या सर्व माहितीचा अभ्यास केला असता पालघर जिल्हा दिनांक १ ऑगस्ट, २०१४ रोजी स्थापन झाल्यानंतर पालघर जिल्हापरिषदेने सन २०१५-१६ चे अंदाजपत्रक रु.२८,४६,०८,०२२ इतके असून अंदाजपत्रकातील महिला व बालविकास योजनाची तरतूद योजनासाठीची तरतूद १,७६,५७,४८० इतकी असताना महिलांच्या कल्याणकारी योजनावर तसेच महिलांच्या सबलीकरण आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या महिलांना सक्षम करण्यासाठी योजना याबाबत कोणत्या योजनांवर किती खर्च करण्यात आला. याची शहानिशा करताना जिल्हापरिषदेने दिलेल्या माहितीनुसार महिलांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करण्यात आलेली तरतूद ही कागदोपत्री जरी चांगली दिसत असली (रक्कमनिहाय) तरी प्रत्यक्षात या योजनांवर त्याप्रमाणे खर्च केलेला दिसून येत नाही याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करते तसेच आरोग्याच्या दृष्टीनेही जिल्हापरिषदेकडे असलेला सेस फंड आणि जिल्हापरिषदेची अंदाजपत्रकिय तरतूद यांची ही कुठेही भरघोस अशी कामगिरी दिसून येत नाही तसेच महिलांनी चालू केलेले बचत गट यांना प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने कोणतीही ठोस पाउले जिल्हापरिषदेने उचलल्याचे दिसून येत नाही सबब, शासनाने १ ऑगस्ट, २०१४ रोजी स्थापन केला असल्यामुळे त्यांना मुख्यत्वे जिल्हापरिषद यांना व्यवस्थित व योग्य असे मार्गदर्शन करून पालघर जिल्हयासाठी असलेली अंदाजपत्रकीय तरतूद नुसती कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात आरोग्य सेवा शिक्षण वसतिगृहातील मुलींचे समुपदेशन त्यांच्या मासिक पाळीच्या समस्या तसेच त्यांना दर महिन्याला सॅनिटरी नॅपकीन पुरविणे आणि महिलांच्या कल्याणकारी योजना यावर कसा खर्च केला जाईल याची दक्षता घेवून त्यांची अंमलबजावणी तात्काळ होण्याच्या दृष्टीने शासनाने पाउले उचलावित अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ३ महिन्यात समितीला पाठविण्यात यावा.

# परिशिष्ट “ अ ”
# माहिती

# यवतमाळ नगरपरिषद

सन २०१२–२०१३ खर्चाचे विवरण

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | नाव | विवरण | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1000 | 9/4/2012 | राजल मेडिकल | महिला व मुलांचे आरोग्य यिबीर | 151348 |
| 1022 | 9/5/2012 | अजय ट्रेडिंग कंपणी | सभापती कक्ष कारपेट चेअर खरेदी | 21900 |
| | 10/10/2012 | भारतीय स्टेट बॅंक | आयकर | 4681 |
| 1551/1552 | 11/6/2012 | सै.युसूफ सै मुसा | सांस्कृतीक भवन समाज मंदिर बांधकाम | 983275 |
| 1603 | 11/8/2012 | कुळकर्णी ॲन्ड सन्स | सांस्कृतीक भवन विद्युतिकरण | 59968 |
| 1625 | 11/9/2012 | नरेश चव्हाण | महिला व बाल कल्याण सुरक्षा भिंत | 133819 |
| | 12/7/2012 | भारतीय स्टेट बॅंक | आयकर | 55219 |
| 2008 | 12/28/2012 | वैभव असोसीएट | सांस्कृतीक भवन तांत्रीक देखरेख | 25444 |
| | 1/4/2013 | भारतीय स्टेट बॅंक | आयकर | 2827 |
| 2117 To 2123 | 1/4/2013 | साई वैभव /न्यु ताज/अजमेरी स्विट मार्ट | शिबीर स्टेयानरी/पत्रिका छपाई/फोटो/नास्ता | 30298 |
| 2203 | 1/28/2013 | विजय वानखडे | रस्ता तयार करणे | 303244 |
| | 2/1/2013 | भारतीय स्टेट बॅंक | आयकर | 15449 |
| 3066 | 3/29/2013 | कृष्णा कामडे | सुरक्षाठेव | 22672 |
| 3067 | 3/29/2013 | सोनु बिछायत | बिछायत व्यवस्था | 71312 |
| 3068 | 3/29/2013 | हेमंत आर्ट | फ्लॅक्स | 520 |
| 3292 | 3/29/2013 | हेमंत आर्ट | फ्लॅक्स | 2000 |
| 3293 | 3/29/2013 | प्रिया लंबाडे | सभापती बोर्ड | 2998 |
| 3294 | 3/29/2013 | शार्प रेडियम | सभापती कक्ष | 4450 |

# यवतमाळ नगरपरिषद

## सन २०१३–२०१४ खर्चाचे विवरण

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | नाव | विवरण | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 934 | 6/29/2013 | कुळकर्णी ॲन्ड सन्स | सांस्कृतीक भवन विद्युतिकरण | 7658 |
| | 7/19/2013 | भारतीय स्टेट बॅक | आयकर | 390 |
| 1743 | 8/30/2013 | विजय वानखडे | सुरक्षाठेव | 36873 |
| 2374 | 10/18/2013 | सुरेश अग्रवाल | चेनलिंग फेन्सींग | 267487 |
| 2375 | 10/18/2013 | नरेश चव्हाण | चेनलिंग फेन्सींग | 18305 |
| | 11/30/2013 | भारतीय स्टेट बॅक | आयकर | 13292 |
| 5794 | 3/29/2014 | दैनिक लोकमत | निविदा सुचना | 8560 |
| **सन २०१४–२०१५ खर्चाचे विवरण** | | | | |
| 1951 | 10/20/2014 | सै.युसूफ सै मुसा | चेनलिंग फेन्सींग | 452061 |
| | 11/5/2014 | भारतीय स्टेट बॅक | आयकर | 37858 |
| 2360 To 2368 | 12/3/2014 | रेणुका सामाजिक शैक्षणीक संस्था | प्रशिक्षण खर्च | 317520 |
| 2584 To 2586 | 12/12/2014 | एक्सल फायब्रोटेक लिमिटेड | बाल क्रिडागण साहित्य खरेदी | 275544 |
| 2587 To 2589 | 12/12/2014 | मेहुल ट्रेड लिंक | बाल क्रिडागण साहित्य खरेदी | 447180 |
| | 1/8/2015 | भारतीय स्टेट बॅक | आयकर | 34716 |

जिल्हा परिषद पालघर

जि. प. अंतर्गत वर्ग-क व वर्ग-ड मंजूर, भरलेली व रिक्त पदांचा अहवाल

३१ मार्च- २०१८ अखेर

| अ.क्र. | विभाग | संवर्ग | मंजुर एकुण | भरलेली | रिक्त | मंजुर महिला कर्मचारी | कार्यरत महिला कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सा.प्र.वि. | सहाय्यक प्रशासन अधिकारी | १४ | ६ | ८ | ४ | २ |
| २ | | कनिष्ठ प्रशासन अधिकारी | २७ | ९ | १८ | ८ | ५ |
| ३ | | विस्तार अधिकारी (सां.) | २६ | २० | ६ | ८ | २ |
| ४ | | लघुलेखक(उ.श्रे.) | २ | ० | २ | १ | ० |
| ५ | | लघुलेखक(निम्न.श्रे.) | १ | १ | ० | ० | ० |
| ६ | | वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) | ६८ | ४४ | २४ | २० | १९ |
| ७ | | वरिष्ठ सहाय्यक (स्पर्धा) | २२ | ८ | १४ | ६ | ० |
| ८ | | कनिष्ठ सहाय्यक | २४३ | १८५ | ५८ | ७३ | ४९ |
| ९ | | वाहन चालक | ११७ | ५१ | ६६ | ३५ | ० |
| | | एकुण | ५२० | ३२४ | १९६ | | |
| १० | ग्राम पंचायत | विस्तार अधिकारी(ग्रा.प.) | २१ | १९ | २ | १ | १ |
| ११ | | ग्राम विकास अधिकारी | १३४ | ११२ | २२ | १० | १७ |
| १२ | | ग्राम सेवक | ३४३ | २९० | ५३ | १०३ | १०८ |
| | | एकुण | ४९८ | ४२१ | ७७ | | |
| १३ | लेखा विभाग | सहाय्यक लेखा अधिकारी | २३ | १० | १३ | १ | १ |
| १४ | | कनिष्ठ लेखा अधिकारी | १४ | ४ | १० | १ | ० |
| १५ | | वरिष्ठ सहाय्यकय (लेखा) | २६ | ७ | १९ | ७ | ० |
| १६ | | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | २६ | ७ | १९ | ६ | २ |
| | | एकुण | ८९ | २८ | ६१ | | |
| १७ | ए. बा. वि. से. यो. | मुख्य सेविका | ५२ | ३९ | १३ | १०३ | ८८ |
| १८ | | मुख्य सेविका (निवडीने) | ५१ | ४७ | ४ | ० | ० |
| | | एकुण | १०३ | ८६ | १७ | | |

| अ.क्र. | विभाग | संवर्ग | मंजुर एकुण | भरलेली | रिक्त | मंजुर महिला कर्मचारी | कार्यरत महिला कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | पशुसंवर्धन | पशुधन पर्यवेक्षक | ६८ | ५६ | १२ | १८ | १२ |
| २० | | सहा. पशुधन विकास अधिकारी | १२ | ४ | ८ | ० | ० |
| | | एकुण | ८० | ६० | २० | | |
| २१ | पाणी पुरवठा | कनिष्ठ अभियंता स्थापत्य | २० | १० | १० | ४ | ३ |
| २२ | | कनिष्ठ अभियंता यांत्रिकी | २ | ० | २ | ० | ० |
| २३ | | आरेखक | १ | ० | १ | ० | ० |
| २४ | | सहाय्यक आवेदक | १ | ० | १ | ० | ० |
| २५ | | यांत्रिकी | १ | ० | १ | ० | ० |
| २६ | | रिंगमन | १ | ० | १ | ० | ० |
| | | एकुण | २६ | १० | १६ | | |
| २७ | कृषि विभाग | विस्तार अधिकारी (कृषि) | १९ | १२ | ७ | ३ | ३ |
| २८ | | कृषि अधिकारी | १६ | ८ | ८ | १ | १ |
| | | एकुण | ३५ | २० | १५ | | |
| २९ | बांधकाम विभाग | शाखा अभियंता | ६८ | ५५ | १३ | १५ | ० |
| ३० | | स्थापत्य अभियांत्रिकी सहा | ७० | ४२ | २८ | २१ | ४ |
| ३१ | | प्रमुख आरेखक | १ | ० | १ | ० | ० |
| ३२ | | आरेखक | १ | ० | १ | ० | ० |
| ३३ | बांधकाम विभाग | कनिष्ठ आरेखक | ७ | ३ | ४ | ० | ० |
| ३४ | | वरिष्ठ यांत्रिकी | १ | ० | १ | ० | ० |
| ३५ | | कनिष्ठ यांत्रिकी | १ | ० | १ | ० | ० |
| ३६ | | तारतंत्री | १ | ० | १ | ० | ० |
| ३७ | | जोडारी | १ | ० | १ | ० | ० |
| | | एकुण | १५१ | १०० | ५१ | | |
| ३८ | आरोग्य विभाग | आरोग्य सेविका | ३७२ | ३३० | ४२ | ३७२ | ३३० |
| ३९ | | आरोग्य सहाय्यिका | ६५ | ४६ | १९ | ६५ | ४६ |
| ४० | | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ३६ | ३४ | २ | ११ | ७ |
| ४१ | | कृष्ठ रोग तंत्रज्ञ | ६ | ६ | ० | २ | ० |
| ४२ | | आरोग्य सहाय्यक पुरुष | ७७ | ७० | ७ | ० | ० |

| अ.क्र. | विभाग | संवर्ग | मंजुर एकुण | भरलेली | रिक्त | मंजुर महिला कर्मचारी | कार्यरत महिला कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४३ | | आरोग्य सेवक पुरुष | १५७ | ११० | ४७ | ० | ० |
| ४४ | | औषध निर्माण अधिकारी | ६९ | ४७ | २२ | २१ | १४ |
| ४५ | | आरोग्य पर्यवेक्षक | ११ | ७ | ४ | ३ | ० |
| ४६ | | विस्तार अ धिकारी(आरोग्य) | २ | २ | ० | १ | ० |
| | | एकुण | ७९५ | ६५२ | १४३ | | |
| ४७ | शिक्षण विभाग | विस्तार अधिकारी(शि)श्रेणी-२ | ४४ | २१ | २३ | १० | |
| ४८ | | विस्तार अधिकारी(शि)श्रेणी-३ | २१ | ६ | १५ | ० | |
| ४९ | | केंद्र प्रमुख | १५० | ११६ | ३४ | ० | ७८ पदे पदोन्नतीची जादा आहेत. |
| ५० | | मुख्याध्यापक | ३९३ | २१५ | १७८ | ० | |
| ५१ | शिक्षण विभाग | पदवीधर शिक्षक/सहशिक्षक | ६७१० | ५७८८ | ९२२ | २०११ | |
| | | एकुण | ७३१८ | ६१४६ | ११७२ | | |
| | लघुपाटबंधारे | कनिष्ठ अभियंता | १९ | १० | ९ | ० | |
| | | कनिष्ठ आरेखक | १ | ० | १ | ० | |
| | | आरेखक | १ | ० | १ | ० | |
| | | | ० | ० | | | |
| | | एकुण वर्ग-क | ९६१५ | ७८४७ | १७६८ | | |
| | | | | | | | |
| १ | ड वर्ग कर्मचारी | शिपाई | ४७२ | ३७१ | १०१ | १४२ | ८५ |
| २ | | हवालदार | ५२ | ९ | ४३ | १६ | २ |
| ३ | | चौकीदार | १ | ० | १ | ० | ० |
| ४ | | सफाई कामगार | ६७ | २३ | ४४ | २० | ७ |
| ५ | | व्रणोपचारक | ३२ | १२ | २० | १० | ० |
| | एकुण वर्ग-ड | | ६२४ | ४१५ | २०९ | १८७ | |
| | एकुण क-व- ड | | १०२३९ | ८२६२ | ११७७ | ३०७२ | |

जिल्हा परिषद पालघर

| मुद्दा क्रमांक | प्रश्न | उत्तर | |
|---|---|---|---|
| २१ | उक्त योजनांवर मागील ३ वर्षांत वर्षनिहाय व योजनानिहाय एकूण खर्च किती ? | मागील ३ वर्षात (सन २०१३-१४,२०१४-१५,२०१५-१६) वर्षनिहाय व योजनानिहाय खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे | |
| | | योजनेचे नांव | आलेला खर्च |
| | | **सन २०१३-१४** | |
| | | जिल्हा परिषद पालघरची स्थापना 01 ऑगस्ट २०१४ रोजी झाली असून सन २०१३-१४ मधील योजनांवरील खर्च ठाणे जिल्हा परिषद मधून झालेला आहे. | |
| | | **सन २०१४-१५** | |
| | | जिल्हा परिषद पालघरची स्थापना 01 ऑगस्ट २०१४ रोजी झाली असून सन २०१४-१५ मधील योजनांवरील एकत्रित खर्च ठाणे जिल्हा परिषद मधून झालेला आहे. | |
| | | **सन २०१५-१६** | |
| | | सन २०१५-१६ मधील जिल्हा परिषद निधी मधून राबविण्यात येणा-या योजना | |
| | | महिला लोकप्रतिनिधी प्रशिक्षण अभ्यास दौरा आयोजित करणे | ० |
| | | महिलांसाठी विशेष योजना महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे | ६२४००० |
| | | शाळेत जाणा-या मुलींना दोन चाकी सायकल पुरविणे | ११९८८०० |
| | | मुलींना व महिलांना व्यवसायिक तांत्रिक व पोलिस प्रशिक्षण | १२००००० |
| | | किशोरवयीन मुलींना लैंगिक शिक्षण, जेंडर प्रशिक्षण व जीवन कौशल्याचे प्रशिक्षण देणे | ५००००० |
| | | अंगणवाडी केंद्रांना साहित्य पुरविणे - बस्करपट्टा | १६७४९२२ |
| | | मुलींना स्वरक्षणासाठी व त्यांच्या शारीरिक विकासासाठी प्रशिक्षण योजना | ५००००० |
| | | महिलांना साहित्य पुरविणे | १४३३७९० |
| | | महिलांना कायदेशीर विधिविषयक सल्ला देणे | ५५००० |
| | | आदर्श अंगणवाडी सेविकांना पुरस्कार देणे | १२७००० |
| | | ७ वी ते १२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणे | १५००००० |
| | | पंचायत महिला शक्ती अभियानांतर्गत पंचायत राज संस्थामधील महिला लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण व महिला मेळावे व मार्गदर्शन केंद्र | १५६००० |
| | | ३% अपंग महिला व बालकांसाठी योजना घरघंटी योजना | १२६१२६० |
| | | एकुण खर्च:- | १०७३०७७२.०० |

| मुद्दा क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| २९ | जिल्हा परिषदेने आपल्या स्वतःच्या उत्पनातुन महिलांच्या विकासासाठी स्वतंत्र योजना राबविल्या आहेत काय ? असल्यास अशा योजनांची माहिती देण्यात यावी. गेल्या तीन वर्षात वर्षनिहाय किती रक्कमेची तरतुद करण्यात आली होती व प्रत्यक्षात किती रककम खर्च करण्यात आली .उक्त तरतुदीनुसार वैयक्तीक व सामुहिक विकासाच्या योजना राबविण्यात आल्या आहेत काय. योजना व योजनानिहाय यांचे लाभार्थी किती ? | होय , जिल्हा परिषदेने आपल्या स्वतःच्या उत्पन्नातुन महिलांच्या विकासासाठी स्वतंत्र योजना राबविल्या आहेत . सदरील |

| योजनेचे नांव | प्राप्त तरतुद | झालेला खर्च | योजनेचे | लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| सन 2013-14 | | | | |
| जिल्हा परिषद पालघरची स्थापना 01 ऑगस्ट २०१४ रोजी झाली असून सन 2013-14 मधील योजनांवरील खर्च ठाणे जिल्हा परिषद मधुन झालेला आहे. | | | | |
| | | | | |
| सन 2014-15 | | | | |
| जिल्हा परिषद पालघरची स्थापना 01 ऑगस्ट २०१४ रोजी झाली असून सन 2014-15 मधील योजनांवरील एकत्रित खर्च ठाणे जिल्हा परिषद मधुन झालेला आहे. | | | | |
| | | | | |
| सन 2015-16 | | | | |
| महिला लोकप्रतिनिधी प्रशिक्षण अभ्यास दौरा आयोजित करणे | ५००००० | ० | सामुहिक | |
| महिलांसाठी विशेष योजना महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे | ३२४००० | ३२४००० | सामुहिक | ३ |
| शाळेत जाणा-या मुलींना दोन चाकी सायकल पुरविणे | २०००००० | १९९८८०० | वैयक्तिक | ५२६ |
| मुलींना व महिलांना व्यवसायिक तांत्रिक व पोलिस प्रशिक्षण | १२००००० | १२००००० | वैयक्तिक | |
| किशोरवयीन मुलींना लैंगिक शिक्षण, जेंडर प्रशिक्षण व जीवन कौशल्याचे प्रशिक्षण देणे | ५००००० | ५००००० | सामुहिक | १२५० |
| मुलींना स्वरक्षणासाठी व त्यांच्या शारीरिक विकासासाठी प्रशिक्षण | ५००००० | ५००००० | वैयक्तिक | ८३३ |
| महिलांना साहित्य पुरविणे | १५९४००० | १४३३७९० | वैयक्तिक | १७८ |
| महिलांना कायदेशीर विधिविषयक सल्ला देणे | ५५००० | ५५००० | वैयक्तिक | २२ |
| आदर्श अंगणवाडी सेविकांना पुरस्कार देणे | १२८४८० | १२७००० | सामुहिक | ५२ |
| ७ वी ते १२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणे | १५००००० | १५००००० | वैयक्तिक | ४४६ |
| पंचायत महिला शक्ती अभियानाअंतर्गत पंचायत राज संस्थामधील महिला लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण व महिला मेळावे व मार्गदर्शन केंद्र | १५६००० | १५६००० | सामुहिक | |
| ३% अपंग महिला व बालकासाठी योजना घरघंटी योजना | २०००००० | १२६१२६० | वैयक्तिक | ८५ |
| एकुण :- | १०४५७४८० | ९०५५८५० | | ३३९५ |

## जिल्हा परिषद पालघर

| मुद्दा क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ८ | जिल्हा परिषदेकडे प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची प्रत्येकी किती पदे मंजूर आहेत? त्यापैकी महिला शिक्षकांची संख्या किती आहे? शिक्षकांची पदे भरतांना महिलांसाठी 30 टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत काय? नसल्यास त्याची कारणे काय आहेत? बदली देत असतांना महिलांच्या आरक्षित कोटा ठेवण्यात येतो काय? तशा प्रकारचा सेवाशर्ती आणि नियमावलीमध्ये बदल करण्यात आला आहे काय? | जिल्हा परिषदेकडे प्राथमिक शिक्षकांची सद्यस्थितीला माहे मार्च २०१७ अखेर एकूण ७१०३ पदे मंजूर असुन ६४३८ शिक्षक कार्यरत आहेत त्यापैकी महिला शिक्षिका २८६० आहेत. त्याचा तालुकानिहाय गोषवारा खालील प्रमाणे |

| तालुका | मंजुर पदे | कार्यरत पदे | त्यापैकी महिला | शिक्षकांची पदे भरताना महिलांसाठी ३० टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत काय ? | नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? | बदली देत असताना महिलांचा आरक्षित कोटा ठेवण्यात येतो काय ? | तशा प्रकारचा सेवाशर्ती आणि नियमावलीमध्ये बदल करण्यात आला आहे काय ? |
|---|---|---|---|---|---|---|---|
| विक्रमगड | ७०४ | ६५९ | १९४ | होय | तशी बाब नाही | नाही | बाब लागू होत नाही |
| वाडा | ८३९ | ७८५ | २६८ | | | | |
| वसई | ९४८ | ८४५ | ६५८ | | | | |
| तलासरी | ७८८ | ५७३ | २५० | | | | |
| मोखाडा | ४६८ | ४०८ | ५० | | | | |
| जव्हार | ६५४ | ६२० | १०९ | | | | |
| डहाणू | १६५७ | १४६६ | ७०१ | | | | |
| पालघर | ११४५ | १०८२ | ७७० | | | | |
| एकूण | ७१०३ | ६४३८ | २८६० | | | | |

# परिशिष्ट “ ब ”
# शासन निर्णय

जिल्हा परिषदांमध्ये स्थापन करण्यात
आलेल्या महिला व बालकल्याण समितीने
राबवावयाच्या योजना.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्रमांक : झेडपीए २००६/१२०७/प्र.क्र.०८/पंरा-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ जून, २००६.

वाचा :- १) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक :- झेडपीई-१०९२/ प्र.क्र.३१८/०५, दिनांक ३.१२.१९९३.
२) शासन पत्र क्रमांक झेडपीई-१०९३/सीआर-४३१/०५, दिनांक २.९.१९९३.
३) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक :-झेडपीई-१०९४/ सीआर-१६६/०५, दिनांक १२.८.१९९४.
४) शासन पत्र ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक:- झेडपीई-१०९३/ सीआर-४३१/०५, दिनांक १२.१०.१९९३.
५) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक:- झेडपीई-१०/२००१/ प्र.क्र.२०६/०५, दिनांक ६.११.२००१.

<u>शासन निर्णय :-</u>

महिला व बाल विकासाशी संबंधित विविध कार्यक्रम राबविण्यासाठी सर्व जिल्हा परिषदांमध्ये महिला व बालकल्याण समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर समितीने राबवावयाचे कार्यक्रम संदर्भाधीन अ.क्र.५ येथील शासन निर्णयान्वये सर्व जिल्हा परिषदांना सूचना दिलेल्या आहेत. तथापि, बदलत्या परिस्थितीनुसार बऱ्याच योजना / कार्यक्रम कालबाहय झाल्यामुळे त्यामध्ये बदल /सुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच बहुतेक जिल्हा परिषदांमधील लोकप्रतिनिधींना अशा योजनांबाबत फारशी माहिती नसल्यामुळे अथवा योजनेसाठी अत्यल्प तरतूद असल्याने महिलांच्या योजनांची योग्य रीतीने अंमलबजावणी होत नाही. या सर्व बाबी लक्षात घेऊन महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी जिल्हा परिषद क्षेत्रात महिला व बालकल्याण समित्यांनी खालील योजना राबविण्याबाबत शासन आदेश देत आहे.

<u>१) मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण :-</u> शासकीय किंवा अशासकीय संस्थांमार्फत काही तांत्रिक / व्यावसायिक प्रशिक्षण वर्ग चालविले जातात. अशा संस्थांमधून खालील प्रकारच्या प्रशिक्षणासाठी योजना राबवाव्यात. उदा.व्यक्तिमत्व विकास, इंग्रजी संभाषण, पब्लिक स्पिकिंग, आत्मविश्वास निर्माण, बालवाडी शिक्षिका, गवंडी, सुतारकाम, प्लंबर प्रशिक्षण, घरगुती विद्युत उपकरणांची दुरुस्ती ( टी.व्ही., रेडिओ, मिक्सर, इस्त्री, टोस्टर, इ. मोबाईल दुरुस्ती, संगणक दुरुस्ती, म्युझिक सिस्टीम दुरुस्ती) वाहन दुरुस्ती, सौंदर्यप्रसाधनांचे प्रशिक्षण, केटरींग, बेकींग, विशिष्ट पध्दतीच्या स्वयंपाकाचे प्रशिक्षण, घरगुती कामकाजाचे प्रशिक्षण (full time domestic help), शासकीय व अशासकीय नोकरीसाठी प्रशिक्षण उदा. महिला हवालदार, ड्रायव्हर व कंडक्टर, विमा एजंट, रिसेप्शनिस्ट, लघुलेखन/ टंकलेखन, सेल्स गर्ल, परिचारिका (नर्स) प्रशिक्षण, वृध्दांची देखभाल, लहान मुलांची देखभाल, फिजिओथेरपी प्रशिक्षण, पॅकेजिंग, फुडप्रोसेसिंग, दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन, कचऱ्यापासून खतनिर्मिती, गांडूळखत, कचऱ्याचे विभाजन व व्यवस्थापन, शोभिवंत फुलझाडांची लागवड व विक्री, औषधी वनस्पतींचे उत्पन्न, इ. १४ वर्षे वय किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या मुलींना व शाळेतून गळती झालेल्या मुलींना अशा व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी सदर योजना प्रस्तावित करण्यात येत आहे. या योजनेखाली मान्यताप्राप्त संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या मुलींना प्रति लाभार्थी रु.५०००/- पर्यंत प्रशिक्षणाचे शुल्क (Fees) भरण्याची तरतूद राहील. प्रशिक्षण शुल्काच्या रकमेच्या दहा टक्के रक्कम लाभार्थ्यांने स्वतः भरावी. प्रशिक्षण कालावधी जास्तीत जास्त एक वर्षाचा असावा. शुल्क भरण्याचे नियम व प्रक्रिया संबंधित जिल्हा परिषदांनी ठरवावी.

<u>२) मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरिक विकासासाठी प्रशिक्षण योजना :-</u> या योजनेमध्ये मुलींना कुंग्फू-कराटे, योगाचे प्रशिक्षण देण्यात यावे. कोणत्याही वयोगटातील परंतु आर्थिकदृष्टया मागासलेल्या कुटुंबातील मुलींना सदर प्रशिक्षण मोफत देण्यात यावे. सदर प्रशिक्षण किमान तीन महिन्यांचे असावे. ते शाळा व महाविद्यालये यांच्या समन्वयाने आयोजित करण्यात यावे. या योजनेतून प्रशिक्षकाच्या मानधनावर साधारणपणे प्रति लाभार्थी रु.३००/- प्रतिमहापर्यंत खर्च करण्यात यावा.

<u>३) शाळेत जाणाऱ्या मुलींना सायकल वाटप</u> :- ज्या गावात शाळा नाही त्या गावातील मुलींना इतर गावातील माध्यमिक शाळेला जावे लागते. तसेच ज्या गावातून सदर माध्यमिक शाळेला जाण्यासाठी एसटी/बस सेवा उपलब्ध नाही, फक्त अशाच गावातील लाभार्थ्यांना सायकल वाटप करण्यात यावे. एसटी/बस सुविधेसंबंधी दाखला एसटी/बस डेपो व्यवस्थापकाकडून घेण्यात यावा. १०% लाभार्थींचा स्वहिस्सा असावा.

<u>४) महिला प्रतिनिधींची अभ्यास सहल</u> :- जिल्हा परिषद/पंचायत समिती व ग्रामपंचायत यामध्ये निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींना यशदा व इतर संस्थांमार्फत प्रशिक्षण देण्यात येते. म्हणून प्रशिक्षणासाठी स्वतंत्र योजनेची आवश्यकता नाही. मात्र चांगल्या योजनांची अंमलबजावणी पाहण्यासाठी अभ्यास सहल आयोजित करण्यास हरकत नाही. या योजनांवर प्रतिलाभार्थी दरवर्षी रु.२०००/- खर्च मर्यादा सुचविण्यात आली होती. याशिवाय एका वर्षात या योजनेवर एकूण खर्च रु.२०,०००/- पेक्षा अधिक करण्यात येऊ नये अशी अट जोडण्यात यावी.

<u>५) आर्थिकदृष्ट्या गरीब स्त्रियांच्या मुलांसाठी पाळणाघर</u> :- आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील नोकरी करणाऱ्या किंवा शेतावर कामासाठी जाणाऱ्या स्त्रियांच्या लहान मुलांसाठी या योजनेखाली पाळणाघर उपलब्ध करुन देता येईल. सदर पाळणाघर चालविण्यासाठी जिल्हा परिषदेने योग्य अश्या स्वयंसेवी संस्थेची निवड करावी. यासाठी लाभार्थ्यांची निवड व किती अनुदान द्यावे याबाबत जिल्हा परिषदेने (पंचायत समित्या व ग्रामपंचायत यांनी ) निर्णय घ्यावा. पाळणाघर चालविण्यासाठी अटी :- १) योजनेचा खर्च, आयांच्या मानधनावर व मुलांच्या आहारावर करण्यात यावा. २) एका आयाने किमान पाच मुलांचा सांभाळ करणे आवश्यक आहे. त्यासाठी तिला किमान रु.६००/- प्रति महिना मानधन देण्यात यावे. ३) प्रतिदिवस प्रतिमूल रु.२ ते ५/- पर्यंत आहार/दुधावर खर्च करावे. उर्वरित आहार/दुधावर खर्च करावे. उर्वरित आहार पालकांनी द्यावा. ४) पाळणाघर दररोज किमान ८ (आठ) तास सुरु असावे. ५) पाळणाघराच्याबरोबर संडास/बाथरुम तसेच पाण्याची सोय असावी. ६) पाळणाघरासाठी जागा ग्रामपंचायतीनी द्यावी. तसेच स्टोव्ह, गादी, भांडी इ.साहित्य महिला संस्थांनी उपलब्ध करुन द्यावे.

<u>६) महिलांना कायदेशीर/विधिविषयक सल्ला देणे</u> :- बहुतेक मुलींना व महिलांना त्यांच्या कायदेशीर अधिकारांबद्दल माहिती नसते. तसेच महिलांसबंधी विविध कायद्यांची कल्पना नसते. विशेषत: हुंडाविषयक कायदे, स्त्रीधन, मालमत्ता अधिकार, वारसा हक्क, लग्न, घटस्फोट, पोटगीविषयक कायदे, बलात्कारविषयक कायद्यातील तरतूदी, लग्नानंतरचे अधिकार. त्यामुळे सदर विषयावर महाविद्यालय व इतर ठिकाणी मुली व महिलांसाठी लेक्चर ठेवण्यात यावे व यासाठी या विषयाबाबत कुशल वकीलाची नेमणूक करण्यात यावी. तसेच चांगल्या वकीलाची निवड करण्यासाठी जिल्हास्तरीय निवड समिती असावी व यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा सरकारी वकील, सिनीयर जे.एफ.एम.सी. (ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट) इ.अधिकारी असावेत, जेणेकरुन फक्त चांगल्या वकीलांची निवड होईल.

**<u>७) किशोरवयीन मुलींना व मुलांना लैंगिक शिक्षण, जेंडर (gender) प्रशिक्षण व जीवनकौशल्याचे प्रशिक्षण देणे</u>** :- किशोरवयीन मुलांना व मुलींना शाळेत सर्वसाधारण शिक्षण देण्यात येते. परंतु लैंगिक व विशिष्ट किशोरवयीन समस्यांबद्दल शिक्षण देण्यात येत नाही. असे निदर्शनास आले आहे की, त्यामुळे त्यांना काही मानसिक व सामाजिक, मनोवैज्ञानिक अडचणींना तोंड द्यावे लागते. याबाबत अनुभवी व संवेदनशील तज्ज्ञ/स्वयंसेवी संस्थांमार्फत सदर प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे. त्याचे स्वरुप स्थानिक आवश्यकतेनुसार ठरविण्यात यावे. उदा. शाळेत / महाविद्यालयात शिकणा-या मुलींसाठी किंवा गळती झालेल्या मुलींसाठी दर आठवडयाला एक वर्ग (तसेच मुलांसाठी स्वतंत्र वर्ग) भरविण्यात यावेत. प्रत्येक वर्ग १ ते २ तासांचा असावा. बाहेरील तज्ज्ञांना व डॉक्टरांना, मनोवैज्ञानिकांना सदर सत्र घेण्यासाठी निमंत्रित करण्यात यावे. त्यांना प्रत्येक सत्रासाठी साधारणपणे रु.२०० ते ४०० मानधन देण्यात यावे.

**या प्रशिक्षणात मुलींसाठी साधारणत: खालील बाबींचा समावेश असावा :-**

अ) स्त्रियांच्या मासिक पाळीचे शास्त्र व उद्देश

ब) मासिक पाळीच्या काळात आरोग्यविषयक घ्यावयाच्या काळजीची आवश्यकता.

क) स्त्रियांच्या मासिक पाळीसंदर्भातील गैरसमज. उदा.मासिक पाळीच्या काळात स्त्रिया अशुध्द असतात आणि त्यांना इतरांपासून व स्वयंपाकघरापासून वेगळे ठेवणे.

ड) गर्भधारणेचे शास्त्र, सर्वसाधारणपणे कुटुंबनियोजनाची साधने.

इ) बालविवाहामुळे आरोग्यास होणारे दुष्परिणाम.

फ) लैंगिक छळ, त्यापासून स्वसंरक्षण कसे करावे, कोणाची मदत घ्यावी. अशा परिस्थितीत हेल्पलाईनचा उपयोग करणे.

भ) एडस् नियंत्रण.

यासंदर्भात आरोग्य संचालनालय, केईएम रुग्णालय तसेच मुंबई महानगरपालिकेने चांगले मार्गदर्शक पुस्तक प्रसिध्द केले आहे. त्याच प्रकारच्या पुस्तिका तयार करुन वापरणे, मुलांसाठी स्वतंत्र विषयक निश्चित करावे. उदा. शरीरशास्त्र, विकास, एडस्, मुली/स्त्रियांबरोबर कसे वागावे, लैंगिक रोगांबद्दल गैरसमज व अंधश्रध्दा इ.

८. <u>महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे :-</u> कुटुंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर तऱ्हेने त्रासलेल्या तसेच मानसिकदृष्ट्या असंतुलित महिलांच्या सामाजिक, मानसशास्त्रीय, कायदेशीर समुपदेशनासाठी सदर योजना राबवावी. यासाठी समुपदेशक व सल्लागार यांच्या मानधनावर खर्च करण्यात यावा. समुपदेशक व सल्लागाराची निवड अनु.क्र.६ मधील योजनेत अंतर्भूत केलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समितीमार्फत करण्यात येईल. सदर योजना महाविद्यालय / तज्ज्ञांच्या संस्थांमार्फत राबवावी. उदा. ज्या संस्थांकडे यापूर्वीच अशा प्रकारच्या समुपदेशनासाठी आवश्यक मनुष्यबळ, जागा, अनुभव व सोईसुविधा उपलब्ध असतील. सध्या देण्यात आलेल्या सुविधा व समुपदेशन यांचा विस्तार करण्याची आवश्यकता असल्यास असे प्रस्तावही मंजूर करण्यात यावेत. मात्र यासाठी संस्थेकडे स्वतःची जागा असणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी स्वतः कार्यालयीन फर्निचर व इतर अनावर्ती खर्चाची व्यवस्था करावी. समुपदेशकाचे व सल्लागाराचे मानधन जास्तीत जास्त साधारणपणे दरमहा रु.८०००/- पर्यंत असावे. तथापि स्थानिक दराप्रमाणे मानधन ठरवावे. याशिवाय कार्यालयीन / प्रशासकीय आवर्ती मासिक खर्चासाठी जिल्हा परिषदा यांनी स्वतः मर्यादा निश्चित करावी व त्याप्रमाणे अनुदान देण्यात यावे. तसेच वस्तू साहित्य खरेदीवर एकुण योजनेवरील खर्चाच्या ३०% पेक्षा जास्त खर्च करण्यात येऊ नये.

<u>९. सामुहिक विवाह :-</u> हुंडापध्दतीला आळा घालण्यासाठी कमीतकमी खर्चात कोणत्याही इच्छुक मुलामुलींसाठी सामुहिक विवाह आयोजित करण्यात यावेत व यात प्रति दांपत्य रु.५०००/- पर्यंत खर्च करण्यात यावा. विशेषतः गरीब कुटुंब, कर्जात बुडालेला शेतकरी, भुमिहीन शेतमजूर अशा प्रकारच्या कुटुंबांना या योजनेचा लाभ द्यावा.

<u>१०. तालुकास्तरावर शिकणाऱ्या मुलींसाठी होस्टेल चालविणे :-</u> ग्रामीण भागात माध्यमिक शाळा नसल्यामुळे ८ वी ते १२ वी वर्गापर्यंत शिकणाऱ्या मुलींना शिक्षण घेण्यासाठी स्वतःच्या गावांपासून लांब अंतरावर जाऊन रहावे लागते. तालुक्याच्या ठिकाणी जेथे माध्यमिक शाळा असतात, तेथे अशा मुलींना वसतीगृह उपलब्ध करुन दिल्यास मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढेल. यामुळे १८ वर्षापूर्वी लग्न न करण्यासाठी त्यांच्या कुटुंबियांना प्रवृत्त करता येईल. या योजनेखाली वसतीगृह इमारतींचे बांधकाम न करता, भाडयावर इमारत/घर/फ्लॅट घेण्यात यावेत. सदर वसतीगृह स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात यावीत. फक्त भाडे व प्रशासकीय खर्चासाठी अर्थसहाय्य देण्यात यावे. जेवणाचा खर्च लाभार्थ्यांनी सोसावा. कमीतकमी १० मुलींसाठी एक वसतीगृह असावे. प्रशासकीय खर्चाची मर्यादा जिल्हा परिषदांनी निश्चित करावी, पण ती रु.५००/- प्रति लाभार्थी प्रति माह (भाडे वगळून) यापेक्षा जास्त नसावी.

<u>**११. कुपोषित मुलांसाठी अतिरिक्त आहार :-**</u> ग्रामीण / आदिवासी भागातील मुलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले आहे. ते प्रमाण कमी करण्यासाठी कुपोषित मुलांना अंगणवाडयांमार्फत दुप्पट आहार दिला जातो. तथापि कुपोषण कमी करण्यासाठी तो पुरेसा नसल्याने कुपोषित मुलांना अंगणवाडीत पुरविण्यात येणाऱ्या आहाराव्यतिरिक्त विशेष आहार म्हणून स्थानिक उपलब्धतेनुसार दूध, अंडी, फळे, गूळ, शेंगदाणे, इ. वस्तूंचा पुरवठा करण्यात यावा.

<u>**१२. अंगणवाडयांना साहित्य पुरविणे :-**</u> एकात्मिक बाल विकास योजनेखाली अंगणवाडयांना लागणाऱ्या साहित्याची खरेदी, जी नियमित योजनेखाली खरेदी करणे शक्य होणार नाही, अशा वस्तूंवर महिला व बाल कल्याण समितीने खर्च करावा. तथापि, ज्या अंगणवाडया समिती स्वतःच्या निधीमधून चालविल, त्यावरील खर्च समितीने स्वतःच्या निधीमधून करावा.

अंगणवाडी साहित्य खरेदी करण्याची प्रक्रिया विहित पध्दतीने दरवर्षी एप्रिल महिन्यापासूनच सुरु करावी. यामुळे अंगणवाडयांना वेळेवर आवश्यक साहित्यपुरवठा होऊ शकेल.

<u>१३. अंगणवाडीतील बालकांसाठी जंतनाशन कार्यक्रम :-</u> अंगणवाडीतील बालकांना जंताचा प्रादुर्भाव आल्याचे दिसून येत आहे. परिणामी बालकांचे वजन न वाढणे व कुपोषणाचे प्रमाण वाढत जाणे. अंगणवाडयांना शासनामार्फत जंतनाशक गोळयांचा पुरवठा करण्यात येतो. तथापि नियमितपणे दर सहा महिन्यांनी बालकांचे जंतनाशन (डिवर्मिंग) करणे आवश्यक असल्याने ज्या भागात अंगणवाडयांना जंतनाशक गोळयांची कमतरता भासेल, अशा ठिकाणी जंतनाशक गोळयांचा पुरवठा करण्यात यावा. जंतनाशनाची औषधे दर सहा महिन्यांनी म्हणजेच १४ नोव्हेंबर (बालदिन) व १ मे (महाराष्ट्र दिन) या दिवशी अंगणवाडी सेविका व आरोग्य कर्मचारी यांच्यामार्फत देण्यात यावीत.

<u>१४. कुपोषण कमी करण्यासाठी परसबाग तयार करणे :-</u> ग्रामीण / आदिवासी भागात फळे, पालेभाज्या, फळभाज्या, वेलवर्गीय भाज्या यांचा आहारात दररोज वापर होत नसल्यामुळे कुपोषणाचे प्रमाण वाढत जाते. त्यामुळे कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी कुपोषणाचे प्रमाण जास्त असेल त्या भागात बालकांना / गर्भवती स्त्रिया / स्तनदा माता यांना आहारात दररोज भाज्या उपलब्ध होण्यासाठी परसबाग तयार करण्यात यावी. या योजनेमध्ये परसबाग तयार करण्यासाठी बीज देण्यात यावे. तसेच अंगणवाडी सेविका / आरोग्य कर्मचारी यांच्यामार्फत बीजाची वाढ, संगोपन याबाबत कुटुंबकर्त्यास ज्ञान देण्यात यावे. परसबाग लावण्यासाठी सांडपाण्याचा उपयोग करण्यात यावा.

<u>१५. अर्भकांसाठी हायपोथर्मिया प्रतिबंध किट देणे :-</u> ग्रामीण/आदिवासी भागात अर्भकास (एक वर्षापर्यंतच्या) बाळास जन्मानंतर काही दिवस कडे घातले जात नाही अथवा जमिनीवर झोपविले जाते. त्यामुळे बाळाचे तपमान कमी होते. नंतरच्या काळात बाळाने लघवी/संडास केल्यानंतर ओले होणारे कपडे न बदलल्याने शरीराचे तपमान कमी होऊन मुले आजारी पडतात/कुपोषित होतात. या बाबी टाळण्यासाठी बाळाच्या वापरासाठी हायपोथर्मिया प्रतिबंधक किट उपलब्ध करुन देण्यात यावी. या किटमध्ये मच्छरदाणी, मिनी वुलन ब्लँकेट (3"x4"),

सुती कपडे (नॅपकिन) (4''x3'') चे चार संच इ. वस्तूंचा समावेश असावा. त्या किटमधील वस्तूंचा वापर करण्याबाबत गर्भवती स्त्रिया/ संगोपनकर्त्यास प्रशिक्षण देण्यात यावे.

१६. गरोदर स्त्रिया / स्तनदा माता यांना आयोडीनयुक्त मीठ पुरविणे :- ग्रामीण / आदिवासी भागात दैनंदिन आहारात आयोडीनयुक्त मीठाचा वापर होत नसल्याने गलगंड सारखे गंभीर आजार उद्भवतात. अशा रोगांवर प्रतिबंध करण्यासाठी गरोदर स्त्रिया, स्तनदा माता यांना आयोडीनयुक्त मीठाचा पुरवठा करण्यात यावा.

१७. बारावी पास मुलींना MS-CIT प्रशिक्षण देणे :-सध्या शासकीय/निमशासकीय नोकरीसाठी MS-CIT उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.संगणकाबाबतचे ज्ञान तसेच संगणक चालविण्याचे कौशल्य प्राप्त करण्यासाठी १२ वी पास मुलींना MS-CIT अभ्यासक्रमासाठी प्रशिक्षण देण्याची योजना यामुळे उपयुक्त राहील. त्याप्रमाणे एखाद्या मान्यताप्राप्त संस्थेला फी देऊन त्याबाबतचे प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे.

उपरोक्त योजनांखालील प्रशिक्षक, समुपदेशक, स्वयंसेवी संस्था इ.ची निवड करताना अनुक्रमांक '६' येथील योजनेप्रमाणे निवड समिती गठित करण्यात यावी. तसेच वस्तू **व साहित्य खरेदीवर योजनेच्या एकूण खर्चाच्या ३०% पेक्षा जास्त खर्च करु नये.** जेणेकरुन जास्त भर प्रशिक्षणाच्या योजनांवर राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक सांकेतांक **20060629153623001** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सुनील चव्हाण

(सुनील चव्हाण)

विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,

सर्व विभागीय आयुक्त,

(कृ.मा.प.)

सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
संचालक, महिला व बालविकास, पुणे,
संचालक, एकात्मिक बालविकास सेवा योजना, कोकण भवन, नवी मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मुख्यमंत्र्यांचे सचिवालय,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
ग्राम विकास व जलसंधारण विभागाची सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन क्र.पंरा-१, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत,

१) सचिव, महिलांचे हक्क व कल्याण समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
२) सचिव, पंचायत राज समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांजकडे माहितीसाठी रवाना.

जिल्हा परिषदांमध्ये स्थापन करण्यात
आलेल्या महिला व बालकल्याण समितीने
राबवावयाच्या योजना.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
**शासन निर्णय क्रमांक : झेडपीए २०१०/अनौसंक्र ३३/प्र.क्र.१६८/पंरा-१**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक : १० मार्च, २०११.**

**वाचा :- शासन निर्णय क्रमांक : झेडपीए १००७/४५४/प्र.क्र.५१/पंरा-१**
**दिनांक : १९ डिसेंबर, २००७.**

**<u>शासन निर्णय :-</u>**

महिला व बाल विकासाशी संबंधित विविध कार्यक्रम राबविण्यासाठी सर्व जिल्हा परिषदांमध्ये महिला व बालकल्याण समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर समितीने राबवावयाचे कार्यक्रम संदर्भाधीन शासन निर्णयानुसार राबविण्यात येतात. तथापि, बदलत्या परिस्थितीनुसार बऱ्याच योजना / कार्यक्रम कालबाहय झाल्यामुळे त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. ही बाब लक्षात घेऊन महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी जिल्हा परिषद क्षेत्रात महिला व बाल कल्याण समित्यांनी खालील योजना सक्षमपणे राबविण्यासाठी पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

*गट"अ" - प्रशिक्षण व सक्षमीकरणाच्या योजना*

१) **मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे.**

शासकीय किंवा अशासकीय संस्थांमार्फत काही तांत्रिक / व्यावसायिक प्रशिक्षण वर्ग चालविले जातात. अशा संस्थांमधून खालील प्रकारच्या प्रशिक्षणासाठी योजना राबवाव्यात. उदा.व्यक्तिमत्व विकास, इंग्रजी संभाषण, गवंडी, सुतारकाम, प्लंबर प्रशिक्षण, घरगुती विद्युत उपकरणांची दुरुस्ती ( टी.व्ही., रेडिओ, म्युझिक सिस्टीम दुरुस्ती, मिक्सर, इस्त्री, टोस्टर, मोबाईल व संगणक दुरुस्ती,) वाहन दुरुस्ती, सौंदर्यप्रसाधनांचे प्रशिक्षण, केटरींग, बेकींग, विशिष्ट पध्दतीच्या स्वयंपाकाचे प्रशिक्षण, घरगुती कामकाजाचे प्रशिक्षण (Full time domestic help), शासकीय व ड्रायव्हर व कंडक्टर, रिसेप्शनिस्ट, लघुलेखन/ टंकलेखन, सेल्स गर्ल, विमा एजंट, परिचारिका (नर्स) प्रशिक्षण, वृध्दांची देखभाल, लहान मुलांची देखभाल, फिजिओथेरपी प्रशिक्षण, फुडप्रोसेसिंग, पॅकेजिंग, दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन, घनकचरा व्यवस्थापन व बायोगॅस (कचऱ्यापासून खतनिर्मिती गांडूळखत, कचऱ्याचे विभाजन व व्यवस्थापन), रोपवाटीका तसेच शोभिवंत फुलझाडांची व औषधी वनस्पतींची लागवड व विक्री, या योजनेखाली मान्यताप्राप्त संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना प्रति लाभार्थी रु.५०००/- पर्यंत प्रशिक्षणाचे शुल्क (Fees) भरण्याची तरतूद

राहील. प्रशिक्षण शुल्काच्या रकमेच्या दहा टक्के रक्कम लाभार्थ्याने स्वत: भरावी. प्रशिक्षण कालावधी जास्तीत जास्त एक वर्षाचा असावा. शुल्क भरण्याचे नियम व प्रक्रिया संबंधित जिल्हा परिषदांनी ठरवावी.

२) **मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरिक विकासासाठी प्रशिक्षण योजना :-**

या योजनेमध्ये मुलींना कराटे, योगाचे प्रशिक्षण देण्यात यावे. कोणत्याही वयोगटातील परंतु आर्थिकदृष्टया मागासलेल्या कुटुंबातील मुलींना सदर प्रशिक्षण मोफत देण्यात यावे. सदर प्रशिक्षण किमान तीन महिन्यांचे असावे. ते शाळा व महाविद्यालये यांच्या समन्वयाने आयोजित करण्यात यावे. या योजनेतून प्रशिक्षकाच्या मानधनावर साधारणपणे प्रति लाभार्थी रु.३००/- प्रतिमहापर्यंत खर्च करण्यात यावा.

३) **महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे :-**

कुटुंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर तऱ्हेने त्रासलेल्या तसेच मानसिकदृष्टया असंतुलित महिलांच्या सामाजिक, मानसशास्त्रीय, कायदेशीर समुपदेशनासाठी सदर योजना राबवावी. यासाठी समुपदेशक व सल्लागार यांच्या मानधनावर खर्च करण्यात यावा. समुपदेशक व सल्लागाराची निवड मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा सरकारी वकील, सिनिअर जे.एफ.एम.सी. (ज्युडीसियल मॅजेस्ट्रेट) इ. अधिकाऱ्यांच्या समितीमार्फत करण्यात येईल. सदर योजना महाविद्यालय / तज्ज्ञांच्या संस्थांमार्फत राबवावी. उदा. ज्या संस्थांकडे यापूर्वीच अशा प्रकारच्या समुपदेशनासाठी आवश्यक मनुष्यबळ, जागा, अनुभव व सोईसुविधा उपलब्ध असतील. सध्या देण्यात आलेल्या सुविधा व समुपदेशन यांचा विस्तार करण्याची आवश्यकता असल्यास असे प्रस्तावही मंजूर करण्यात यावेत. मात्र यासाठी संस्थेकडे स्वत:ची जागा असणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी स्वत: कार्यालयीन फर्निचर व इतर अनावर्ती खर्चाची व्यवस्था करावी. तालुका आणि जिल्हा पातळीवर काम करणाऱ्या समुपदेशकाला रु. ९०००/- इतके मानधन देण्यात यावे. काही जिल्हा परिषदांमध्ये व पंचायत समित्यांमध्ये यापूर्वीच समुपदेशन केन्द्र चालविण्यात येत आहेत. मात्र तेथे समुपदेशकाला अत्यल्प मानधन मिळत असल्यामुळे सदर केन्द्रे व्यवस्थितपणे चालत नाहीत. तर अशा समुपदेशन केन्द्रांचे बळकटीकरण करण्यात यावे व तेथे समुपदेशकाला वरीलप्रमाणे वाढीव मानधन देण्यात यावे.

४) **तालुकास्तरावर शिकणा-या मुलींसाठी होस्टेल चालविणे :-**

ग्रामीण भागात माध्यमिक शाळा नसल्यामुळे ८ वी ते १२ वी वर्गापर्यंत शिकणा-या मुलींना शिक्षण घेण्यासाठी स्वत:च्या गावांपासून लांब अंतरावर जाऊन रहावे लागते. तालुक्याच्या ठिकाणी जेथे माध्यमिक शाळा किंवा ज्युनिअर कॉलेज असतात, तेथे अशा मुलींना वसतीगृह उपलब्ध करुन दिल्यास मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढेल. यामुळे १८ वर्षांपूर्वी लग्न न करण्यासाठी त्यांच्या कुटुंबियांना प्रवृत्त करता येईल. या योजनेखाली वसतीगृह इमारतींचे बांधकाम न करता, भाडयावर इमारत/घर/फ्लॅट घेण्यात यावेत. सदर वसतीगृह स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात यावीत. फक्त भाडे व प्रशासकीय खर्चासाठी अर्थसहाय्य देण्यात यावे. जेवणाचा खर्च लाभार्थ्यांनी सोसावा. त्याशिवाय लाभार्थींकडून कोणतीही फी घेऊ नये. कमीतकमी १० मुलींसाठी एक वसतीगृह असावे. प्रशासकीय खर्चाची मर्यादा जिल्हा परिषदांनी निश्चित करावी, पण ती रु.५००/- प्रति लाभार्थी प्रति माह (भाडे वगळून) यापेक्षा जास्त नसावी.

५) **दहावी व बारावी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणे :-**

सध्या शासकीय/निमशासकीय नोकरीसाठी MS-CIT उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.संगणकाबाबतचे ज्ञान तसेच संगणक चालविण्याचे कौशल्य प्राप्त करण्यासाठी १० वी व १२ वी पास मुलींना MS-CIT व समकक्ष अभ्यासक्रम उदा. डाटा एंट्री ऑपरेटर प्रशिक्षण देण्याची योजना यामुळे

उपयुक्त राहील. त्याप्रमाणे एखाद्या मान्यताप्राप्त संस्थेला फी देऊन त्याबाबतचे प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे.

६) <u>आर्थिकदृष्ट्या गरीब स्त्रियांच्या मुलामुलींसाठी पाळणाघर :-</u>

नोकरी करणाऱ्या किंवा शेतावर कामासाठी जाणाऱ्या स्त्रियांच्या लहान मुलांसाठी पाळणाघर (Day Care Centre) उपलब्ध करुन देण्यात यावे. पाळणाघर संध्याकाळी ६.०० वाजपर्यंत किंवा स्थानिक गरजेनुसार सुरु ठेवावे. सदर पाळणाघर चालविण्यासाठी जिल्हा परिषदेने योग्य महिला बचत गटाची किंवा स्वयंसेवी संस्थेची निवड करावी. लाभार्थ्यांची निवड माता समिती किंवा ग्रामपंचायतीने करावी. या योजनेखाली पाळणाघर चालविणा-या महिलांचे मासिक मानधन व इमारतीचे भाडे अशा बाबींवर खर्च करण्यात यावा.

७) <u>किशोरवयीन मुलींना व महिलांना जेंडर बाबत तसेच आरोग्य व कुटूंब नियोजनाबाबत प्रशिक्षण देणे :-</u>

किशोरवयीन मुलींना शाळेत सर्वसाधारण शिक्षण देण्यात येते. परंतु विशिष्ट किशोरवयीन समस्यांबद्दल शिक्षण देण्यात येत नाही. असे निदर्शनास आले आहे की, त्यामुळे त्यांना काही मानसिक व सामाजिक, मनोवैज्ञानिक अडचणींना तोंड द्यावे लागते. याबाबत अनुभवी व संवेदनशील तज्ज्ञ/स्वयंसेवी संस्थांमार्फत सदर प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे. त्याचे स्वरुप स्थानिक आवश्यकतेनुसार ठरविण्यात यावे. उदा. शाळेत / महाविद्यालयात शिकणा-या मुलींसाठी किंवा गळती झालेल्या मुलींसाठी दर आठवडयाला एक वर्ग (तसेच मुलांसाठी स्वतंत्र वर्ग) भरविण्यात यावेत. प्रत्येक वर्ग १ ते २ तासांचा असावा. बाहेरील तज्ज्ञांना व डॉक्टरांना, मनोवैज्ञानिकांना सदर सत्र घेण्यासाठी निमंत्रित करण्यात यावे. त्यांना प्रत्येक सत्रासाठी साधारणपणे रु.२०० ते ४०० मानधन देण्यात यावे. लहान बालकांना विशेषतः मुलींना लैंगिक हिंसाचारापासून वाचविण्यासाठी समितीने विशेष प्रयत्न करावेत.

८) <u>महिलांना कायदेशीर / विधिविषयक सल्ला देणे :-</u>

बहुतेक मुलींना व महिलांना त्यांच्या कायदेशीर अधिकारांबद्दल माहिती नसते. विशेषतः हुंडाविषयक कायदे, स्त्रीधन, मालमत्ता अधिकार, वारसा हक्क, लग्न, घटस्फोट, पोटगीविषयक कायदे, बलात्कारविषयक कायद्यातील तरतूदी, लग्नानंतरचे अधिकार. त्यामुळे सदर विषयावर महाविद्यालय व इतर ठिकाणी मुली व महिलांसाठी लेक्चर ठेवण्यात यावे. महाराष्ट्र राज्य महिला आयोग तसेच UNFPA (United Nation Population Fund) मार्फत सदर प्रशिक्षण वर्ग आयोजित करता येतील, व प्रती प्रशिक्षण वर्ग प्रशिक्षकाला रु. ५००/- पर्यंत मानधन द्यावे. यासाठी तालुका स्तरावरील मोफत कायदेविषयक सल्लागार समिती किंवा विधी सेवा समिती यांचेही मार्गदर्शन घ्यावे.

महिलांना कायदेविषयक मार्गदर्शन करण्यासाठी शिबिरांचे आयोजन करावे. एका शिबिरासाठी रु. २०००/- पर्यंत खर्च करण्यात यावा.

<u>९) अंगणवाडयांसाठी स्वतंत्र इमारत/ भाडे :-</u>

ज्या ठिकाणी अंगणवाडीसाठी स्वतंत्र शासकीय इमारत नाही तेथे खाजगी इमारतीत अंगणवाड्या चालविण्यासाठी आवश्यकतेनुसार भाडयाची तरतुद करण्यात यावी. तसेच अंगणवाड्यामध्ये शौचालये बाधण्यासाठी निधीची तरतुद करण्यात,यावी.

नवीन अंगणवाडीचे बांधकाम करावयाचे असल्यास त्याची मर्यादा रु. ४ लक्ष ठेवावी.

१०) **महिला प्रतिनिधींची अभ्यास सहल :-**

समितीस स्वतःच्या निधीमधून ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेमध्ये निवडून आलेल्या महिला लोकप्रतिनिधींचे जिल्हा व जिल्ह्याबाहेर पंचायत राज, आदर्श गाव, निर्मल ग्राम, महिला बळकटीकरण, महिला व बाल विकासाचे उपक्रम इत्यादी विषयांची माहिती घेण्यासाठी अभ्यास सहलीचे आयोजन करावे. प्रतिवर्षी अशा प्रकारे किती अभ्यास सहली आयोजित कराव्यात याबाबत जिल्हा परिषदेने निर्णय घ्यावयाचा आहे. यासाठी प्रतिवर्ष एकूण रु. ५.०० लक्षाची कमाल मर्यादा विहित करण्यात येत आहे.

११) **पंचायत राज संस्थामधील महिला लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण**

पंचायत राज संस्थामधील तिन्ही स्तरातील महिला लोकप्रतिनिधींना कामकाजाचे प्रशिक्षण देण्यासाठी पंचायत महिला शक्ती अभियान २००७ सालापासून राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत प्रशिक्षणासाठी तरतुद केलेल्या निधी व्यतिरिक्त जादा लागणारा निधी आवश्यकतेनुसार समितीकडून खर्च करण्यात यावा.

१२) **आदर्श अंगणवाडी / बालवाडी सेविकांना पुरस्कार :-**

अंगणवाडी व बालवाडीमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या सेविकांना समितीस स्वतःच्या निधीमधून पुरस्कार देता येईल व उत्कृष्ट काम करणाऱ्या सेविकांची निवड तसेच पुरस्काराची रक्कम किती असावी, याबद्दल जिल्हा परिषदेने निर्णय घ्यावयाचा आहे. योजनेवर जास्तीत जास्त रु. २ लक्ष खर्च करण्यात यावा.

*गट "ब" च्या योजना (वस्तू खरेदीच्या योजना)*

१३) **कुपोषित मुलामुलींसाठी तसेच गरोदर महिला व स्तनदा मातांसाठी अतिरिक्त आहार :-**

राज्याच्या ग्रामीण / आदिवासी भागातील मुलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले आहे. ते प्रमाण कमी करण्यासाठी कुपोषित मुलांना अंगणवाड्यांमार्फत दुप्पट आहार दिला जातो. तथापि कुपोषण कमी करण्यासाठी तो पुरेसा नसल्याने कुपोषित मुलांना अंगणवाडीत पुरविण्यात येणाऱ्या आहाराव्यतिरिक्त विशेष आहार म्हणून अंगणवाडीतील मुले व किशोरवयीन मुलांना Micronutrient Supplementation Syrup यांचा पुरवठा करण्यात यावा. तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार दूध, सोयादूध (टेट्रापॅक), चिक्की, लाडू, अंडी, फळे (केळी), गूळ, शेंगदाणे, या वस्तूंचा पुरवठा करण्यात यावा. गरोदर व स्तनदा मातांना अतिरिक्त पौष्टीक व प्रथिनेयुक्त आहार द्यावा, जेणेकरुन त्यांच्यात रक्ताक्षयाचे प्रमाण कमी होईल, व जन्माचे वेळेला नवजात मुलाचे वजन किमान २.५ किलो राहील.

१४) **अंगणवाडी / बालवाडींना साहित्य पुरविणे :-**

एकात्मिक बाल विकास योजनेखाली अंगणवाडींना साहित्य मिळाले नसल्यास त्या साहित्याची बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी गरज असल्यास साहित्याची खरेदी सदर समितीने करावी. तथापि, ज्या अंगणवाड्या / बालवाड्या समिती स्वतःच्या निधीमधून चालविल, त्यावरील खर्च समितीने स्वतःच्या निधीमधून करावा. सदर साहित्यामध्ये वजनकाटे व जलशुध्दीकरण यंत्र याचा समावेश करावा. तसेच वेगवेगळया प्रकारची खेळणी व शैक्षणिक तक्ते हे एकात्मिक बालविकास सेवेकडून पुरविण्यात येत असतात, म्हणून ते पुरवू नये.

१५) **महिलांना साहित्य पुरविणे :-**

ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील महिलांना स्वयंरोजगारासाठी तसेच इंधनाची बचत करण्यासाठी खालील साहित्यांचा पुरवठा करण्यात यावा. मसाला पल्वलायझर मशिन, पत्रावळी मशिन , शेवया मशिन, पिठाची गिरणी हे साहित्य पुरवावे. इंधनाची बचत होणेचे दृष्टीने तसेच महिलांना धुराचा त्रास होवू नये म्हणून सुधारित चुली /निर्धुर चुलीचा वापर ही काळाची गरज आहे म्हणून सुधारित चुली /निर्धुर चुली पुरविण्यासाठी तरतूद करण्यात यावी. ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटूंबाना सौर कंदील आणि सोलर कुकर पुरविण्यासाठी तरतूद करण्यात यावी. वरील सर्व वस्तू वाटप करताना प्रति महिला जास्तीतजास्त रु. १०.०००/- खर्च करण्यात यावा तसेच प्रत्येक लाभार्थीचा १०% सहभाग घेण्यात यावा.

गट ''ब'' च्या वरील योजनांवर, म्हणजे वस्तु व साहित्य खरेदीवर एकूण खर्चाच्या ३० टक्के पेक्षा जास्त खर्च करु नये. म्हणजे गट ''अ'' च्या योजनांवर जास्त भर द्यावा, व त्यावर किमान ७०% खर्च करण्यात यावा. एकूण खर्चाच्या ३ टक्के रक्कम अपंग महिला आणि बालकांसाठी खर्च करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०११०३१५२०१४३९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व) ( मु. का.अ. यांचे मार्फत )
२) मा. विधान परिषद/ मा. विधान सभा सदस्य (सर्व)
१) प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
२) विभागीय आयुक्त (सर्व).
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
६) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च रोड, पुणे - ४११ ००१..
७) संचालक, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, कोकण भवन, नवी मुंबई.
९) मुख्यमंत्र्यांचे सचिवालय.
१०) मा. मंत्री (ग्रा. वि.) यांचे खाजगी सचिव.
११) मा. राज्यमंत्री (ग्रा. वि.) यांचे स्वीय सहाय्यक.
१२) निवड नस्ती, कार्यासन क्र.पंरा-१, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत,**

१) सचिव, महिलांचे हक्क व कल्याण समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
२) सचिव, पंचायत राज समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांजकडे माहितीसाठी रवाना.

## स्वयंसहाय्यता गटामार्फत महिलांचा आर्थिक विकास व सक्षमीकरण

महाराष्ट्र शासन,

नगर विकास विभाग,

शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १०/२००१/६६/ प्र.क्र.२२/ नवि - २७

मंत्रालय -४०० ०३२. दिनांक २२ नोव्हेंबर २००१

शासन परिपत्रक

शासनाने महिला धोरण,२००१ जारी केले असून यामध्ये महिलांचा सहभाग, त्यांना संरक्षण, त्यांची आर्थिक उन्नती, त्यांच्या क्षमतेचे संवर्धन आणि या सर्वांसाठी अनुकूल वातावरण निर्मिती तसेच सन २००२-०३ या आर्थिक वर्षापासून महिलांना केंद्रीभूत मानून नियोजन केले जाईल या बाबींचा महिला धोरणात समावेश आहे. त्याच बरोबर विविध क्षेत्रात महिलांच्या स्वयंसहाय्यता गटांची स्थापना, तसेच त्यांची कार्यक्षमता, कौशल्य वाढविण्याच्या कार्यक्रमास प्राधान्य दिले जाईल, ही बाब समाविष्ट आहे.

०२. शासनाच्या महिला धोरणाच्या अनुषंगाने नगरपरिषदा/ महानगरपालिका यांना कळविण्यात येते की, नगरपरिषदांनी / महानगरपालिकांनी शहरी सुवर्ण जयंती रोजगार योजनेंतर्गत महिलांच्या स्वयंसहाय्यता गटांची स्थापना वाढविण्याच्या कार्यक्रमास प्राधान्य देण्यात यावे, यामध्ये आदिवासी महिला, मागासवर्गीय, आपद्ग्रस्त आणि शहरी महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यावर विशेष भर देण्यात यावा. यासाठी महिला व त्यांच्या गटांसाठी नगरपरिषदा व महानगरपालिकांमार्फत निर्माण करण्यात येत असलेल्या व्यापारी संकुलातील वितरीत होणाऱ्या गाळ्यांपैकी ३०% गाळे महिलांच्या स्वयंसहाय्यीत गटासाठी राखून ठेवण्यात यावे व त्याचे वाटप संबंधित गटात होईल याची दक्षता घेण्यात यावी. असे गाळे वाटप करताना गाळे बांधण्यासाठी आलेल्या खर्चाची रक्कम मोबदला स्वरूपात ना नफा ना तोटा या तत्वात घेवून गाळे हस्तांतर करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

रामानंद तिवारी

प्रधान सचिव

महानगरपालिका व नगरपालिका/ नगरपरिषदा/
नगरपंचायती यामध्ये महिला व बालकल्याण
समितीने राबवावयाच्या योजना

**महाराष्ट्र शासन**

नगर विकास विभाग.

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००५/प्र.क्र.२५५/०५/नवि-२०

मंत्रालय, मुंबई ४०००३२.

दिनांक ८ नोव्हेंबर , २०१०

**वाचा :** १) नगर विकास विभाग, शासन पत्र क्र. जीईएन- १०९३/३२५/प्र.क्र.२४/नवि-३२, दि. १७ एप्रिल, १९९३.

२) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. जीइंएन-१०९३/११९८/नवि-१४, दिनांक १४ जुलै, १९९३.

३) नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००५/प्र.क्र.१५६/०५/नवि-२०, दिनांक ३० डिसेंबर, २००६

**प्रस्तावना :-**

शासनाने महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ मधील कलम ६२, ६३, व ६५ मध्ये सन १९९२ मध्ये दुरुस्ती करण्यात आली. या दुरुस्तीमुळे प्रत्येक "अ" व "ब" वर्ग नगरपरिषदेने महिला व बालकल्याण समितीची स्थापना करावी, असे बंधन घालण्यात आले. तसेच "क" वर्ग नगरपरिषदांना या समितीची स्थापना करता येईल, अशी तरतूद कलम ६५ मध्ये करण्यात आली. या समितीने करावयाची कामे क्रमांक जीईएन /३२५/प्र.क्र.२४/३२,दिनांक १७ एप्रिल, १९९३ अन्वये परिपत्रकात प्रस्तुत करण्यात आली आहेत. सदर परिपत्रकीय पत्रातील कामाची यादी सूचक असून परिपूर्ण आहे असे म्हणता येणार नाही. त्यामध्ये कालमानानुसार बदललेली परिस्थिती, स्थानिक गरजा लक्षात घेवून यादीमध्ये बदल करणे, वाढ करणे, वगळणे आवश्यक ठरणार आहे आणि महिला व बालके यांच्या कल्याणासाठी योजना राबविणे हे मुख्य ध्येय व धोरण लक्षात घेऊन यादीत आवश्यक फेरबदल करण्यास नगरपालिका सक्षम असतील असे दिनांक १४ जुलै १९९३ च्या शासन निर्णयान्वये स्पष्ट करण्यात आले आहे. महिला व बालकल्याण कार्यक्रमामध्ये बदलत्या परिस्थितीनुसार बऱ्याच योजना/कार्यक्रमांमध्ये बदल/सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार संकीर्ण २००५/प्र.क्र.१५६/ ०५/नवि-२०, दिनांक ३० डिसेंबर, २००६ या शासन निर्णयामध्ये आवश्यक त्या योजना /कार्यक्रमांमध्ये बदल / सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषद/ नगरपंचायती यामध्ये महिलांच्या विविध योजना राबविण्याकरिता महिला व बालकल्याण समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने

राबवावयाचे कार्यक्रम संदर्भाधीन पत्र व शासन निर्णयान्वये सर्व महानगरपालिका/ नगरपरिषद / नगरपंचायती यांना कळविण्यात आले होते. तथापि, बदलत्या परिस्थितीनुसार ब-याच योजना/ कार्यक्रम कालबाहय झाल्यामुळे त्यामध्ये बदल / सुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच बहुतेक महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायती मध्ये अशा योजनांसाठी अत्यल्प तरतुद असल्याने महिलांच्या योजनांची योग्य रितीने अंमलबजावणी होत नाही. या सर्व बाबी लक्षात घेऊन महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी महानगरपालिका/ नगरपरिषद / नगरपंचायती क्षेत्रात महिला व बालकल्याण समित्यांनी महिला व बालकल्याण यासाठी राखीव ५% तरतूदीतून खालील योजना राबविण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.

शासन निर्णय:- महिला व बालकल्याण यासाठी राखीव असलेल्या ५% तरतुदीतून खालील बाबींवर खर्च करण्यात यावा:

१. ज्या ठिकाणी अंगणवाडी इमारती भाडयाने आहेत किंवा अयोग्य सार्वजनिक इमारतीमध्ये भरत आहे. त्यासाठी अंगणवाडी केंद्राची इमारत बांधून यामध्ये ICDS योजनेसाठी रु.१/- दरमहा नाममात्र भाडयावर उपलब्ध करुन देणे.
२. अंगणवाडी केंद्रातील मुलांकरिता आवश्यक शैक्षणिक/शैक्षणिक साहित्य खरेदी करणे.
३. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था निर्माण करणे व शौचालय बांधकाम करणे.
४. मुलांकरीता पोषक आहार पुरविणे.
५. ०-३ वर्षाच्या मुलांकरीता Creche किंवा Day care centre बांधणे व क्रियान्वित करणे तसेच पाळणाघर चालविणा-या अशासकीय संस्थांना अर्थसहाय्य करणे.
६. गरोदर महिलांसाठी तसेच शालेय विदयार्थी व अंगणवाडर विदयार्थी यांची वैदयकीय तपासणी व औषधोपचार करणे.
७. मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना राबविणे.
८. महिलांसाठी प्रसुतीगृह बांधणे अथवा श्रेणीवाढ करणे अथवा विस्तारीकरण करणे.
९. मुलींना/महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे.
१०. काम करणा-या महिलांसाठी वसतिगृह बांधणे.
११. शिकणा-या मुलींसाठी वसतिगृह बांधणे.
१२. पोलीओग्रस्त किंवा अपंग मुलांना Prosthetic aids पुरविणे.
१३. महिलांसाठी समुपदेशक केंद्र चालविणे, helpline चालविणे, विधी सल्ला केंद्र चालविणे इ.
१४. BPL खालील मुलींची शाळा गळतीचे प्रमाणे थांबविण्याबाबत प्रोत्साहनपर दैनिक उपस्थितीत भत्ता देणे.
१५. मुलींच्या सार्वजनिक शाळेत विविध क्रीडा सुविधा निर्माण करणे.

शासनाने मान्य केलेल्या वरील योजना तसेच इतर उपयुक्त योजना तयार करुन राबविण्याचे पूर्ण अधिकार महानगरपालिकाच्या आयुक्तांना रहातील. तथापि नगरपरिषद/ नगरपंचायती यांचे मुख्याधिकाऱ्यांना वरील शासनमान्य योजनांपैकी फक्त रु. १० लाख प्रति योजना या आर्थिक मर्यादेपर्यंत योजनेस मान्यता देणे व योजना राबविण्याचे अधिकार रहातील. रु. १०

लाखाच्या वर एखादया योजनेची आर्थिक मर्यादा येत असल्यास त्यासाठी आयुक्त, महिला व बालविकास , पुणे यांची मान्यता घेण्यात यावी. मान्य योजनेपैकी कोणतीही रु.१० लाखाच्या आतील योजना राबविण्याचे अधिकार मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायत्ती यांना रहातील. मात्र वरील मान्य केलेल्या योजनांव्यतिरिक्त एखादी नवीन योजना घ्यावयाची असेल किंवा विद्यमान योजनेच्या नियम व अटीमध्ये बदल करावयाचे असल्यास त्यांनी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांची तांत्रिक मान्यता घ्यावी. योजनेच्या अंमलबजावणी व नियत्रणासाठी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे हे नियंत्रण अधिकारी असतील व जिल्हास्तरावर जिल्हा व महिला बालविकास अधिकारी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील.

आयुवत; महानगरपालिका, मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपंचायती यांनी प्रत्येक वर्षांच्या सुरवातीपासूनच योजना राबविण्याचा कार्यक्रम तयार करण्याची दक्षता घ्यावी व या योजनांवर करण्यांत येणा-या खर्चाची माहिती महिला व बाल विकास विभागास सादर करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(र.शि.घाटगे )
कार्यासन अधिकारी ,महाराष्ट्र शासन

प्रति,
सचिव,महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
आयुक्त तथा संचालक,नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी,मुंबई - २५
विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,नगरपालिका प्रशासन (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायती (सर्व)
विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव,नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
निवडनस्ती, नंव-२०

--------

शासकीय,निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा आरक्षित ठेवणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**

महिला व बाल विकास विभाग

शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५ /का-२

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक- २५.५.२००१

निर्णय :- शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानीत संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा दि.१ एप्रिल,१९९४ पासून राखीव ठेवण्यात आल्या आहेत. सदर ३०% आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत परिशीष्ठ-१ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयाद्वारे वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर सर्व शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येत असून महिलांच्या ३०% आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत खालीलप्रमाणे एकत्रित आदेश देण्यात येत आहेत. हा शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी महिलांच्या ३०% आरक्षणासंदर्भात करण्यात आलेली कार्यवाही ही परिशिष्ट-२ मध्ये नमुद केलेल्या शासन निर्णयानुसार करण्यात आली आहे असे समजण्यात यावे.

## (एक) आरक्षणाची व्याप्ती, अटी व शर्ती

(१) शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानीत संस्था यांच्या सेवेत नियुक्तीसाठी महिलांकरीता ३०% जागा आरक्षित ठेवण्यात येत आहेत.

(२) महिलांच्या सदर आरक्षणाची अंमलबजावणी करताना अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग यांचेसाठी जी पदे उपलब्ध होतील त्या पदांपैकी त्या त्या प्रवर्गातील महिलांसाठी ३०% जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

(३) महिलांचे आरक्षण हे समांतर आरक्षण राहिल व ते कार्यान्वित करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि.१६.३.९९ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी.( प्रत सोबत जोडली आहे) सदर मार्गदर्शक सूचनांमध्ये सामान्य प्रशासन विभागाकडून काही बदल केल्यास सदर बदल आपोआप लागू होतील.

(४) महिलांसाठी विहित करण्यात आलेले सदर ३०% आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीसाठी अनुज्ञेय राहील.

(५) महिला आरक्षण हे समांतर आरक्षण/विशेष आरक्षण असल्यामुळे ते आडवे आरक्षण आहे. समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्यामुळे पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीत महिला आरक्षणानुसार येणाऱ्या राखीव पदांची संख्या, सामाजिक आरक्षण/उभे आरक्षण यांच्या (जसे अ.जा., अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), (क) (ड), वि.मा.प्र., इमाव, आणि खुला प्रवर्ग ) प्रत्येक वर्गामध्ये निर्देशित करावी.

(६) महिलांसाठीचे सदर आरक्षण हे मागासवर्गीयांचे आरक्षण ज्या ज्या ठिकाणी लागू आहे त्या सर्व ठिकाणी लागू राहील.

(७) भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यात यावे.

(८) महिलांच्या आरक्षणाचा अनुशेष पुढे ओढण्यात येवू नये.

(९) खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमीलेयर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३०% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच, मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलांचे ३० % आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

(१०) खुल्या प्रवर्गातील ज्या व्यक्तीचे /कुटुंबाचे सर्व मार्गांनी येणारे एकूण आर्थिक उत्पन्न सलगच्या मागील तीन वर्षांमध्ये प्रत्येक वर्षी रु.दोन लाख किंवा त्यापेक्षा अधिक असेल ती व्यक्ती/कुटुंब उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट म्हणून समजण्यात येईल. या संदर्भातील कुटुंबाच्या व्याख्येमध्ये विवाहीत महिलेच्या बाबतीत पती,पत्नी व मुले यांचा समावेश राहील. आणि अविवाहीत मुलीच्या संदर्भात आई, वडील व अविवाहीत भावंडे यांचा समावेश राहील.

(११) इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) यांचेकरीता उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गट (क्रिमीलेयर) बाबत सामाजिक न्याय विभागाने वेळोवेळी निश्चित केलेले निकष व अटी लागू राहतील.

(१२) सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागामार्फत इतर मागासवर्गासाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट (क्रिमीलेयर) याबाबतची उत्पन्न मर्यादा वाढविल्यास सदर वाढीव उत्पन्न मर्यादा खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आपोआप लागू राहील.

(१३) मागासवर्गीयांचे आरक्षित प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग यांना सेवा भरतीसाठी जे सेवाभरती नियम, अटी व शर्ती लागू आहेत तेच सेवाभरती नियम, अटी व शर्ती त्या त्या प्रवर्गातील महिलांसाठीच्या आरक्षणाबाबतही लागू राहतील.

(१४) महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण महिला व बाल विकास विभागामार्फत करण्यात यावे.

(१५) महिलांच्या आरक्षित पदांच्या लाभाकरिता उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवासी असावा.

## तीन ) प्रमाणपत्रे

### (अ) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र व त्याची तपासणी

(१) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यासाठी तहसिलदार व नायब तहसिलदार यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. याबाबतचा अर्जाचा नमुना व प्रमाणपत्राचा नमुना परिशीष्ट २ व ३ म्हणून सोबत जोडला आहे.

(२) वरील प्रमाणपत्राच्या आधारे ज्या महिलांना आरक्षणाचा लाभ देण्यात येईल त्यांची प्रमाणपत्रे तपासण्यास आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोग अथवा इतर सक्षम प्राधिकाऱ्यांकडून महिलांच्या आरक्षित पदावर नेमणूकीकरिता ज्या महिलांची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे व त्यांनी आरक्षित पदांकरिता केलेला अर्ज संबंधित विभागांनी /कार्यालयांनी आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडे तपासणीसाठी पाठवावा.

(४) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांनी सदर प्रमाणपत्र या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनानुसार आहे किंवा नाही हे तपासावे. तसेच, सदर प्रमाणपत्राच्या पुष्ठयर्थ संबंधित उमेदवाराने या शासन निर्णयातील परिशीष्ट-२ मधील अर्जान्वये प्रमाणपत्र मिळण्याकरिता जी माहिती सादर केली असेल ती माहिती मूळ कागदपत्रांवरुन तसेच आवश्यकता वाटल्यास गृहभेटी देवून तपासून घ्यावी. व सर्व माहिती योग्य असल्याचे आढळून आल्यास प्रमाणपत्र प्रमाणित करुन संबंधित कार्यालयांना परत पाठवावे.

(५) जर एखाद्या प्रमाणपत्राबाबत आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना शंका असल्यास त्यांनी त्याबाबतचा सविस्तर तपशील आपल्या अहवालात नमूद करावा.

(६) ज्या उमेदवारांची प्रमाणपत्रे आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी तपासून प्रमाणित केली असतील त्या उमेदवारांची महिलांच्या आरक्षित पदावर नेमणूक करण्यास हरकत नाही.

(७) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी प्रमाणपत्र तपासणीचा अहवाल एक महिन्यात संबंधित कार्यालयांना पाठवावा.

(८) आयुक्तांचा अहवाल एक महिन्यात प्राप्त झाला नाही तर संबंधित कार्यालयांनी प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिनतेने संबंधित उमेदवारास तात्पुरती नेमणूक द्यावी.

(९) ज्या उमेदवारांच्या प्रमाणपत्रांबाबत शंका उपस्थित झाली असेल अशा उमेदवारांच्याबाबतीत आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी त्यांच्या शंकेचे आवश्यक ते संबंधित जिल्हा दंडाधिकारी यांना अ.शा. पत्रांद्वारे कळवावे व त्यांचा अहवाल ठराविक कालमर्यादेत मागवावा.

(१०) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी उपस्थित केलेल्या शंका संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्यांना मान्य असल्यास त्यांनी संबंधित प्रमाणपत्र रद्द करावे.

### (ब) मागासवर्गीय उमेदवारांची प्रमाणपत्रे व त्यांची तपासणी

(१) अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग यामधील महिलांनी त्यांच्या प्रवर्गातील महिला आरक्षणाच्या लाभाकरिता त्या त्या प्रवर्गात मोडत असल्याचे प्रमाणपत्र आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग अथवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार सादर करणे आवश्यक राहील व सदर प्रमाणपत्रे तपासण्याबाबत आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग यांनी जी कार्यपध्दती विहीत केली आहे तीच कार्यपध्दती अंमलात राहील.

### (क) मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील महिलांच्या आरक्षित पदावर नियुक्ती झाल्यास त्याबाबतची प्रमाणपत्रे व त्यांची तपासणी

(१) मागासवर्गीयांच्या प्रवर्गातील ज्या महिला उमेदवार खुल्या प्रवर्गातील जागांकरीता विकल्प देतील किंवा विकल्प न देताही मागासवर्गीयांच्या प्रवर्गातील ज्या महिला उमेदवारांची निवड खुल्या प्रवर्गातील महिलांच्या आरक्षित पदावर झाल्यास, अशा महिला उमेदवारांना प्रमाणपत्र सादर करण्याबाबत खालील दोन विकल्प राहतील.

(अ) अशा महिला उमेदवारांनी सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग अथवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांनी विहीत केल्याप्रमाणे त्यांच्या

-३-

संबंधित जातींची प्रमाणपत्रे सादर करावीत व ती त्या विभागांनी विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार तपासून घेण्यात यावीत. अशा महिला उमेदवारांकडून खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता विहित केलेले क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

([illegible]) ज्या त्यांच्या संबंधित जातीचे प्रमाणपत्र सादर करु इच्छित नसतील किंवा सादर करु शकत नसतील त्या अशा महिला उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातील महिलांप्रमाणेच या शासन निर्णयाच्या परिशिष्ट ३ नुसार विहित केलेले उन्नत व्यक्ति/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

([illegible]) या शासन निर्णयाच्या परीशिष्ट-२ नुसार संबंधित तहसिलदार/नायब तहसिलदार यांचेकडे क्रिमीलेअरच्या प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा.

([illegible]) वर नमूद केलेल्या उमेदवारांनी उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यास, तहसिलदार व नायब तहसिलदार यांनी अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गाप्रमाणेच उन्नत व्यक्ति/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्र द्यावे.

([illegible]) प्रमाणपत्र देण्यासाठी तहसिलदार व नायब तहसिलदार यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. याबाबतच्या अर्जाचा नमुना व प्रमाणपत्राचा नमुना या शासन निर्णयाच्या परिशिष्ठ २ व ३ प्रमाणे राहील.

(४) वरील प्रमाणपत्र तपासण्यासाठी या शासन निर्णयाच्या परिच्छेद (दोन) (अ) मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

(तीन) हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

(चार) हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक. २९/१६-अ, दि. ३.४.२००१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( चंद्रसेन तुरकर )
अवर सचिव, महाराष्ट्र राज्य

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
* प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
सर्व विभागीय महिला व बाल विकास अधिकारी,
सर्व जिल्हा, महिला व बाल विकास अधिकारी
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व महानगरपालिका
सर्व जिल्हाधिकारी
सर्व तहसिलदार/नायब तहसिलदार
सर्व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी
सर्व शासन अनुदानित संस्था
नि १७ नस्ती-का-२
* प्रती

परिशिष्ट - "क"

(१) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने दिनांक २२ मार्च,२०१८ रोजी क्र.१/ड-९/२०१८ नुसार महाराष्ट्र विधानसभा नियम २२५ (३) मध्ये केलेल्या सुधारणे संदर्भातील अधिसूचना.

(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने दिनांक २५ मार्च, २०१८ रोजी क्र.१/ड-१५/२०१८ नुसार महाराष्ट्र विधानमंडळ नियम २१९ (३) मध्ये केलेल्या सुधारणे संदर्भातील अधिसूचना.

RNI No. MAHBIL/2009/35527

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–क

वर्ष ४, अंक १६] शुक्रवार, एप्रिल २७, २०१८/वैशाख ७, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २७

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले
(भाग एक, एक–अ व एक–ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर)
वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क),
जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील
इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई, दिनांक २२ मार्च २०१८

अधिसूचना

क्रमांक १/क-१/२०१८.—महाराष्ट्र विधानसभा नियमातील, पुढील सुधारणा उक्त नियमातील नियम २३५ च्या पोट-नियम (३) च्या अनुसरून, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहेत :—

महाराष्ट्र विधानसभा नियमांना सुधारणा
भाग पंधरा " समित्या " यांमध्ये
नियम २४३, २४४
" (ट) महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती "

नियम २४२ मधील (ट) मधील " महिलांचे हक्क व कल्याण समिती " या मजकुराऐवजी " महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती " हा मजकूर दाखल करण्यात यावा.

नियम २४३ च्या समास टिपेमध्ये व नियम २४३(१) च्या ओळ क्रमांक ३ मधील " महिलांचे हक्क व कल्याण समितीची रचना " या मजकुराऐवजी " महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीची रचना " हा मजकूर दाखल करण्यात यावा.

नियम २४४ मध्ये " महिलांचे हक्क व कल्याण समितीची कार्ये " या मजकुराऐवजी " महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीची कार्ये " व पोट-नियम (५) ऐवजी पुढील नियम नव्याने दाखल करण्यात येईल :—

(५) बालकांचे आरोग्य, शिक्षण, संरक्षण व मूलभूत हक्क याकरिता केंद्र शासनाचा बाल न्याय अधिनियम, २०१५ तसेच केंद्र शासनाचा बालकांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा (POCSO Act), २०१२ व तत्सुबंधिक विविध नियमानुसार राज्य शासनाच्या कर्तव्य पेंटन्या बाबी संबंधित राज्य शासनाने केलेल्या उपाययोजना व अंमलबजावणी संदर्भात दोन्ही सभागृहांना माहिती देणे.



एच ४८-क-१७—१

(६) बालकांच्या विकासासाठी शासकीय पातळीवर अंगिकृत केलेल्या बाल न्याय अधिनियम, २०१५ च्या अनुषंगाने बाल धोरणाची अंमलबजावणी संदर्भात शासनस्तरावर केलेल्या कार्यवाहीची माहिती दोन्ही सभागृहांना देणे.

(७) राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या बालकांच्या कल्याणार्थ योजनांची तपासणी करून तत्संदर्भात शासनास सुयोग्य उपाययोजना सुचविणे.

(८) सभागृहाने किंवा अध्यक्षांनी/सभापतींनी समितीकडे विनिर्देशपूर्वक निर्दिष्ट केलेल्या बाबींचे परीक्षण करणे.

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

**MAHARASHTRA LEGISLATURE SECRETARIAT**

Vidhan Bhavan, Mumbai, dated the 22nd March, 2018.

*NOTIFICATION*

No. 1/D-9/2018.—In pursuance of the sub-rule (3) of rule 225 of the Maharashtra Legislative Assembly Rules, the following amendments to the said rules, are hereby published :—

*AMENDMENTS TO THE MAHARASHTRA LEGISLATIVE ASSEMBLY RULES*

*PART XV "COMMITTEES"*

**Rules 243, 244**

**" (r) Committee on Rights and Welfare of Women and Child "**

**After Rule 242,** in (r) for the words **" Committee on Rights and Welfare of Women "** the words **" Committee on Rights and Welfare of Women and Child "** be substituted.

**In the marginal note of Rule 243** for the words **" Constitution of Committee on Rights and Welfare of Women "** the words **" Constitution of Committee on Rights and Welfare of Women and Child "** be substituted.

**In sub-rule (1) of Rule 243,** for the words **"Committee on Rights and Welfare of Women"** the words **"Committee on Rights and Welfare of Women and Child"** be substituted.

**In the Rule 244,** for the words **" Functions of Committee on Rights and Welfare of Women "** the words **" Functions of Committee on Rights and Welfare of Women and Child "** be substituted and **sub-rule** (v) **shall be substituted by the following new rules :-**

(v) to inform both the House regarding measures adopted and implementation made by the Government in respect of matters falling within the purview of the State Government that are governed by Acts of Central Government namely Juvenile Justice (Protection and Care of Children) Act, 2015 which provides for health, education, protection and fundamental rights etc. of children as well as Protection of Children from Sexual Offences (POCSO) Act, 2012 Central Government and similarly prescribed rules incidental thereto;

(vi) to inform both the Houses in respect of action taken on the Government level regarding implementation of the child policy as per Juvenile Justice (Protection and Care of Child) Act, 2015 adopted by the Government for the development of the children;

(vii) to examine various welfare schemes for children implemented by various Departments of the State Government and to make recommendations thereon;

(viii) to examine such of the matters as are specifically referred to the committee by the House or the Speaker/Chairman.

Dr. ANANT KALSE,

Principal Secretary,

Maharashtra Legislative Assembly.

RNI No. MAHBIL /2009/35527

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—क

वर्ष ४, अंक १२(२)] मंगळवार, एप्रिल ३, २०१८/चैत्र १३, शके १९४० [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले

(भाग एक, एक-अ व एक-ल यामध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर)

वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई, दिनांक २६ मार्च, २०१८

अधिसूचना

क्रमांक ५७३-१५/२०१८.—महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील पुढील सुधारणा उक्त नियमातील नियम २९१ च्या पोट-नियम (३) अन्वये, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहेत :—

महाराष्ट्र विधानपरिषद नियमात सुधारणा

भाग चौदा " समित्या " यामध्ये

नियम क्रमांक २०५ यामधील "(ख)" मध्ये

(१) नियम २०५ यामधील " (ख) " मध्ये " महिलांचे हक्क व कल्याण " या मजकुराऐवजी " महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

नियम २५४-अ च्या समास टीपेमध्ये व नियमातील ओळ क्रमांक ३ मध्ये

(२) नियम २५४-अ च्या समास टीपेमध्ये व नियमातील ओळ क्रमांक ३ यातील " महिलांचे हक्क व कल्याण समिती " या मजकुराऐवजी " महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

नियम २९५ मधील ओळ क्रमांक ४ मध्ये

(३) नियम २९५ मधील ओळ क्रमांक ४ यातील " महिलांचे हक्क व कल्याण समिती " या मजकुराऐवजी " महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

**MAHARASHTRA LEGISLATURE SECRETARIAT**

Vidhan Bhavan, Mumbai, dated 25th March, 2018.

*NOTIFICATION*

Sr. No. 1/D-15/2018.—In pursuance of sub-rule (3) of rule 219 of the Maharashtra Legislative Council Rules, the following amendments to the said rules, are hereby published :—

*AMENDMENTS TO THE MAHARASHTRA LEGISLATIVE COUNCIL RULES*

*Part Fourteen in " Committees"*

**After Rule 205 in " (f) "**

(1) **After Rule 205,** in " (f) " for the words, " **Committee on Rights and Welfare of Women** " the words, " **Committee on Rights and Welfare of Women and Child** " be substituted.

**In the marginal note of Rule 214-A and in line 4 of Rule**

(2) **In the marginal note of Rule 214-A and in line 4 of Rule** for the words, " **Committee on Rights and Welfare of Women** " the words, " **Committee on Rights and Welfare of Women and Child** " be substituted.

**In line 8 of Rule 215**

(3) **In line 8 of Rule 215** for the words, " **Committee on Rights and Welfare of Women** " the words, " **Committee on Rights and Welfare of Women and Child** " be substituted.

Dr. ANANT KALSE,
Principal Secretary,
Maharashtra Legislative Council.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

# परिशिष्ट “ (ड) ”
# बैठकींची संक्षिप्त कार्यवृत्त

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**

बुधवार, दिनांक १९ ऑगस्ट, २०१५

स्थळ : यवतमाळ नगरपरिषद

**उपस्थिती**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव.

**यवतमाळ नगरपरिषद**

(१) डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) डॉ. रंजन वानखेडे, जिल्हा सहनियंत्रन अधिकारी

(३) श्री. रविंद्र पांढरे, मुख्याधिकारी,

(४) श्री. आसिफखान गोलंदाज, उप मुख्याधिकारी

(५) श्री. आर. बी. पालकर, नगर अभियंता, बांधकाम विभाग

(६) श्री. महेश जोशी, अभियंता, नियोजन विभाग

(७) डॉ. विजय अग्रवाल, आयु, वैद्य

(८) श्री. सतिश मसराम, बाजार अधिक्षक

(९) श्री. ए. एम. दावपुरे, सहायक लेखापाल

(१०) श्री. व्ही. जी. आजनकर, आस्थापना लिपिक

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**

मंगळवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५

स्थळ : ठाणे महानगरपालिका

**उपस्थिती**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स

(३) डॉ.भारती लव्हेकर, वि.स.स.

(४) श्री.योगेश घोलप, वि.स.स

(५) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स

(६) श्रीमती स्मिता वाघ, वि.स.स.

(७) ॲड.हुस्नबानू खलिफे, वि.प.स

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव.

**महानगरपालिका, ठाणे**

(१) श्री. संजय मोरे, महापौर

(२) श्री. सुनिल चव्हाण, अतिरिक्त आयुक्त (१)

(३) श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त (२)

(४) श्री. संदीप माळवी, उपायुक्त (परि-१)

(५) श्री. ओमप्रकाश दिवटे, उपायुक्त (कर)

(६) श्री. संजय निपाणे, उपायुक्त

(७) श्री. संजय हेरवाडे, उपायुक्त

(८) श्रीमती नयना ससाणे, सहायक आयुक्त

(९) श्रीमती वर्षा दीक्षित, कार्यकारी अभियंता

(१०) श्री. सुधीर नाकाडी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(११) श्री. एस. आर. पाटोळे स.वि.अ.

(१२) श्री. दशरथ वाघमारे, उप स.वि.अ.

(१३) श्रीमती एम. एम. प्रधान, प्रदूषण नियंत्रण अधिकारी

(१४) श्री. रतन अवसरमोल, नगर अभियंता

(१५) श्री. मकरंद काळे, विधी सल्लागार

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**

मंगळवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५

स्थळ : ठाणे जिल्हा परिषद

**उपस्थिती**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स
(३) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.
(४) श्री. योगेश घोलप, वि.स.स
(५) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स
(६) श्रीमती स्मिता वाघ, वि.स.स.
(७) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव.

**जिल्हापरिषद, ठाणे**

(१) श्री.संजय मोरे, महापौर
(२) श्री.सुनिल चव्हाण, अतिरिक्त आयुक्त (१)
(३) श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त (२)
(४) श्री.उदय चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी
(५) श्री.रविंद्र पाटील, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
(६) श्री.रघुनाथ बामणे, प्रकल्प संचालक, डी.आर.डी.ओ.
(७) श्री.जगन्नाथ भोर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
(८) श्री.प्रविण भावसार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (म.बा.क.)
(९) श्री.अशोक पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं)
(१०) श्रीमती मानसी बोरकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा.पु)
(११) डॉ.एस.ई.भोसले, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (प्र.)
(१२) डॉ. प्रफुल्ल बनसोडे, कृषी विकास अधिकारी
(१३) श्रीमती मीना यादव, शिक्षण अधिकारी.

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**

सोमवार, दिनांक २४ एप्रिल, २०१७

स्थळ : पालघर जिल्हा परिषद

**उपस्थिती**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.
(३) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.
(४) डॉ.भारती लव्हेकर, वि.स.स.
(५) श्रीमती स्मिता वाघ, वि.स.स.
(६) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव
श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

**जिल्हापरिषद, पालघर**

(१) श्रीमती निधी चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) डॉ. ल. नि. धपाडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
(३) श्री. रा. र. वाणी, कृषी विकास अधिकारी
(४) श्री. विनोद मानेकर, डीएमएम, एमएसआरएलएम
(५) श्रीमती नंदिनी घाणेकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी
(६) श्रीमती संगिता भागवत, ई. ओ. (प्रायमरी)
(७) श्रीमती राजेश कंकाळ, ई. ओ. (सेकंडरी)
(८) श्री. ठाकुरसिंग चव्हाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (व्हीपी)
(९) श्री. एन. के. जेजुरकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(१०) श्री. प्रकाश देवकषी, उप (ईओजी)
(११) श्री. एस. पी. पतंगे,
(१२) श्री. संजीव धुमाळे,
(१३) डॉ. संतोष गायकवाड, जि. आ. अ.
(१४) श्रीमती संघरत्ना खिलारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी.

**महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती**

बुधवार, दिनांक ७ जून २०१७

स्थळ : विधान भवन, मुंबई.

**उपस्थिती**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.

(३) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव.

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव, गृह विभाग

(२) श्री. ता. मा. शेळेकर, सहसचिव, संसदीय कार्य विभाग

(३) श्री. ज. ना. पाटील, सह सचिव, नगरविकास विभाग

(४) श्री. भा. र. गावित, सहसचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(५) श्री. अनिल परशुरामे, उप सचिव, महिला व बालविकास विभाग

(६) श्री. सं. रा. मोटे, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(७) श्री. सु. ना. शिंदे, उप सचिव, आदिवासी विकास विभाग

(८) श्री. गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(९) श्री. रं. स. गोदे, सहसंचालक, आरोग्य विभाग

(१०) श्री. संजय भोसले, जनसंपर्क अधिकारी.

**क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी :**

(१) श्री. कमलाकर फंड, आयुक्त, एकात्मिक बाल विकास योजना, महिला व बालविकास विभाग

(२) डॉ. एन. रामास्वामी, आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका

(३) श्री. अंकुश चव्हाण, अतिरिक्त आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका

(४) श्रीमती तृप्ती सांडभोर, उपायुक्त, नवी मुंबई

(५) श्री. संजय तिवारे, उपायुक्त, ठाणे महानगरपालिका

(६) श्री. विवेक भिमनवार, मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे जिल्हापरिषद

(७) श्रीमती एम. जे. नरहरे (येमले), गृहपाल, मुलींचे शासकीय वसतीगृह, कळंबोली.

**महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती**

बुधवार, दिनांक १० एप्रिल २०१८

स्थळ : विधान भवन, मुंबई.

**उपस्थिती**

(१) श्रीमती भारती लव्हेकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.

(३) श्रीमती तृप्ती सावंत, वि.स.स.

(४) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स.

(५) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स

(६) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री.विलास आठवले, उप सचिव.

श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

श्रीमती प्रियांका कांदळगांवकर, कक्ष अधिकारी

**विभागीय सचिव :**

(१) श्रीमती मनिषा म्हैसकर, प्रधान सचिव, नगरविकास विभाग

(२) श्रीमती निलीमा केरकेट्टा, सचिव, सामान्य प्रशासन विभाग

(३) श्री.एस.एल.संधू, अपर मुख्य सचिव, सहकार विभाग

(४) श्री.ज्ञा.ल.सुळ, सह सचिव, सामाजिक न्याय विभाग

(५) श्री.स.ज.मोघे, उप सचिव, नगरविकास विभाग

(६) श्री.टि.वा.करपते, उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग

(७) श्री.अनिल कवडे, अवर सचिव, नगरविकास विभाग

(८) श्री.रमेश शिंगटे, अवर सचिव, सहकार विभाग

**क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी** :

(१) श्री. सुनिल चव्हाण, अतिरिक्त आयुक्त, ठाणे महानगरपालिका

(२) श्री. संजय निपाणे, उपायुक्त, ठाणे महानगरपालिका

(३) श्री. अनिल अदागळे, मुख्याधिकारी, नगरपरिषद, यवतमाळ

(४) श्री. जी. जी. मावळे, डीडीआर, अकोला

(५) श्री. अजय फडोळ, जिल्हा महिला व बालविकास विभाग, ठाणे

(६) श्री. कि. ब. तायडे, मुख्य लेखाधिकारी, ठाणे महानगरपालिका

(७) श्री. अनंत वैद्य, सीईओ, जिल्हा मध्यवर्ती बँक, अकोला

(८) कु. के. आर. राठोड, संरक्षण अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास, यवतमाळ

(९) श्री. आर. डी. अडे, डीसीपीओ, यवतमाळ

(१०) श्री. योगेश जवादे, जिल्हा मध्यवर्ती बँक, अकोला

(११) श्री. चंद्रशेखर बारी, उप निबंधक सह. संस्था, सहकार आयुक्तालय, पुणे.

**महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती**

गुरुवार, दिनांक ३ मे २०१८

स्थळ : विधान भवन, मुंबई.

**उपस्थिती**

(१) डॉ.भारती लव्हेकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) प्रा. मेधा कुलकर्णी, वि.स.स.

(३) श्रीमती तृप्ती सावंत, वि.स.स.

(४) श्रीमती अमिता चव्हाण, वि.स.स.

(५) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.प.स.

(६) ॲड. हुस्नाबानू खलिफे, वि.प.स.

(७) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्रीमती प्रियांका कांदळगांवकर, कक्ष अधिकारी.

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग

(२) श्री. असीम गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग

(३) श्री. र. प्र. आटे, सहसचिव, शालेय शिक्षण विभाग

(४) श्री. मनोहर ठोंबरे, सहसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(५) श्री. संजय देशमुख, सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग

(६) श्री. व्यंकटेश भट, उप सचिव, गृह विभाग

(७) श्री. गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(८) श्रीमती स्मिता निवतकर, उप सचिव, महिला व बालविकास विभाग

(९) श्रीमती गीता कुलकर्णी, उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग

(१०) श्री. सुबराव शिंदे, उप सचिव, आदिवासी विकास विभाग.

**क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी :**

(१) श्री. बी. जी. पवार, आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका

(२) श्री. मिलिंद बोरीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,पालघर

(३) श्री. प्रशांत कदम, जिल्हा पोलिस अधीक्षक, ठाणे

(४) श्री. लोमेश सलामे, उप आयुक्त, आयुक्तालय, नाशिक

(५) श्री. सुदर्शन पी.नगरे, सहायक आयुक्त, ठाणे

(६) श्रीमती स्वाती देशपांडे, सहायक आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका

(७) डॉ. श. र. वाडेकर, प्रमुख वैद्यकिय अधिकारी

(८) डॉ. प्रदिप आ. जाधव, उप प्रमुख वैद्यकिय अधिकारी

(९) श्री. आ. लिं. ज-हाड, अतिरिक्त आयुक्त, मुंबई महानगरपालिका

(१०) डॉ. रमेश भारमळ, अधिष्ठाता, नायर रुग्णालय, मुंबई

(११) श्री. टि. ओ. चव्हाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पालघर

(१२) श्री. वि. डि. वळवी, उप विभागीय पोलिस अधिकारी, पालघर

(१३) श्री. बी. एच. भरक्षे, गटविकास अधिकारी

(१४) श्री. रा. रा. गायकवाड, उप प्रबंधक, जे.ए.पी.टी.

(१५) श्री. प्रशांत ना. ठोंबरे, प्रभारी मुख्याधिकारी, डहाणू, जि.पालघर

(१६) श्री. शरद बेलवटे, मुख्य लेखा अधिकारी.

**महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती**

गुरुवार, दिनांक १२ जुलै २०१८

स्थळ : विधान भवन, नागपूर.

**समिती प्रमुख**

डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**समिती सदस्य**

(१) प्रा. मेघा कुलकर्णी, वि.स.स.

(२) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.

(३) श्रीमती स्नेहलता कोल्हे, वि.स.स.

(४) श्रीमती तृप्ती सावंत, वि.स.स.

(५) श्री. अशोक पाटील, वि.स.स.

(६) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स.

(७) श्रीमती सुमन पाटील, वि.स.स

(८) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

समितीने उक्त बैठकीत यवतमाळ नगरपरिषद, ठाणे महानगरपालिका, ठाणे जिल्हा परिषद व पालघर जिल्हा परिषद येथे दिलेल्या भेटीच्या संदर्भात प्रारुप अहवालावर विचार विनिमय करून तो संमत केला.

शामुना–एचबी-२०८०. शासकीय मुद्रणालय, नागपूर.